


३ मे १९६९
८० पैसे

# माणूस



श्रमिक नगर

आयोध्यानगर

लेबर बँक

. . . . . .

नवी चाइल




"दहा पैसे देता का साहेब ? रुपयाला तेवढेच कमी पडताहेत. नशिबाची परिक्षा करावी म्हणतो मीबी"

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एकूणपन्नासावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. एप्रिल, ४

'झुंड'चा सातवा लेखांक अत्यंत आवडला. श्री. दळवी हे एक उत्तम इतिहासकार होऊ शकतील असे वाटते. कानिटकरांचा अनुवादही उत्तम. 'गोंडेगावचे श्रमदान शिबिर' हा लेख 'माणूस'च्या पातळीला साजेल असाच आहे. 'वन्स अगेन अबाउट लव्ह'चे परीक्षण वाचून हे पिक्चर पाहण्यासाठी खास पुण्याला यावे असं वाटायला लागलंय. अंकात एकही कथा नाही हे पाहून मात्र थोडासा निराश झालो. **बालाजी गुंडावार. नांदेड**

स. न. एप्रिल, २०

दि. १९ एप्रिलचा अंक वाचला. सध्या 'माणूस'मध्ये 'झुंड' सोडले तर इतर काही वाचावयास नसते. 'झुंड' हे नाव योग्य वाटत नाही; पण प्रदीर्घ लेखमाला ठीक वाटते. मात्र काही ठिकाणी चुका आढळतात. उदा. (Command Hq.) हे असले शब्द कमांड हेडक्वार्टर असताना कंसात लिहिण्याची गरज नसावी. अॅड. कानिटकरांसारख्या मुरब्बी भाषांतरकाराकडून अशा चुका न व्हाव्या असे वाटते.

**–सुभाष ठोंबरे**, हिंगोली.

किंमत : ८० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



रंगभवनचा विस्तृत रंगमंच...

पडदा बाजूला सरकतो.

रंगमंचावर खूप गर्दी आहे. या गर्दीचे लहानमोठे गट झालेले आहेत.

उजव्या हाताला समोरच तबला, ढोलकी, मृदंग, डफ या चर्मवाद्यांची दाटी झाली आहे. डाव्या हाताला सतार, हार्मोनियम, तानपुरा...मागच्या जागेत व्हायोलिन्स...आणखी इतर काही वाद्ये...

सारा रंगमंच कसा भरलेला आहे.

आणि या साऱ्या गर्दीत...अगदी समोर...केंद्रभागी एक देखणे, रुबाबदार व्यक्तिमत्त्व उभे आहे. त्यांच्यासमोर एका उंच स्टँडवर हार्मोनियम आहे.


या आकर्षक आणि मोहक व्यक्तिमत्त्वाला सारे ओळखतात सी. रामचंद्र या नावाने...

सी. रामचंद्रांना पाहिले की, आठवण होते 'अनारकली'ची !

'अनारकली' या चित्रपटातील गाण्यांचे स्वर मनात घुमू लागतात.

चित्रपटसृष्टीत एकेकाळी संगीताचा अनभिषिक्त सम्राट असलेले सी. रामचंद्र आज काही वेगळेच घेऊन समोर उभे आहेत. कोपऱ्यातल्या एका ध्वनिक्षेपकासमोर एव्हाना आणखी एक भारदस्त व्यक्तिमत्त्व येऊन उभे राहिले आहे.

**वसु भगत**



# एक

# गीत-गोपाल

हे व्यक्तिमत्त्व म्हणजे एक दरारा आहे.
एक लोभ आहे. निव्वळ प्रतिभा आहे.
या व्यक्तिमत्त्वाचे नाव ग. दि. माडगूळकर.
ग. दि. माडगूळकर हेही चित्रपट-सृष्टीतील अनभिषिक्त सम्राट.
त्यांची गीते म्हणजे मराठी भाषेचे अमोलिक लेणे आहे.



इतकी सरळ, साधी, इतकी कल्पनारम्य, इतकी प्रासादिक, इतकी भावपूर्ण आणि इतकी हुकमी गीते लिहिणारा कवी मराठीत क्वचितच भेटेल.

आपआपल्या क्षेत्रात राजेपण भोगणारी ही दोन माणसे आज एकत्र आली आहेत, गोपालकृष्णाचे चरित गाण्यासाठी.

काही वर्षांपूर्वी ग. दि. माडगूळकरांनी 'गीतरामायण' लिहिले. सुधीर फडक्यां-सारख्या सुरेल आवाजाच्या निष्ठावन्त संगीतकाराने ते महाराष्ट्रातल्या घराघरांत पोहोचविले. भारतातल्या मोठमोठ्या शहरांतून 'गीतरामायणा'चे सूर घुमले. इतकेच नव्हे तर ते थेम्स पादाक्रांत करून आले.

'गीतरामायण' हे ग. दि. माडगूळकरांच्या कीर्तीचा शिरपेच ठरले.

मग माडगूळकरांनी 'गीत-गोपाल' लिहिले. आणि त्यावर स्वरसाज चढवला सी. रामचंद्र यांनी.

चांगल्या नाटकाचे चांगलेपण सिद्ध व्हायला चांगला निर्माता आणि चांगला दिग्दर्शक मिळायला हवा असतो. एरवी ते चांगले नाटक फक्त चांगलेच राहते. त्याचे चांगलेपण कधी सिद्धच होत नाही. चांगल्या गीतांचेही तसेच असते.

त्यांना स्वरांतून साकार करणारा चांगला संगीतकार लाभला नाही तर त्यांचे देखणेपण, त्यांचा सुगंध, आडरानात वाढणाऱ्या जाईच्या फुलांसारखा अनाघ्रात राहतो. अभुक्त राहतो. अनास्वादित राहतो.

आणि कुठलीही कलाकृती ही आस्वाद घेतली जाण्यासाठीच असते. भोगली जाण्यासाठीच ती जन्माला येते.

भोगली गेल्यावाचून तिचे अस्तित्व निरर्थक ठरते. तिचे जीवन अकृतार्थ ठरते.

ग. दि. माडगूळकरांच्या 'गीतरामायणा'ला जसे सुधीर फडके हे संगीतकार म्हणून लाभले तसेच 'गीत-गोपाल' ला सी. रामचंद्र संगीतकार म्हणून लाभले.

या दोन संपन्न व्यक्तिमत्त्वांच्या जुळणीनेच 'गीत-गोपाल'च्या अस्तित्वाचे सार्थक व्हायचे निश्चित झाले. 'गीत-गोपाल'चे जीवन कृतार्थ होणार हे निश्चित ठरले.

निमंत्रणपत्रिकेत देण्यात आलेला दम लक्षात घेऊन सव्वाआठला रंगभवनात पोचलो तेव्हा सारा शुकशुकाट होता. निमंत्रण-पत्रिकेत नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम साडेआठला सुरू होणार होता.

नऊ वाजून गेले होते. प्रेक्षागृहात तुडूंब नसली तरी चांगली गर्दी होती. गर्दीत कार्यक्रमाचे अध्यक्ष नामदार सावंत होते. मुख्य पाहुणे विधानसभेचे अध्यक्ष पागे होते. अनंत काणेकर होते. राजा बढे होते. आणखीही काही ओळखीचे चेहरे होते. खूपसे अनोळखीही चेहरे होते.

हा कार्यक्रम सावरकर राष्ट्रीय स्मारक निधीच्या मदतीसाठी आयोजित केला गला होता. प्रवेशद्वाराजवळ स्वयंसेवक 'स्मरणिका' घेऊन उभे होते. स्मरणिका म्हणजे जाहिरातींची पुस्तिका. त्यात नुसत्या जाहिराती. आणि या जाहिराती एक

रुपया देऊन विकत घ्यायच्या होत्या. हेही उत्पन्न सावरकर राष्ट्रीय स्मारक निधीत जमा व्हायचे होते.

रंगमंचावरचा पडदा दुमंगायला सव्वा नऊ वाजले.

रंगमंचावर पार्श्वभागी असलेले स्वातंत्र्यवीर सावरकरांचे तैलचित्र, त्याच्या भव्यतेने साऱ्यांत आधी नजरेत भरत होते.

त्या तैलचित्राच्या पुढे बसलेला वाद्यवृन्द...समोर उभे असलेले सी. रामचंद्र आणि एका टोकाला ध्वनिक्षेपकासमोर ग. दि. माडगूळकर...

माडगूळकरांनी 'गीत-गोपालची' कल्पना समजावून दिली...

एक स्वप्नरम्य भूमी...शरद् ऋतू...पौर्णिमेची रात्र...

यमुनेच्या संथ, वाहत्या पाण्यावर पूर्ण चंद्राचे चांदणे पडलेले आहे.

वृक्ष-वेलींच्या शाखा-पर्णांतून चांदणे झरते आहे.

हे चांदणे माथ्यावर घेऊन उभा असलेला कंदब वृक्ष...

त्या वृक्षाच्या तळाशी चांदण्याने अधिकच गूढ झालेल्या छायेत बसलेली एक कामिनी...

तिने आपल्या हाताच्या तळव्यावर आपला गाल टेकला असेल...तिचे डोळे यमुनेच्या जळावर खिळले गेले असतील...पण ते जळ तिला दिसते का ? ते चांदणे तिला जाणवते का ?

कारण ती तर स्वतःतच गुंतलेली आहे. आपल्याच मनात खोलखोल डोकावून पाहते आहे. स्मृतीचा एकएक कोष उमलत जातो. भूतकालातील, तिने मनात जपून ठेवलेला, एकएक क्षण जागा होत जातो. तिची हुरहूर तिच्या चित्तवृत्ती उत्कट होतात. आपल्या आठवणी ती स्वतःलाच सांगू लागते.

वृक्ष, लता, जळ, भूमी...सारे निःशब्द झाले आहे. शरश्चंद्रिका तेवढी हुंकार देते आहे. पण तो हुंकारही मूक आहे. अशा निःशब्दतेत, नीरवतेत फक्त एक–आणि एकच–स्वर उमटतो आहे...त्या कदंबातल्या कामिनीचा...राधेचा...

**शरश्चंद्रिका मूक हुंकार देते**

**वनी राधिका गीतगोपाल गाते...**

...सी. रामचंद्राचा स्वच्छ स्वर रंगभवनात घुमतो आहे. निवेदनाचे गीत ते म्हणत आहेत.

स्मृतींत तल्लीन होऊन गेलेल्या राधेला काय आठवते ?

...कारागृहाच्या भिंती...कंसाने बंदिवासात डांबून ठेवलेले वसुदेव आणि देवकी ...शिळेवर आपटून ठार मारलेली त्यांची इवली इवली सात अपत्ये...आणि पाठोपाठ जन्माला आलेला कृष्ण...

**अजन्मा जन्मासी झाला...**

कृष्ण म्हणजे तर प्रत्यक्ष परमेश्वर. त्याला जरा नाही. मरण नाही. तसाच

जन्मही नाही. असा हा 'अजन्मा' परमेश्वर कृष्णाचे रूप घेऊन देवकीच्या उदरी कंसाच्या कारागृहात जन्माला आला. हे अक्रीतच घडले होते...

...लक्ष्मी शंकरच्या अत्यंत मधुर आवाजाने राधा सांगत होती... "अजन्मा जन्मासी आला"

पण, 'अजन्मा' जन्मासी आल्याचे देवकीला कुठे ठाऊक होते! तिचे मातेचे काळीज या नवजात अपत्याच्या काळजीने व्याकूळ झाले. या आठव्या अपत्यालाही आधीच्या सात भावंडांच्या पाठी जावे लागेल, या चिंतेने ती विव्हल झाली. तिने हे आठवे अपत्य तरी वाचवा म्हणून वसुदेवाची विनवणी केली.

आपण निराधार आहोत, अगतिक आहोत याची तिला जाणीव झाली.

अशी निराधार, अगतिक, व्याकूळ देवकीमाता सौ. प्रमिला दातारांनी आपल्या स्वरांतून साकार केली...**निराधार मी भीरूभगिनी**

देवकीची विनवणी ऐकून वसुदेव उठले. आपला वंशदीप शिरी धरून ते निघाले. नंदाच्या घरी जायला.

**निजवंशदीपका धरून शिरी**
**वसुदेव निघाले नंदघरी...**

त्या वेळी भरून आलेले आभाळ, पावसाची कोसळणारी मुसळधार, दुथडी भरून वाहणारी यमुना या साऱ्यांचे माडगूळकरांच्या प्रतिभेने गीतातून केलेले वर्णन राजेश्वर बोवडे यांनी सादर केले. त्याच्या गाण्यातून त्यांचा नवेपणा जसा जाणवत होता, तशीच त्यांची मेहनतही जाणवत होती.

मग, कृष्ण चरित्रातील मथुरागमनापर्यंतचा एकएक प्रसंग क्रमाक्रमाने पुढे येत गेला. बकुळ पंडित, मन्ना डे, महेंद्र कपूर, प्रभाकर कारेकर, राणी वर्मा, अरुण सरनाईक ही सारी गायक मंडळी गायली. कधी एकटी, कधी समूहातून...

पण, आजची रात्र माडगूळकरांची नव्हती. सी. रामचंद्राची नव्हती. लक्ष्मी शंकर, मन्ना डे किंवा महेन्द्र कपूर यांची नव्हती. ती खऱ्या अर्थाने होती राणी वर्मांची. या अंगठ्याएवढ्या पिटुकल्या आणि चिटुकल्या पोरीने दोन गाणी म्हटली. एक बलरामाचे, दुसरे कृष्णाचे. साऱ्या कार्यक्रमात तिने विलक्षण जिवंतपणा आणला. स्वच्छ वाणी, अर्थानुकूल शब्दोच्चार, विलक्षण आत्मविश्वास आणि या साऱ्यांच्या जोडीला प्राजक्ताच्या फुलासारखा नाजुक, तरतरीत चेहरा. राणीची गाणी ही "गीत–गोपालची" विलोभनीय विशेषता होती.

अशीच लक्षात राहिली ती बकुळ पंडित. "शरदामधल्या संध्याकाळी" हे गीत तिने इतक्या हळुवारपणे म्हटले की, नकळत जीवाच्या तारा झंकारून गेल्या. प्रभाकर कारेकरांचे "प्रलयघन दाटले" हे गीत त्यांच्या गहिऱ्या आवाजासाठी आणि गाण्याच्या तयारीसाठी लक्षात राहिले.

पण मला धक्का दिला तो अरुण सरनाईक यांनी. नट म्हणून आपली

काय ताकद आहे हे त्यांनी ' हा खेळ सावल्यांचा ' या नाटकातून प्रत्ययास आणून दिले, तेव्हा मला असाच धक्का बसला होता. या माणसाविषयी माझे सारे समज त्या रात्री त्यांनी गैर ठरविले होते. आणि आज त्यांना गाताना ऐकले तेव्हा पुन्हा तोच अनुभव झाला. त्यांच्या आवाजात मनाला मोहिनी घालण्याची विलक्षण ताकद आहे. त्यात विलक्षण गोडवा आहे. मराठी रंगभूमीवर गायक नटांची उणीव भासते आहे, अशी तक्रार करणाऱ्या निर्मात्यांनी या नटाच्या गायनाकडे का दुर्लक्ष केले ?

या कार्यक्रमात मला आणखी एक गोष्ट जाणवली, ती या आधी झालेल्या अशा स्वरूपाच्या कार्यक्रमात कधी जाणवली नव्हती. ती गोष्ट म्हणजे या कार्यक्रमावर पडलेला चित्रपटमाध्यमाचा प्रभाव. सी. रामचंद्र यांच्या संगीतातून दृश्ये कशी सहजपणाने साकार होत होती. कॅमेऱ्याच्या हालचालीसह दृश्य (व्हिज्युअल्स) प्रतीत होणे, हा या कार्यक्रमात आलेला अनुभव वेगळा होता. सारे तीन तास माझ्या मनात नुसता कॅमेरा फिरत होता.

सी. रामचंद्रांचे या कार्यक्रमात असलेले खास अंशदान हे एवढे !

रात्री साडेबारा वाजता हा कार्यक्रम संपला तेव्हा मनात होते राणी वर्माचे गाणे, बकुळ पंडितचे गाणे, आणि अरुण सरनाईकांचा गहिरा गोड आवाज.

आणि "गीत-गोपाल" बरोबरच आठवत होती अनारकली...त्या चित्रपटातील लता मंगेशकरांनी गायलेली गाणी...त्या चित्रपटाला सी. रामचंद्र यांनी दिलेले उत्कट, गहिरे संगीत... ◻



# दोन

# जत्रा

जत्रा म्हटले की काय आठवते ?
रंगीबेरंगी खेळणी...
मला थोरला उघडा बाजार...
खाऊची दुकाने...
कर्रकर्र आवाज करीत गरागरा फिरणारे आकाशपाळणे...
दोन तोंडांची आणि चार हातांची अद्भुत मुलगी...
रंगीबेरंगी पोषाखांनी नटलेली गर्दी...
एक अमाप उत्साह, कोलाहल, विस्कळितपणा...

पण, ही जत्रा वेगळी आहे. त्या जत्रेहून अगदीच वेगळी...

इथ आकाशपाळणे नाहीत. खेळणी नाहीत. कोलाहल नाही. विस्कळितपणा नाही.

सारे कसे शिस्तीत आहे.

तरीसुद्धा त्यात यांत्रिकपणा नाही. मरगळ नाही.

उलट अमाप चैतन्य आहे. उत्साह आहे. जिवंतपणा आहे.

ही जत्रा म्हणजे एक स्वप्नभूमी आहे.

या स्वप्नभूमीत पशू आहेत. पक्षी आहेत. देव आहेत. राक्षस आहेत. राजे आहेत. राण्या आहेत. फुले आहेत. पर्वत, नद्या, अरण्ये, पऱ्या...सारेसारे काही आहे.

ही स्वप्नभूमी अद्‌भुत आहे. इथे पऱ्या प्रेम करतात. पशुपक्षी माणसांसारखे बोलतात. इथे सत्याचा विजय होतो. असत्याचा पराजय होतो. इथे चांगल्याला चांगले फळ मिळते. दुष्टांना शासन होते.

ही अद्‌भुत, विस्मयकारी स्वप्नभूमी या मुंबईत वर्षातून कधीतरी जन्माला येते. ती इथेच थांबते असे नाही. कधीकधी ती गावोगावी फिरते.

या जत्रेत स्वप्ने मिळतात. निरागस स्वप्ने...सुंदर स्वप्ने...

या जत्रेत आनंद मिळतो...

ही आनंदाची जत्रा आहे स्वप्नांची जत्रा आहे. सौंदर्याची जत्रा आहे.

इथे हसू सुंदर आहे. इथे अश्रूही सुंदरच आहेत.

कारण, ही पुस्तकांची जत्रा आहे. बॉंबे बुक डेपोचे श्री. कुमठा यांच्या कल्पक बुद्धिमत्तेतून या जत्रेचा जन्म झाला आहे आजवर गेल्या काही वर्षांत अशा पंधरा जत्रा भरल्या आहेत.

या जत्रेत जावे. मनमुराद आनंद लुटावा. तिथल्या पशुपक्ष्यांशी बोलावे. राजा-राण्यांशी सुखसंवाद करावा. पऱ्यांवर प्रेम करावे. एखादा राजा आवडला तर काऊंटरवरच्या माणसाला थोडेसे द्रव्य देऊन त्या राजाला खुशाल घरी घेऊन यावे. राजाच काय; पण, देव आणि राक्षस, राण्या आणि पऱ्यांनाही घरी घेऊन आलात तरी त्या काऊंटरवरच्या माणसाचे काही म्हणणे नाही. उलट, या मंडळींना तुम्ही घरी घेऊन जावे, असाच त्यांचा आग्रह आहे. फक्त थोडेसे द्रव्य द्या त्यांना. म्हणजे, मग तो आणखी राजे घेऊन येईल. आणखी खूपखूप राण्या, खूपखूप पऱ्या घेऊन येईल आणि पुढच्या जत्रेला तुमच्या स्वाधीन करील.


मी या जत्रेला गेलो. एकटाच होतो. सोबतीला कुणीच नव्हते. पण तरीसुद्धा खूप मजा आली.

सारीकडे नुसते रंग उधळले होते.

काळे रंग, पांढरे रंग.

निळे रंग, लाल रंग.

# हा प्रश्न मुळींच "गुंतागुंतीचा" नाहीं..!



"प्रकाशचें माक्याचें तेल" हा त्यावर साधा, सरळ आणि खात्रीचा उपाय आहे. तें नियमित वापरण्यास सुरुवात करा आणि पहा .... हा प्रश्न कधीं उद्भवलाच नाहीं, असें आपणांस वाटेल! केंस गळावयाचें तर थांबतिलच, शिवाय तजेलदार, निरोगी नि लांबसडक केशसंभार आपल्या सौंदर्यांत मोलाची भर घालील.

## प्रकाशचें माक्याचें तेल



**प्रकाश ट्रेडिंग कंपनी**

गोखले रोड (नॉर्थ) दादर, मुंबई २८

जांभळे, हिरवे, पिवळे आणि गुलाबी रंग...

त्या रंगांच्या जगात मन रंगून गेले होते.

इथल्या माणसांना रंग होते. पऱ्यांना रंग होते. पशुपक्ष्यांना रंग होते. इथे हसू रंगीत होते. अश्रूंना पण रंग होते.

नुसता आनंद पाने भरभरून ओसंडत होता.

या पानांचे आकार मजेमजेशीर होते.

काही चौरस, काही उभट, काही लांबट...

सारीकडे कसे चैतन्य भरून होते. जिवन्तपणाच्या सुगंधाने सारा आसमंत कसा दरवळून गेला होता.

मी प्रसन्न झालो. खूप वेळ त्या स्वप्नभूमीत फिरलो.

मग थोडीशी 'पुस्तके' नावाची स्वप्ने खरेदी केली.

ही एवढी स्वप्ने मला पुरेशी होणार नाहीत, हे मला कळत होते. मनातून आणखी खूपखूप स्वप्ने घ्यायची होती. पण, घेता येत नव्हती.

त्या काऊंटरवरच्या माणसाला द्रव्य द्यावे लागत होते ना !

एकाएका राजासाठी, एकाएका परीसाठी इतके द्रव्य झेपत नाही देणे !

त्या जत्रावाल्यांना आणखी स्वप्ने आणायला द्रव्य लागते, हे कळते आम्हांला. कागद, छपाई, बांधणी, कव्हर या साऱ्यांसाठी त्यांना द्रव्य द्यावे लागते, हे आम्हांलाही ठाऊक आहे.

पण, आमची स्थितीच अशी चमत्कारिक आहे हो !

कव्हर आणि कोऱ्या पानांसकट उणीपुरी फक्त पन्नास पाने असलेल्या पुस्तकाला चार-सहा रुपये मोजणे जड जाते आम्हांला.

आम्हांला मनांतून खूप वाटते, हे पुस्तक...हे स्वप्न आपण घ्यावे म्हणून !

पण, नाही झेपत !

तुमची अडचण आम्ही समजू शकतो. मग, आमची अडचण तुम्ही का नाही समजून घेत ?

आम्हांला ही स्वप्ने हवी आहेत. खूपखूप स्वप्ने हवी आहेत.

तुम्हांला ही स्वप्ने आम्हांला द्यायची आहेत. जितकी जास्तीत जास्त देता येतील तितकी द्यायची आहेत.

आमची अडचण आम्ही सांगितली तुम्हांला.

काही मार्ग निघू शकला, तुम्ही काढू शकलात तर पाहा बुवा ! ◻



# तीन

# पिसारा

व्हॉवे बुक डेपोने भरविलेल्या पुस्तकांच्या जत्रेत एक पुस्तक मोठ्या दिमाखाने उभे होते. ते विलक्षण आकर्षक होते.

पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोराचे वेष्टनावरील सुंदर चित्र क्षणभर नजर खिळवून ठेवत होते. त्या पुस्तकाचे नाव होते 'पिसारा.'

श्री. देवीदास बागूल यांनी चिटुकल्यापिटुकल्या मुलांसाठी ते लिहिले होते.

देवीदास बागूलांच्या लेखनाशी मराठी वाचक–बाल आणि थोरही–अगदीच अपरिचित आहे, असे नाही.

पण, 'पिसारा'ने त्यांना राजमान्यताही मिळवून दिली आहे.

बालवाङ्मयाच्या अखिल भारतीय स्पर्धेत, बालांसाठी मराठी भाषेत लिहिलेले सर्वोत्तम पुस्तक म्हणून 'पिसारा'ला नुकतेच एक हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले आहे.

'पिसारा' म्हणजे आपल्या परीने एक जत्राच आहे. या जत्रेत फक्त पक्षीच आहेत. कोंबडा, कबूतर, मोर, कोकिळ आणि पोपट या पक्षीजमातींनी या जत्रेत आपले टाल मांडले आहेत.

माझ्या लहानपणी मी एक कथा खूपदा ऐकली आहे. गाणाऱ्या पक्ष्याची कथा...

माझ्या आजीची आणि आईची ती आवडती कथा होती.

ती कथा ऐकताना मला नेहमी वाटायचे की, असा गाणारा पक्षी खरेच अस्तित्वात असेल का? असलाच तर तो मला कधीकाळी भेटेल का?

आणि बागूलांचा 'पिसारा' जेव्हा मी वाचला तेव्हा पहिल्यांदा माझ्या लक्षात आले की, गाणाराच नव्हे, तर गाणारे पक्षी अस्तित्वात आहेत. ते मला कधीच भेटले होते. त्यांचे गाणे मला कळले मात्र नव्हते.

बागूलांनी टिपले आहे ते या पक्ष्यांचे गाणे!

देवीदास बागूलांचे मन हे कवीचे मन आहे. त्यांची प्रकृती ही सौंदर्यशोधकाची आणि आस्वादकाची आहे. जिथेजिथे सौंदर्य दिसेल तिथे तिथे त्यांचे मन धावत जाते. दिसेल त्या गोष्टीतून...ऐकू येईल त्या स्वरांतून सौंदर्याचा शोध घेण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला असतो.

तसे नसते तर, कोंबड्याचा आवाज त्यांना मन वेधून घेणारा वाटला नसता. त्याचे रूप " एखाद्या भालदार–चोपदारासारखे ठसकेबाज आणि ऐटबाज " वाटले नसते. " नाचणारे कबूतर फार देखणे " दिसले नसते.

देखणेपणाच्या या आसक्तीमुळे होते काय, देवीदास बागूल वास्तव तपशीलावर क्षणभरही थांबत नाहीत.

ते आपल्या कल्पनेचा पिसारा फुलवतात आणि वास्तव तपशीलापलीकडे जातात.

वास्तव तपशीलापलीकडचे त्यांचे जग कल्पनारम्य असते. रोमँटिक असते.

या रोमँटिक विश्वात मग त्यांना मोराचा फुललेला पिसारा " राजाने पुढे चालावे आणि खांद्यावरून ओघळणारे त्याचे पाठीवरचे वस्त्र सरपटत जावे, " असा वाटतो. हाताच्या ओंजळीतले कबूतर आकाशात सोडताना " फुले उधळावीत " तसा आनंद होतो. उडणारा पोपटांचा थवा " एखादी इटुकली वडाची फांदी " होतो. " कुहूकुहू " करणारा कोकिळ रातराणीच्या पंथातील वाटू लागतो.

माणसाच्या मनात असलेले रोमँटिक विश्व हे असेच असते.

तिथे फक्त स्वप्ने असतात. सुख देणारे सौंदर्य असते.

त्या विश्वातील साऱ्या गोष्टींना एक लय असते.

साऱ्यांचा एक सुखद मेळ साधला जातो.

प्रत्येक माणसाच्या मनातील रोमँटिक विश्वासारखेच देवीदास बागूलांच्या मनातील रोमँटिक विश्व हे स्वयंपूर्ण आणि स्वयंकेंद्रित आहे. तसे ते नेहमीच व्यक्तिनिष्ठ राहत असते. व्यक्तिगत पातळीवरचेच राहत असते.

ते तसे राहणे नुसते अपरिहार्यच आहे, असे नाही, तर आवश्यकही आहे.

तसे राहण्यानेच ते निर्मळ राहत असतात.

तसे राहण्यानेच ते सुंदर राहत असतात.

कारण, त्यांच्याशी तुमचे काही सुखद असलेले निखळ व्यक्तिगत अनुभव साधले गेले असतात.

बागूलांचे रोमँटिक जगही असेच त्यांच्या निखळ व्यक्तिगत अनुभवांशी सांधले गेले आहे. कोंबड्याच्या आरवण्याशी, त्यांचे, पहाटेच्या वेळी पांघरुणासकट सरपटत आईच्या मांडीवर डोके ठेवून जात्याची घरघर व आईच्या ओव्या ऐकत गुंगीत लोळत राहणे, सांधले गेले आहे. मोराच्या आवडून जाण्याशी बैलगाडीतून गावाला जाणे सांधले गेले आहे, कोकिळेच्या कुहूकुहूशी हिंगण्यातली एक दुपार आणि अंगणातले चाफ्याचे झाड मिळून गेले आहे. उडणाऱ्या पोपटाच्या थव्याशी वडाची इटुकली फांदी निगडीत झाली आहे.

या दोन अनुभवांचे एकत्र येणे असे काही साधून गेले असते की त्यांना परस्परांपासून वेगळे करताच येत नाही. करायचेही नसते.

देवीदास बागूलांच्या या सुंदर पुस्तकात श्री. वसंत सरवटे यांची अतिशय सुंदर

रेखाटने आहेत. खरे म्हणजे हे पुस्तक एकट्या वागूलांचे नाहीच. ते जितके वागूलांचे आहे, तितकेच सरवट्यांचेही आहे.

आपल्याकडे लहान मुलांसाठी म्हणावी तेवढी पुस्तके उपलब्ध नाहीत. अशी पुस्तके कधी लिहिलीच गेली नाहीत. गेल्या चारपाच वर्षांत मात्र बालवाङ्मय समृद्ध करण्यासाठी जाणतेपणाने काही प्रयत्न चालले आहेत. पण, त्यातही पुस्तकाच्या सजावटीकडे कुणी कधी फारसे लक्ष दिलेच नव्हते.

'पिसारा' हे मी पाहिलेले पहिले सुंदर पुस्तक !

त्याचे श्रेय देवीदास वागूल आणि वसंत सरवटे यांच्याबरोबर पॉप्युलर प्रकाशनाकडेही जाते.

पण, अशा एकट्यादुकट्या पुस्तकाने काम भागणार नाही.

आम्हांला अशी खूप सुंदर पुस्तके हवी आहेत.

आम्हाला अशी खूप सुंदर स्वप्ने हवी आहेत. ○


कै. श्री. ना. ह. पालकर यांनी लिहिलेला दुर्मिळ चरित्र-ग्रंथ

## डॉ. हेडगेवार

पृष्ठे :– डेमी ऑक्टेव्ह अंदाजे १६+४७८+ऑफसेट चित्रे ३२ पृष्ठे

दोन आर्ट प्लेट्स : उत्कृष्ट कागद : मोहक मुद्रण : कापडी बांधणी

मूल्य पंधरा रुपये : डाक व्यय दोन रुपये

**श्रीदत्त जयंती शके १८९१ (दि. २३-१२-६९) पूर्वी ग्रंथ प्रकाशित होईल.**

**प्र सि द्धी पू र्व स व ल त**

दि. १६-५-१९६९ पर्यंत रक्कम भरणाऱ्या ग्राहकांना हा ग्रंथ आठ रुपयास मिळेल. (डाक-व्यय वेगळा)

स्थानिक ग्रंथ-विक्रेत्यांकडे संपर्क साधा अथवा आमच्याकडे लिहा

## हिन्दुस्थान साहित्य

३०९ शनिवार पेठ, मोतीबाग, पुणे २

। । । । । । । । ।

## □ नासिरुद्दीनचे गाढव !

तुर्कस्तानात एक मुल्ला पूर्वी राहत होता. मुल्ला नासिरुद्दीन हा एक अतर्क्य माणूस होता. प्रत्येक शुक्रवारी तो गावच्या प्रमुख बाजारात एक गाढव विकायला आणीत असे. नासिरुद्दीनचे गाढव नेहमी गोजिरे आणि देखणे असे. असे असूनही नासिरुद्दीन समाजवादी रचनेचा भोक्ता असल्याने गाढवाची किमत मात्र फार थोडी असे. नासिरुद्दीनचे गाढव आले की, खरेदी करणाऱ्यांच्या त्यावर उड्या पडत.

गाढवांची विक्री करणाऱ्या एका श्रीमंत व्यापाऱ्याने नासिरुद्दीनला विचारले– "मुल्लाजी, हे कसे काय जमवतोस तू मित्रा ? मी इतकी वर्षं या धंद्यात आहे. माझी गाढवे मी कमी किमतीत गोरगरिबांकडून विकत घेतो. माझे नोकर त्यांना बेताचेच खायला–प्यायला घालतात, तरीही मी माझ्या गाढवांची किमत तुझ्या गाढवापेक्षा कधीच कमी ठेवू शकत नाही."

नासिरुद्दीन दाढी कुरवाळीत म्हणाला–"गोरगरिबांना फसवून तू गाढवे स्वस्तात घेतोस, खायलादेखील नीट घालीत नाहीस तरी तुला ती कमी दरांत विकणे परवडत नाही. पण मी मुळी गाढवेच चोरून आणतो."

गोष्टीची आठवण होण्याचे कारण–मुंबईचे मुल्ला नासिरुद्दीन–स. का. पाटील–हे आता लोकसभेला उभे राहत आहेत.

कॉ. कृष्णमेनन यांना कॉंग्रेसने जेव्हा उत्तर मुंबई मतदार संघातून लोकसभेचे तिकीट देऊ केले तेव्हा मुंबईला बाहेरचा उमेदवार नको, या मुद्द्यावर श्री. स. का. पाटील यांनी त्यांना कडाडून विरोध केला. मग कॉंग्रेसने तो विचार सोडला. मेनन रागावले. त्यांनी कॉंग्रेस सोडली आणि मेनन पाठोपाठ दोनदा पडले ते अजून उठलेले नाहीत, हा इतिहास सर्वांना माहीत आहे.

आता मे महिन्यात गुजराथमधील बनासकाठा लोकसभा मतदार संघात जी

निवडणूक होणार आहे तिला कॉंग्रेसने श्री. स. का. पाटील यांना उभे केले आहे. ज्या तत्त्वावर कॉ. मेनन यांना पाटलांनी लोकसभेतून उठवले ते तत्त्व आता कुठे गेले, असा प्रश्न श्री. पाटलांना जेव्हा विचारण्यात आला तेव्हा श्री. स. का. मुळीच डगमगले नाहीत. ते म्हणाले, "एखाद्याला लोकसभेतून उठवण्याकरिता जे तत्त्व उपयोगी पडते तेच तत्त्व एखाद्याला लोकसभेत बसविण्यासाठी कसे उपयोगी पडेल ? बनासकाठा येथे स्थानिक उमेदवारांत मारामाऱ्या होत्या. अशा वेळी माझ्यासारखा बाहेरचा माणूसच सर्वांना हवासा वाटतो हे साधे तत्त्व आहे; त्याला मी काय करू ?" श्री. पाटील यांना हा प्रश्न विचारण्यातच चूक झाली असे आम्हांस वाटते. तत्त्वाचा आणि कॉंग्रेस पुढाऱ्यांचा अजून संबंध आहे असे अजून काही मूर्खांना वाटते त्याला काय करावे ! आता बनासकाठात मारामाऱ्या होत्या त्याला काय करणार ? समजा नवरा-बायकोंचे कडाक्याचे भांडण झाले तर ते बहुधा घरात उपरा कुणी पाहुणा म्हणून आला की लगेच मिटते. स. का. पाटील बनासकाठ्यात उमेदवार म्हणून घुसल्याबरोबर स्थानिक मारामाऱ्या स्थगित झाल्या ! समाजवादी रचनेत तत्त्व नेहमी माफक किमतीचे असावे व कुठूनही पळवलेले असावे.

मुंबईच्या नासिरुद्दीनना हे माहीत आहे की तत्त्व हे मुल्लाच्या गाढवासारखे असावे. चांगले देखणे गोजिरे. फक्त ते सोयीप्रमाणे पळवलेले असावे. कधीही महागात पडत नाही.

श्री. पाटलांचे गाढवही बाजारात चुटकीसारखे विकले गेले, यात नवल ते काय ? तत्त्वनिष्ठ मूर्खांनी काय तो वेळीच बोध घ्यावा !

## □ पुतळा भक्कम हवा !

पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटमध्ये एकदोन वर्षांपूर्वी आम्ही एक वल्ली पाहिली. ऋत्विक घटक यांचा एक सुंदर बंगाली चित्रपट पाहण्यासाठी तिथे गेलो असताना त्या चित्रपटाचे एक दिग्दर्शक तिथे आलेले होते. चित्रपट सुरू होण्यापूर्वी बंगाली शुभ्र पोषाखातला, झोकांड्या जात असलेला, मूळ तरतरीत डोळ्यांचा एक किरटा माणूस भाषण करायला पुढे आला. लहान मुलांच्यासाठी मी हा चित्रपट निर्माण केला आहे, एवढाच आशय सांगताना त्याने काही बेशुद्ध बडबड केली. या अवस्थेत खरे म्हणजे आपले दर्शन जनतेला घडावे असा कुणीही तथाकथित प्रतिष्ठित म्हणाला नसता, परंतु आहे त्या स्थितीत जमलेल्या लोकांपुढे येणारा हा बंगाली कलावंत त्याच्या बेडरपणामुळे आम्हांला फार आवडला. या माणसाने नुकतीच पश्चिम बंगालमध्ये धमाल उडवलेली आहे. हा केव्हातरी धमाल करणार होताच. त्याचा चित्रपट इतका सुंदर होता की तो एकदा पाहिल्यानंतर विसरणे

अशक्य होते. खेड्यांतून आईवडिलांना न सांगता कलकत्ता शहरात भटकणाऱ्या एका लहान मुलाची ती कथा पाहताना उत्तम कलाकृतीचा सतत प्रत्यय येत होता. ते असो. अशा या ऋत्विक घटकांनी जाधवपूर विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांपुढे आपले ' कोमल गांधार ' हे नाटक सादर करताना २६ मार्चला जे भाषण केले त्यात ही वल्ली म्हणाली–

" Gandhi-a pig from top to bottom is nowadays taken on shoulders as the Father of the Nation."

याचे भाषांतर आम्ही करीत नाही. या भाषणाच्या छापील प्रतीही समारंभात वाटण्यात आल्या. घटक हे कम्युनिस्ट आहेत. ज्योती बसूंच्या राज्यात गांधीजींचे काय स्थान राहणार आहे असा गंभीर प्रश्न इंदिराजी व चव्हाण यांच्यापुढे निर्माण करण्याचा बाष्कळ प्रयत्न काही लोकसभा सदस्यांनी केला, तेव्हा गृहमंत्र्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. तेच बरोबर आहे. बेशुद्धीत कुणी काही बोलला तर लगेच चिडण्याचे कारण नाही. महात्माजींचे ठिकठिकाणचे पुतळे मात्र धोक्यात येण्याची आता शक्यता आहे. केंद्राने राज्य सरकारांना इतके मात्र कळविले पाहिजे की, महात्माजींचे सर्व पुतळे हे किमान चाळीस फूट उंच व लोखंडाचेच असले पाहिजेत. म्हणजे कुणाला कितीही ' झिंग ' चढली तरी पुण्याच्या मंडईतील कै. विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या पुतळ्याप्रमाणे ते कुणी फोडू शकणार नाहीत !

## □ राम-राज्य !

रामायणात एक गोष्ट आहे. एके दिवशी बूर्ज्वा रामप्रभूंना दूतांनी कळवले, " महाराज, अयोध्यानगरीत एक ब्राह्मण अचानक मेला ! " अचानक मरणारा माणूस हा हार्टफेलने मरू शकतो हे अलीकडे आपल्याला कळले. ब्राह्मणाचा हार्टफेल होऊ शकतो हेदेखील आपल्याला आता कळलेले आहे. आमचे तर म्हणणे आहे की, ब्राह्मणांचेच हार्टफेल जास्त होतात. सारखे जेवायचे, वाचायचे आणि रागवायचे – मग नाही होणार हार्टफेल ? जरा नांगर धरा, द्राक्ष पिकवा, शेती करा, मजुरी करा मग नाही होणार हार्टफेल ! तर अशाच काहीतरी कारणाने ब्राह्मण अचानक मेलेला असताना, रामप्रभूंनी मंत्र्यांना विचारले–

" ब्राह्मण अचानक का मरावा ? चांगला आदल्या रात्री एका लग्नघरी जेवून आला होता. सकाळी पुराण सांगितले. रात्री बायकोशी भांडण करून जो निजला तो सकाळी काही उठू शकला नाही ! "

मंत्रिमंडळाची बैठक झाली. ब्राह्मण का मेला, यावर चर्चा झाली. राज्यात काहीतरी पाप घडले असल्याने ब्राह्मण असा अचानक मेला असावा असा निर्णय झाला.

" महाराज, राज्यात नक्की पाप घडले आहे. नाहीतर ब्राह्मण मरता नाही !"

रामप्रभूंनी हनुमंताला बोलावले. आज्ञा केली. अयोध्येत प्रत्येक घराच्या छपरावर उड्या मारीत हे शोधून काढ की, अयोध्येत पाप कुणी केले आहे ?" मारुतराव वानरे ताबडतोब शोध करायला निघाले. कुठे बायका स्वैपाकात होत्या, चुली फुंकत होत्या. तोच घराच्या कौलाचा चुराडा झाल्याचा आवाज होई ! कौलांची दाणादाण होताच, मारुतराव आत डोकावून पाहत, " या घरात पाप दिसत नाही !" असे पुटपुटत समोरच्या घरावर धप्पकन उडी मारीत. नागरिक भयभीतपणे हा प्रकार पाहू लागले. पाप सापडत नाही हे लक्षात येताच रागावलेला रामसेवक, आता मोठमोठ्याने बुभु:कार करीत वादळासारखा इकडून तिकडे झेपावत होता. अखेर दम लागल्याने त्याला तहान लागली व पाणी पिण्यासाठी तो एका झोपडीपाशी आला. झोपडी शूद्राची होती. बाहेर बुभु:कार होताच शूद्री बाहेर आली. घामाघूम झालेल्या हनुमंताला पाहताच घाबरली. पण धीर धरून म्हणाली, " काय सेवा करू ? " हनुमंताने सांगितले, " पाणी हवे आहे !" शूद्री म्हणाली " आत यावं. " हनुमंत विचारात पडला. हिचा नवरा घरात नसताना ब्रह्मचाऱ्याने झोपडीत जाणे ठीक नाही. हनुमंताने विचारले, " तुझा पती कुठे आहे ?"

शूद्री म्हणाली, " ते संध्या करीत आहेत ! "


मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना ?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

**न्यू इरा
होमिओपॅथिक
फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई–२८

हनुमंत दचकला. शूद्र संध्या करतो म्हणजे याची मुंज कधी झाली ? हनुमंताने शूद्रीला विचारले– "याचा अर्थ काय ? शूद्राला हा अधिकार कुणी दिला ?"

शूद्री म्हणाली, "काय सांगू महाराज ! घरच्या धंद्यांत यांचं लक्ष नाही. सगळी भिकेची लक्षणे – वाचतात – चिंतन करतात – काल तर स्वतःची हट्टाने मुंज करून घेतली. आज संध्या करताहेत. मला म्हणाले, आता तू मला काही काळ मातेसमान ! मी म्हटलं– जळली तुमची अक्कल. लग्न करताना अक्कल नव्हती ? लग्न झाल्यावर असला घोळ घालता तो ? पण सांगायचं कुणाला – भोग आहे तो तो भोगायलाच हवा. आपलाच नवरा आणि आपलेच ओठ !"

हनुमंताला आता तिथे थांबायला वेळ नव्हता. शूद्रीला पाणी बाहेरच देण्यास सांगून, तहान भागताच हनुमंत जो उडाला तो थेट रामाच्या पायाशी.

"प्रभू, पाप सापडले ! राज्यात एका शूद्राने ब्राह्मणी उद्योग सुरू केले आहेत. यामुळे ब्राह्मण मेला !"

आता शूद्रांनी ब्राह्मणी उद्योग केले म्हणून ब्राह्मण का मरावा, याचा यत्किंचित विचार न करता रामाने ताबडतोब आज्ञा दिली– "शूद्राचे मुंडके कापा ! या पापाला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरे प्रायश्चित्त नाही !"

क्षत्रिय रामप्रभूंनी शुद्राचे मुंडके उडवले. पण मेलेला ब्राह्मण काही उठून बसला नाही.

रामायणातला राम हा असा आहे ! पुढे भवभूतीच्या काळात राम जरा माण-साळला. उत्तररामचरितातला हा इसम जरा कमी कठोर झाला. सीतेच्या चारि-त्र्याचा गावातल्या चव्हाट्यावर संशय घेतला जाताच सीतेला वनवासात धाडताना हा क्षत्रिय राजा गलबलला... असे भवभूती सांगतो. रामाची ही प्रगती अशीच चालू राहिली.

पुढे रामराज्यात इंग्रजी सुरू झाले. एस. एस. सी. परीक्षा होऊ लागली. जमाना बदलला. रामही बदलला. एक दिवस राज्यात एक हरिजन तरुण मेला ! कॉरो-नरने सांगितले– "ही आत्महत्या आहे. ढेकणांचे औषध पोटात गेलेले आहे."

मंत्रिमंडळाची बैठक भरली– "हरिजन तरुणाला आत्महत्या का करावी लागली ?" मंत्र्यांनी शंका व्यक्त केली की गावातल्या ब्राह्मणांनी त्याला त्रास दिला असावा. रामाने आज्ञा दिली. गावातल्या ब्राह्मणांना पकडून रामापुढे हजर करण्यात आले. एकच ब्राह्मण पाहून रामप्रभूंनी विचारले–

"काय गावात फक्त हा एकच ब्राह्मण सापडला ?"

हनुमंताने सांगितले– "होय प्रभू. तूर्त ब्राह्मण खेड्यांत राहत नाहीत. एखादा असतो. या गावात हा एकच होता."

ब्राह्मण थरथर कापत असताना, मुख्यमंत्र्यांनी त्याला विचारले– "हरामखोरा,

[पान ९३ वर]

चंद्रशेखर मराठे

# छोट्या शेतकऱ्यांसाठी योजना

चौथ्या योजनेमध्ये शेती व संलग्न क्षेत्रातील कार्यक्रमासाठी २२१७ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी १५२४ कोटी रु. चे कार्यक्रम राज्य सरकारांमार्फत राबविण्यात येतील. या सरकारी खर्चाखेरीज संस्था व व्यक्ती या दोन्ही पातळयांवरून शेतीमध्ये भांडवल गुंतविले जाईल. भूविकासबँका व व्यापारी बँका यांच्यामार्फत या क्षेत्रास भांडवल पुरविले जाईलच. शेतकी फेरकर्ज-महामंडळ व नव्याने स्थापन होणारे शेतकी कर्जहमी-महामंडळ यांच्याद्वारे शेतीमधील गुंतवणुकीस सढळ हाताने भांडवलपुरवठा होईल.

त्याबरोबरच मोठे व मध्यम शेतकरी स्वतःहून काही गुंतवणूक करतील, अशी अपेक्षा आहे. अशा रीतीने सरकारी खर्चाखेरीज वरील मार्गांनी शेतीसाठी १८०० कोटी रु. ची रक्कम उपलब्ध होईल, असा अंदाज आहे. चौथ्या योजनेअखेर सुमारे २ कोटी ४१ लाख हेक्टार जमीन सुधारलेल्या बियाण्याखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. निरनिराळ्या पिकांच्या उत्पादनवाढीची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत-

| पीक | परिमाण | उत्पादन |
|---|---|---|
| अन्नधान्य | दशलक्ष टन | १२९ |
| गळिताची धान्ये | ,, ,, | १०.५ |
| ऊस | ,, ,, | १५ |
| कापूर | दशलक्ष गासड्या | ८ |
| ताग | ,, ,, | ७.४ |
| तंबाखू | दशलक्ष किलो | ४८० |
| नारळ | दशलक्ष नग | ६६०० |

चौथ्या योजनेतील शती कार्यक्रमाचे एक प्रमुख उद्दिष्ट हे आहे की, छोट्या शेतकऱ्याला विकासाच्या कार्यक्रमात भाग घेता यावा व विकासाचा लाभ घेता यावा. यासाठी सर्वसाधारण व विशिष्ट अशा दोन्ही स्वरूपांची उपाययोजना करण्यात येणार आहे. कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या सोयींमधील वाढ, पशु-संवर्धन व शेती

कर्जपुरवठा यांमध्ये मोठी गुंतवणूक करण्यात येईल. त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे–

| कार्यक्रम | संकल्पित खर्च | | |
|---|---|---|---|
| शेती–उत्पादन वाढ | ५१०·२३ | कोटी | रु. |
| कृत्रिम पाणीपुरवठा | ४७५·६७ | ,, | ,, |
| भूसंरक्षण | १५११०८ | ,, | ,, |
| क्षेत्रीय योजना | २९·५१ | ,, | ,, |
| पशुसंवर्धन व दूध–उत्पादन | १३६·०२ | ,, | ,, |
| मासेमारी | ८३·५० | ,, | ,, |
| जंगल | ९२·३० | ,, | ,, |
| गुदामे | ६५·२४ | ,, | ,, |
| खाद्य–व्यवसाय | १८·६० | ,, | ,, |
| सहकारी सोसायट्यांस मदत | २६३·०० | ,, | ,, |
| धान्य–साठा | १२५·०० | ,, | ,, |
| सहकार | १५१·४१ | ,, | ,, |
| पंचायत राज्य व समाजविकास | ११५·८१ | ,, | ,, |
| एकूण खर्च = | २२१७·४४ | ,, | ,, |

चौथ्या योजनेतील एक विशेष योजना म्हणजे २० निवडक जिल्ह्यांमध्ये 'पायलट–एक्स्पेरिमेंट' घेण्याची योजना होय. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात छोट्या शेत-

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

कऱ्यांच्या विकासासाठी एक यंत्रणा स्थापन करण्यात येईल. या योजनेच्या कार्य-वाहीत सुसूत्रता राहावी म्हणून ती केंद्र–सरकारच्या अख्त्यारात ठेवण्यात येणार आहे. त्या त्या जिल्ह्यांतील छोटचा, पण कार्यक्षम अशा शेतकऱ्यांच्या गरजा ओळखणे व त्यांना आवश्यक ती मदत करणे हे या यंत्रणेचे काम राहील. हे काम सहकारी–संस्था, जिल्हा–परिषदा अशा सध्याच्या संस्थांमार्फत होईल. शेतकऱ्यांना या योजनेमध्ये खालील स्वरूपाची मदत करण्यात येईल–

१. कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय करून देणे, २. जमीन समपातळीत आणणे, ३. शेतीसाठी आवश्यक ती अवजारे पुरविणे, ४. सहकारी संस्था, सहकारी बँका व भूविकास बँका यांना खास ग्रँट देऊन त्यातून छोटचा शेतकऱ्यांना भांडवल–पुरवठा करणे, ५. वरील संस्थांना आपला कारभार सुधारण्यासाठी जरूर ती आर्थिक मदत करणे, ६. छोटचा शेतकऱ्यांच्या शेतीसंबंधी तपशीलवार योजना करून देणे.

या वीस जिल्ह्यांतील अनुभवानुसार योग्य ती सुधारणा करून ही योजना सर्व जिल्ह्यांना लागू करण्यात येईल. छोटचा शेतकऱ्यांसाठी चौथ्या योजनेत असलेल्या इतर योजना अशा– १. कोरडवाहू शेतीसंबंधी अधिक संशोधन करून त्यातील उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न करणे, २. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांमध्ये छोटचा शेतकऱ्याला प्राधान्य देणे, ३. वाळवंटे व अन्य पडीक जमीन लागवडी-खाली आणण्यासाठी खास प्रयत्न करणे.

सध्या मोठमोठ्या धरणांतल्या पाण्याचा आर्थिक दृष्टचा समतोल व पुरेपूर उपयोग होत नाही. ही उणीव दूर करण्याकरिता तुंगभद्रा, नागार्जुनसागर, कोसी वगैरे प्रकल्पांखालील क्षेत्रात क्षेत्रीय विकासाची योजना लागू करण्यात येईल व या भागांचा विकास एका सुसूत्र पद्धतीने करण्याचा प्रयत्न होईल.

हवामानखात्याच्या माहितीप्रमाणे लागवडीखाली असलेल्या १३ कोटी ८० लाख हेक्टार जमिनीपैकी केवळ ४ कोटी १६ लाख हेक्टार जमिनीवर सरासरी ११५० मिलिमीटर्स पाऊस पडतो. ४ कोटी ९० लाख हेक्टार जमिनीवर ७५० ते ११४९ मिलिमीटर पाऊस पडतो. उरलेल्या ४ कोटी ७४ लाख हेक्टर जमिनीवर ७५० मिलिमीटरपेक्षा कमी पाऊस पडतो. या जमिनीतील कमी दमटपणास अनुकूल अशा प्रकारे पिके घेण्याचे तंत्र शोधून काढण्यावर भर देण्यात येईल.

महाराष्ट्र, मध्य प्रदेश, केरळ, तामिळनाडू, ओरिसा व प. बंगाल या प्रांतांतील शेतमजुरांना जमीन देण्यासाठी चौथ्या योजनेमध्ये ५॥ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे. जमिनींचे लहान लहान तुकडे जोडून घेऊन आर्थिक दृष्टचा उत्पादक शेते तयार करण्यासाठी राज्यांमार्फत २८ कोटी ४० लाख रुपयांचे प्रकल्प कार्यवाहीत आणण्यात येतील.

O




# कामगार चळवळ नवी वादळ...

— सु. ल. ओमणा

१

हृदय हेलावून सोडणारेच ते दृश्य होते ! तिथून जाणारा येणारा कोणीही तिथे दोन मिनिटे थांबल्याशिवाय पुढे जाऊच शकला नसता. तिथला प्रकारच तसा चमत्कारिक होता. एका नवजात बालकाचे टयाहा ! त्याच्या आईचे उसासे. बाजूला बसलेल्या म्हातारीचे वाक्ताडन, आणि बाजूलाच दारू झोकून पडलेल्या बाप्याची असंबद्ध बडबड ! आणि हे सर्व चेंबूर विभागातल्या एका झोपड-पट्टीत. तिथल्या एका झोपडीसमोरच्या विशाल वृक्षाच्या गर्द छाये-खाली !! एका कामाठी बाईने त्या तशा अवस्थेत, कुठल्याही वैद्यकीय मदतीशिवाय एका तान्हुचाला जन्म दिला होता. आजू-बाजूच्या तीन–चार वयोवृद्ध बायकांनीच साऱ्या क्रिया पार पाडल्या होत्या. म्हातारी ओरडत होती, " कालच ह्या मेल्यानी, तिला पैसे दिले



**मुंबईत उषाकिरण, स्कायस्क्रेपर सारख्या टोलेजंग इमारती उभारणारा कामगार स्वतः मात्र आज या खुराड्यात राहत आहे**

नाहीत, म्हणून कुदळली. एवढा कमावतो पण सगळा नासवतो त्या बाईच्या डोस्कीवर. वर करतो दारूबाजी. रोज नवटाक अच्छेर पायजे न् बाकी घालतो मटक्यात." त्या वेदनांनी व्याकूळ झालेल्या बाईचा नवरा बाजूलाच बसला होता—दारूच्या नशेत, झिंगून ! मध्येच तो उठला, म्हातारीवर खेसकला, समोरच्या जमलेल्या जमावावर धावून गेला. " ए...कामं नाहीत का तुम्हांला काय ? जाता का न्हाय हितनं ?"जमाव विखुरला. तो नवरा झोपडीत निघून गेला. म्हातारीचे तोंड पुन्हा सुरू झाले. बाळाचे टचाहा थंडावले होते. त्याच्या आईच्या चर्येवर ग्लानी आली होती. मी तिथून हललो, पण ते दृश्य हलत नव्हते.

त्याचे नाव होते नरसय्या व्यंकय्या ! मूळचा तेलगू. पण गेली पंधरा—वीस वर्षे तो महाराष्ट्रातच, मुंबईतच होता. त्याची भाषा मराठीच म्हटली पाहिजे. तो आणि त्याची बायको कंत्राटदाराकडे काम करीत. गेल्या पाच—सहा वर्षांपासून तो इथल्याच झोपडपट्टीत राहतो आहे. महिन्याची दोघांची मिळून मिळकत असेल

दोन–तीनशेच्या घरात. शिवाय म्हातारी काही किरकोळ कामे करते. चारच दिवसांपूर्वी ह्या नरसय्याला मी भेटलो होतो. त्याच्या कंत्राटदाराकडे काम करणाऱ्यांची एक संघटना, एकाने बांधली होती. त्या संघटनेद्वारा एक छोटासा संपही पगार वाढवून घेण्यासाठी केला गेला होता. संप यशस्वी झाला नाहीच, पण काही दिवसांचा रोजगार मात्र बुडाला. वेतनश्रेणी वाढवून मिळावी ह्यासाठी लढा व्हावा हे योग्यच होते. पण त्याबरोबर दोन–तीनशे रुपये घरात येऊनही, झोपडीचे भाडे अत्यंत तोकडे असूनही, त्या कामगार कुटुंबावर अशी पाळी यावी ह्याचे मला आश्चर्य वाटले. ह्या प्रश्नाचे सापडलेले मला उत्तर एकच होते " **कामगार चळवळी होतात, राबवल्या जातात त्या केवळ त्यांच्या वेतनश्रेण्या वाढवून घेण्यासाठीच. त्यांच्या सामाजिक प्रश्नांना हात घालायचा प्रयत्नच कुठे होत नाही.** " माझा विचार मी त्या छोट्याशा कामगार पुढाऱ्याला बोलून दाखवला. पण तो त्याला रुचलेला दिसला नाही. लाल बावट्याचा तो प्रतिनिधी श्री. तुकाराम शिंदे म्हणाला, " हे प्रश्न आमच्या अखत्यारातले नाहीतच मुळी. ते समाजसुधारकांनी हाताळावेत. आम्हांला फक्त ही नोकरशाही, भांडवलशाही खिळखिळी करायची आहे. ह्या शाह्यांविरुद्ध वर्गयुद्ध पुकारून कामगारांचे नंदनवन उभारायचे आहे ! "

कामगारांचे नंदनवन ! काय उदात्त कल्पना आहे ? पण गेल्या जवळ जवळ पन्नास वर्षांच्या कामगार चळवळीनंतर आज कामगारांची स्थिती काय आहे ? वेगवेगळे संप-लढे ह्यातून किंचित कुठे छोट्या–मोठ्या पगारवाढी कामगारांना मिळाल्या असतील. आठ तासांच्या पाळ्या, प्रा. फंड, कामगार विमा योजना वगैरे काही सवलती मिळाल्या असतील. पण एकंदर बहुसंख्य कामगारांच्या जीवनमानात काही सुधारणा झाल्या आहेत, असे वाटत नाही. किंबहुना वाढती लोकसंख्या, अफाट भाववाढ ह्यांमुळे त्याला मिळालेली पगारवाढ जवळ जवळ शून्य ठरून त्यांचे प्रश्न अधिकच बिकट झालेले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालांनी ही गोष्ट अधिकच स्पष्ट केली आहे. ह्या अहवालात म्हटले आहे की, " राहणीमानाचा खर्च लक्षात घेता सापेक्षतः कामगारांच्या उत्पन्नात १६ टक्के घटच झालेली आहे." ह्यातच आज कामगारांच्या जुन्या चाळींचे, त्यांच्या झोपडपट्ट्यांचे प्रश्न अधिकाधिक उग्र बनू पाहत आहेत. रोजच्या रोज स्फोटक होत आहेत. प्रश्नांमध्ये भर घालायला दारू–मटका आहेतच. त्यातच समाज शिक्षणाच्या दृष्टीने काहीच हालचाल नाही. कामगार संघटना आपली सारी शक्ती आर्थिक–विशेषतः बोनस, वेतनश्रेणी–प्रश्नांवर उग्र आंदोलने उभी करण्या वेचीत असल्याचे दृश्य दिसते. पन्नास वर्षांच्या आंदोलनाने एक गोष्ट मात्र वाढीस लागली आहे, नि ती म्हणजे कामगार आणि मालक ह्यांना एकमेकांबद्दल वाटणारे शत्रुत्व ! भांडवलशाहीचे सारे दुर्गुण सांगत असताना समाजवादात सु–शिक्षित, कर्तव्यदक्ष कामगारच हा गाडा नीट ओढू शकेल हेच ही पुढारी मंडळी विसरली. आणि म्हणूनच कामगारांची शक्ती

विधायक कार्यांत वापरून, त्यांची संघटना बळकट करायचे धोरण त्यांनी स्वीकारले नाही. परिणामतः एवढ्या प्रदीर्घ चळवळीनंतरही त्यांचे प्रश्न लोंबकळत राहिले ! त्यांच्या संघटित शक्तीचा प्रभाव कुठेही फारसा पडू शकला नाही. भारतातल्या कामगार चळवळीचे हे फार मोठे अपयश आहे.

आर्थिक प्रश्नांशिवाय इतर कितीतरी प्रश्न आज कामगारांपुढे आ वासून उभे आहेत. कामगारांशी बोलले, त्यांच्या वस्त्यांतून हिंडले की, ह्या प्रश्नांची कल्पना येऊ लागते. मध्य मुंबईतल्या गिरणगावात हिंडले की, त्यांच्या राहत्या घराचा प्रश्न केवढे गंभीर स्वरूप घेऊन उभा ठाकलाय ते सहज कळते. गिरणगावातल्या ह्या चाळी म्हणजे मृत्यूचे सापळेच ! ह्यांतल्या काही काही चाळींची आज अवस्था अशी आहे की, त्या केव्हा कोसळतील, आणि काही 'शें 'ना जगाचा कायमचा निरोप कधी घ्यायला लावतील ह्याचा नेम नाही. ह्या प्रश्नावर कुठेही फार मोठ्या विचारमंथनाचे, आंदोलनाचे वारे वाहताना दिसून येत नाहीत. शासन, नगरपालिका, पुढारी, आमदार, खासदार, नगरसेवक, सगळेच ह्या प्रश्नावर उदासीनता स्वीकारताना आढळतात. हीच गोष्ट मुंबईभर पसरलेल्या झोपडपट्ट्यांची ! शासन, सरकारी अधिकारी, शिक्षित ह्या झोपडपट्ट्या सुंदर मुंबापुरीवरचा हा डाग आहे असे मानतात आणि त्या उठवल्या जाव्यात अशी मागणी करतात विरोधी पक्ष, त्या उठवल्या जाऊ नयेत अशी मागणी करतात. पण दोघांपैकी कुणीही तियल्या जनतेला सु-शिक्षित करायचा, तिथे चालू असलेल्या समाज–विघातक कृत्यांना आळा घालायचा, झोपडपट्ट्या सुधारायचा प्रयत्न करीत नाहीत. झोपडपट्टीतल्या एका कार्यकर्त्याने चक्कच सांगितले, "**सरकारला काही करायची इच्छा नाहीच. विरोधी पक्षांनासुद्धा शक्य तो हा प्रश्न लोंबकळतच राहायला हवा आहे. कारण तसा तो राहिला तरच, सरकारविरुद्ध जनमत भडकवून स्वतःचे**

## योग्य नेतृत्वाची गरज...

"महाराष्ट्रातला, विशेषतः मुंबईतला कामगार अधिक संघटित आहे, अधिक शांतताप्रिय आहे. त्याला योग्य नेतृत्व मिळाले, विधायक कार्यक्रम दिला गेला तर तो भरीव कार्य करून दाखवू शकेल ह्याबद्दल मला संदेह नाही. आणि सांगताना वाईट वाटते की, काही किरकोळ अपवाद वगळता कामगार संघटनांमार्फत असे काहीच प्रयत्न होत नाहीत. आर्थिक मागण्यांबरोबरच कामगारांचे सार्वजनिक शिक्षण, त्यांचे घराचे प्रश्न, त्यांच्यांतली कर्तव्यदक्षता ह्यांबाबत ह्या संघटना काहीच करत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सरकार ह्या क्षेत्रात तरी निदान राजकारणनिरपेक्ष सहकार्य अपेक्षिते...निव्वळ नकारात्मक चळवळीतून कामगारांचे हित कधीच साधले जाणार नाही !"

**– श्री. नरेंद्र तिडके,**
**मजूर मंत्री, महाराष्ट्र.**

राजकारण साधणे त्यांना शक्य होते."

मटका, पठाण, दारू हे प्रश्न कामगारांच्या समस्या अधिकच बिकट करीत आहेत; आणि ह्या प्रश्नांवरच एकमेव उपाय म्हणजे कामगाराला सुशिक्षित करणे. त्याला नुसते 'साक्षर' करून ते भागणार नाही, तर त्याच्या मनावर चांगले संस्कार बिंबवण्याचे संघटनात्मक कार्य हाती घेतले गेले पाहिजे. अशा तऱ्हेचे कार्य युनियन्सनी का करू नये हा मला नेहमीच प्रश्न पडतो. हे कार्य युनियन्सनी करावे पण त्या ते करत नाहीत, असे मी ज्या ज्या कामगार पुढाऱ्यांना, कामगारांना भेटलो त्या त्या सर्वांनी मान्य केले.

श्री. दिनकर साक्रीकर म्हणाले, "घराचा किंवा शिक्षणाचा प्रश्न कामगार संघटनांनी हाताळला नाही हे खरेच. देशातल्या ४०–४५ वर्षांच्या कामगार चळवळीनंतरही काही संपांमधून क्वचित आर्थिक लाभ मिळवून देण्यापलीकडे ह्या चळवळीने काही साधले नाही. कामगारांचे सामाजिक प्रश्न धसास लावले नाहीत. त्यांच्या राहण्यांच्या जागांचे प्रश्न सुटू शकलेले नाहीत. त्यांना कुठलीही राजकीय–सामाजिक निष्ठा ही चळवळ मिळवून देऊ शकली नाही. अर्ध्या शतकाच्या वाटचालीतून कामगार वर्गाची प्रखर संघटित शक्ती उभी राहू शकली नाही, कामगार चळवळीचे हे अपयशच म्हणावे लागेल! थोडे स्पष्ट बोलायचे तर आमच्या युनियन्स ह्या एका अर्थाने दुकाने झाली आहेत. जो अधिक आर्थिक फायदा करून द्यायचे आश्वासन देईल तिकडे कामगार झुकतो. त्या वेळी त्याची निष्ठा त्या युनियनपाशी असतेच असे नाही. अर्थात हेही खरे की, अशा तऱ्हेच्या कार्यासाठी लागणारे मनुष्यबळ व काही अंशी द्रव्य–बळ आमच्या युनियन्सजवळ नाही. युनियन्सची नित्यनैमित्तिक कामे, कोर्टांची कामे ह्यांतच युनियनचा पूर्ण वेळ, कार्यकर्त्यांचा सगळा वेळ खर्ची पडतो. ह्याखेरीज ह्या सामाजिक प्रश्नांच्या कामासाठी कार्यकर्ते उभे करणे अर्थातच परवडत नाही." हे काही अंशी खरे असले तरी, त्यामुळे ह्या प्रश्नाकडे जे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे, त्याचे समर्थन होणे कठीण आहे. कामगार संघटनांच्या कित्येक मधल्या फळचा उभ्या असणे आवश्यक आहे. चाळी, झोपडपट्टया वगैरे ठिकाणी राहणाऱ्या युनियन–सदस्यांकडून काही कार्य, मनात आणले तर ह्या युनियन्स करून घेऊ शकतील असे मला वाटते! निदान असे प्रयत्न होणे तरी अत्यंत आवश्यक आहे."

ह्या संबंधात एकदोन गोष्टी वाचकांपुढे आणणे जरूर वाटते. चेंबूरच्या टिळक नगरामध्ये राहणाऱ्या श्री. जोशींनी एक किस्सा सांगितला, "एका प्रथितयश औषधी कंपनीतल्या कामगार संघटनेने सदस्यांची एक सहल आयोजित केली. सहलीला अनेक सभासद आपल्या बायकामुलांसह आलेले होते. खास बसगाड्यांची सोय केली गेली होती. गाड्या हलल्या, मात्र! एका विशिष्ट ग्रुपच्या एकेका व्यक्तीने खिशातून दारूच्या बाटल्या काढून मद्यप्राशनाला सुरुवात केली. ह्यांत

काही युनियन पुढारीही होते. परिस्थिती पुढे इतकी चिघळत गेली की, बायका-मुलांसह आलेल्यांना सहलीचा आनंद लुटणे तर दूरच, पण घरी सुखरूप कसे पोहोचायचे ह्याचीच चिंता वाटू लागली. हा किस्सा सांगून त्यांनी कडवटपणे प्रश्न केला, "कामगारांना लढ्यासाठी उद्युक्त करणाऱ्या कामगार पुढाऱ्यांना त्याच कामगारांना जबाबदारीने वागावे कसे हे सांगता येत नाही का ?" मटका, दारू वगैरे व्यसनांपायी कामगार पठाणांच्या हाती जात आहे.

पठाणांच्या पद्धतीवरच काम करणारा कामगारांतलाच एक वर्ग हळू हळू पुढे येत आहे. घरच्या पाठिंब्यामुळे म्हणा किंवा 'कुशल-कामगार' ह्या कारणामुळे थोड्या बऱ्या वेतनामुळे म्हणा किंवा अन्य कुठल्याने म्हणा, पण हा कामगार वर्ग इतर सर्वसामान्य कामगारवर्गापेक्षा, निदान आर्थिक दृष्ट्या तरी वरच्या पातळीवर वावरताना दिसतो. विविध कारखान्यांतून चालवल्या जाणाऱ्या क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांमध्ये ह्याच वर्गाचे वर्चस्व असते. पण पुष्कळदा असे पाहायला मिळते की, ही मंडळी कारण नसताना द. सा. द. शे. ९ टक्के व्याजाने सोसायटीतून कर्ज काढतात आणि ही रक्कम छोट्या छोट्या रकमांतून (१००-२०० रु.) विभागून अन्य कामगारांना मासिक १० ते १२ टक्क्यांनी देतात. अर्थात जो शुद्ध हेतू ठेवून ह्या सोसायट्या तयार होतात त्या हेतूंनाच सुरूंग लागतो, अशी कित्येक उदाहरणे वेगवेगळ्या कामगारांकडून ऐकायला मिळाली.

**पठाणाच्या तावडीत....**

दोन वर्षांपूर्वी फक्त ५०० रु. कर्ज घेतले. दोन वर्षांत व्याजाच्या रूपाने १५०० रु. फेडले. आणि तरीही अद्याप मुद्दल तसेच बाकी आहे !

खोटे वाटेल, पण ही वस्तुस्थिती आहे. उत्तर मुंबईतल्या एका केमिकल कंपनीतल्या विष्णू कदम नावाच्या कामगारानं पठाणाकडून दरमहा १२½ टक्के (द. सा. द. शे. १५० रु.) व्याजाने काही कारणाने ५०० रु. घेतले. दोन वर्षे तो नियमाने पठाणाला व्याज देतो आहे. ह्याचा पगार दरमहा २२५ रु. च्या आसपास आहे. घरात माणसे फक्त तीनच. झोपडीचे भाडे अवघे दहा-बारा रु. नुकतेच त्याने कंपनीच्या क्रेडिट को-ऑप. सोसायटीतून ५०० रु. कर्ज काढले. परंतु तरीही तो पठाणाचे कर्ज चुकवू शकला नाही. कारण इतर देणकरी खूप होते. हे एवढे कर्ज कशामुळे झाले असावे ? त्याच्या बायकोने स्पष्ट उत्तर दिले. "नवटाक पावशेरचा नाद आणि मटक्याचं वेड !" आणि हा असा एकच नाही. ठिकठिकाणच्या पठाणांना भेटून माहिती गोळा केली त्यावरून वाटते, मुंबईतला एकूण ६०% कामगार पठाणाचे गिऱ्हाईक आहे.

ह्या सर्वच प्रकारांनी एकाच गोष्टीचा मला वेळोवेळी निर्वाळा दिला की, कामगार जगतात–विशेषतः सनिष्ठ कामगार वर्गात–शैक्षणिक, विधायक कार्यक्रमांची फार मोठी आवश्यकता आहे. हे कार्यक्रम फारसे होत नाहीत, तसे कार्यक्रम घडवून आणण्यासाठी कुणी फारसे धडपडत नाहीत हेही प्रकर्षाने जाणवले. हिंडताना हेच पुन्हा पुन्हा जाणवत होते. वेगवेगळ्या कामगारांशी ह्यासंबंधी चर्चा केली, तेव्हाही सूर हाच ऐकू आला. बऱ्याच कामगार नेत्यांनी असे प्रयत्न व्हायला हवेत. तसे होत नाहीत हेही प्रांजळपणे कबूल केले. श्री. सरमळकरांनी थोडा वेगळा सूर छेडला. त्यांच्या मते, " हे कार्यक्षेत्र कामगार चळवळीपासून सर्वस्वी वेगळे आहे. चाळींचे वगैरे प्रश्न सोडविण्यासाठी ठिकठिकाणी चाळ-समित्या स्थापल्या आहेत. तेथे आमचे कार्यकर्ते काम करतातच." श्री. साक्रीकर, श्री. देशपांडे, हिंद मजदूर संघाचे कार्यकर्ते आदींनी प्रयत्न फार तोकडे पडतात हे मान्य करताना असेही सांगितले की, ह्या दिशेने प्रयत्न होतच नाहीत असे नाही. श्री. देशपांड्यांनी ' जाम–मिल 'मधले उदाहरण दिले. जाम–मिलमध्ये एका अपघातात एक कामगार प्राणास मुकला अशा वेळचा नेहमीचा प्रघात म्हणजे, काम बंद करून बाहेर पडणे. परंतु ह्या वेळी नेत्यांनी कामगारांना समजावले, काम करायला लावले आणि त्या दिवशीच्या कामगारांच्या पगारातून बाराशे रुपये गोळा करून त्या कामगारांच्या कुटुंबियांना मदत केली. त्या कार्यक्रमाचे एक प्रमुख मार्गदर्शक जाम मिलमधलेच श्री. आप्पा मास्तर म्हणाले, " हा अशा तऱ्हेचा प्रयोग, कदाचित कामगार–इतिहासातला पहिलाच असावा !" पण आश्चर्य असे की, श्री. आप्पा मास्तर ह्या सुपर-



वायझरने अशा तऱ्हेच्या कामगारांच्या कामात प्रत्यक्ष भाग घेतला म्हणून त्यांना मात्र कंपनीने कामावरून कमी केले !

विविध नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी चर्चा करताना, कमी प्रमाणात का होईना पण काही कार्य चालू असलेले समजले. गोरेगावच्या ' एक्सेल 'मध्ये ' निवृत्ति-सेवा-फंड ' गोळा केला जातो. त्याचा विनियोग कामगारांचे निवृत्तीनंतरचे किंवा क्वचित कुठे काही दुर्दैवी प्रसंग ओढवल्यास त्याच्यामागे त्यांच्या कुटुंबियांचे जीवन सुखकर होण्यासाठी व्हावा अशी आशा आहे. ' बेस्ट 'मधल्या ' हाऊसिंग, ' ' को-ऑपरेटिव्ह ' वगैरेसंबंधीचे प्रयत्न कळले. गोदी कामगारांबाबत चालू असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांचा आलेख उमगला. राष्ट्रीय गिरणी कामगार संघाच्या (INTUC) प्रमुख केंद्रात चालू असलेल्या विविध कामगारोपयोगी योजना समजल्या. ह्यातून जरी मनाला किंचित ओलावा मिळाला, तरी पूर्ण समाधान मिळाले नव्हते. श्री. सरमळकर, श्रीमती रांगणकर, इतर अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते ह्यांची विचारपद्धती डोक्यात घोळत होती. " **शेवटी सर्वच प्रश्नांचे मूळ कामगारांच्या आर्थिक मागासलेपणात आहे. दोन वर्गांमधली विषमता नष्ट केल्याशिकाय काहीही साधता येणार नाही. आणि त्यासाठी वर्गलढा उभारायचीच आवश्यकता आहे.** "

एक मात्र निश्चित की ह्या साऱ्यांतून उभे राहत होते ते चित्र उत्साहजनक मुळीच नव्हते. काही काही आशेचे किरण दिसले, पण ते तेवढ्यापुरतेच ! ह्याच अवस्थेत, जवळ जवळ शंभर कामगारांना मी भेटलो. वेगवेगळ्या थरांतले, भिन्न मनोवृत्तीचे कामगार ! त्यांच्याशी बोललो, चर्चा केली पण फारसे काही हाती लागले नाही. त्याच अपेशी संपाच्या, अपेशी जीवनाच्या कहाण्या पुन्हा पुन्हा ऐकाव्या लागल्या. पन्नास वर्षांच्या चळवळीने किंवा वीस वर्षांच्या स्वातंत्र्याने त्यांना काही विशिष्ट पद्धतीने घडवले आहे, त्यांचे जीवन फुलवले आहे ह्याचे कुठेच प्रत्यंतर येईना. निराशेचे एक गडद चित्र मनापुढे तयार होऊ लागले होते.

पण तोच ऐकू आल्या खोजाची चाळ, हाशम चाळ, मिरांडा चाळ, आदी ठिकाणच्या चाळकऱ्यांच्या स्वयंस्फूर्त कर्तृत्वाच्या नौबती ! अयोध्यानगर झोपडपट्टीवासीयांचे स्वतःला उत्कर्ष साधून घ्यायचे प्रयत्न समजले. नंतर एक एक नावे पुढे येऊ लागली–' आझाद युवक संघ, ' ' एडवर्ड मिलचे कामगार ', ' सहकारी चळवळ ', ' लेबर बँक ' वगैरे वगैरे. ' वाटले, कामगार वर्गात काहीतरी धडपड चालू आहे. तिथला पुरुषार्थ जागा होतो आहे. त्याला नीट मार्गदर्शन लाभले तर आज हा जागृत कामगार सारे प्रश्नच चुटकीसरशी सोडवून टाकील. ह्या सर्व ठिकाणी हिंडलो. बोललो. चर्चा केली. त्यांतून एक उत्साहजनक आलेख मनासमोर उभा राहिला....

# २

# यमपुरी ते श्रमिकनगर

गिरणगावातल्या काही चाळींतून मी हिंडलो. एका माहीतगार अंदाजाप्रमाणे इथल्या जवळजवळ पाच हजारांहून जास्त चाळी कुरकुरत होत्या. जिन्यात जरी नुसते पाऊल टाकले तरी अख्खी चाळ गदगदायची. असले दृश्य बऱ्याच ठिकाणी होते. कुठे चाळी पाडायचे आदेश आले होते. पण चाळकरी चाळ सोडायला तयार नव्हते. चाळ सोडून दुसरीकडे जायचे तरी कुठे ? राहत्या वस्तीतली बसलेली घडी मोडायची; दूरवर जाऊन पुन्हा नवीन डाव मांडायचा. इथल्या जागेतून कामावर जायला–यायला सोयीचे पडते, लांबून यायचे म्हणजे दोन–तीन तास घालवायचे. पैसा खर्चायचा, कुठे शक्य होते कुणाला ? आणि मालकांनाही दुरुस्तीची कुठे काळजी होती ? त्यांचे तर्कशास्त्र सरळ होते. पाच–दहा रुपये भाड्यातून सर्व टॅक्सेस वजा जाता त्यांना फारसे काहीच सुटत नव्हते. चाळ पाडली गेली तर नुसता रिकामा प्लॉटच पाचशे–सहाशे रुपये वाराने त्यांना एका रात्रीत लाखोपती बनवणार होता. चाळीच्या दुरुस्तीत काही हजार घालवून वरमिळकत मात्र नाममात्र, हा व्यवहार त्यांना रुचणारा नव्हताच. कामगारांनी जमिनीसह चाळ ताब्यात घ्यावी ह्यालाही त्यांचा विरोध नव्हता. पण कामगार एवढा पैसा कुठून उभा करणार ? अनेक कार्यकर्त्यांनी कामगारांच्या राहणीमानाचे आलेखच दाखवले. सव्वादोनशे रुपये पगारात, अगदी त्रिकोणातले कुटुंब असले तरी, हाउसिंग बोर्डाच्या गाळ्यांतून किंवा चाळ–दुरुस्ती, रस्ता–विस्तार ह्या कारणांनी अन्यत्र मिळालेल्या सरकारी जागातून राहणे त्याला परवडत नव्हते. तो बजेटाची तोंडमिळवणी करण्यासाठी पोटभाडेकरू तरी ठेवीत होता, किंवा दोन–तीन वर्षांकाठी बायकोला वर्षभरासाठी माहेरी वा गावी पाठवून ती जागा दुसऱ्याला तरी ११ महिन्यांसाठी देत होता. तिथले भाडे, तिथून कामावर जाय-यायचा खर्च सारे त्याच्या हिशेबापलीकडे जात होते. झोपडपट्ट्या उठवून अन्यत्र पुनर्वसित केला गेलेला कामगार तर आणखीच नामी युक्ती योजताना आढळतो. तो ती जागा चक्क कुणाला तरी विकून टाकतो आणि स्वतः पुन्हा जुन्या जागीच झोपडी उभारून राहू लागतो. हा कामगार चाळखरेदीची मोठी रक्कम उभारणे जडच होते !

कामगारांच्या मध्यमवर्गियांच्या राहत्या घराचा प्रश्नच आज मुंबईचे फार मोठे आव्हान होऊन बसलेला आहे. एका वरिष्ठ नगरपालिका अधिकाऱ्याने मला चक्कच सांगितले– " अगदी खरे सांगायचे सोमणसाहेब, तर तुमची ही मुंबई– हिला लोक ' सुंदर नगरी ' का म्हणतात तेच कळत नाही. इथली निम्मी जनता आज अक्षरशः मृत्यूच्या छायेत वावरते आहे. ह्या चाळींच्या, झोपड्यांच्या, स्लम्सच्या प्रश्नावर मला एकच उपाय दिसतो. इथली सारी वस्ती वर्ष दीड वर्षासाठी तुर्भ्याच्या टेकड्यांवर तंबूमधून हलवावी आणि मग ह्या वस्त्यांवर दोन–चार बॉम्बस् टाकून सारा गिरणगाव जमीनदोस्त करावा. सरकारने साऱ्या जमिनीचा तावा घ्यावा अन् पुन्हा सारे गिरणगाव सुबकपणे बांधून काढावे.– " हाच अधिकारी पुढे म्हणाला, " अतिशयोक्तीचा भाग सोडून द्या. पण मूळ जागांचा प्रश्न निकालात निघाल्याशिवाय चाळीचा–झोपड्यांचा हा प्रश्न सुटणार नाही हे मात्र निश्चित ! पण सरकार काय किंवा नगरपालिका काय, कुणालाच ह्या प्रश्नाबाबत ठाम धोरण नको आहे. एखाद्या वर्गाला दुखवावे लागेल– त्याला कुणाचीच तयारी नाही. पडल्या चाळी तर येईल बघता असा सगळा खाक्या आहे. आजही, मी तुम्हांला सांगतो, की १९४८ च्या पातळीवर जागांचे भाव गोठवले गेले तर अनेक चाळ-सोसायट्या त्या जागा घ्यायला, त्यावरच्या मोडकळीस आलेल्या घरांची दुरुस्ती करायला पुढे येतील. आणि ह्या मार्गानेच हा प्रश्न समाधानकारक रीत्या सोडवता येईल. पण असे घडेल का हा खरा प्रश्न आहे ? "

ह्या प्रश्नावर शासनाचे मत असे दिसले की, विधानसभेत नव्याने मांडलेले दुरुस्ती–विधेयक चाळकऱ्यांचे बरेचसे प्रश्न सोडवू शकेल. पण अनेक कार्यकर्त्यांचे मात्र ह्याविरुद्ध मत दिसले. शिवाय

## शासनाचे दुर्लक्ष........

" मुंबईतल्या कामगार–मध्यमवर्गीयविभागात जवळ जवळ पाचसहा हजार चाळींना तावडतोब दुरुस्तीची आवश्यकता आहे. ह्यांपैकी काही यंदाच्या पहिल्या पावसाच्या तडाख्यानिशी कोसळल्या तर मला आश्चर्य वाटणार नाही. हा फार गंभीर प्रश्न आहे आणि भाडेकरू, मालक, नगरपालिका व सरकार ह्यांच्या संयुक्त हालचालींतूनच हा प्रश्न सुटू शकेल.

" ह्याच्याच जोडीला ह्या चाळकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नाने देखील अलीकडे गंभीर स्वरूप धारण केले आहे. पाणी नाही, म्हणून मुलांना गावी पाठवतो असे सांगत येणारे कित्येक कामगार आहेत.

" प्रश्नांची निकड जाणणे आणि त्यावर उपाययोजना करणे ही कळकळच शासनाजवळ नाही. त्यांचा गलथानपणाच ह्या प्रश्नांच्या उग्र स्वरूपाला कारणीभूत आहे.

**श्री. स. कृ. सरमळकर**
**बृहन्मुंबई भाडेकरू परिषद.**

मालकावर एकूण दुरुस्ती-खर्चाचा दहा टक्केच बोजा टाकला जात आहे ह्याला अनेकांचा विरोध दिसला. तर एका दुरुस्तीनंतर जर पुन्हा चाळ मोडकळीस आली तर जागेसह तिची मालकी सरकारकडे जाईल ह्याला अनेक मालकांचा विरोध दिसला. एका चाळमालकाशी ह्या प्रश्नावर बोलण्याचा योग आला. तो म्हणाला, "आमच्या चाळीमंदी तर काय मानगड नाय. आमी दुरुस्ती करतो, भाडेकरू मदत करते. भाडंबी वाढवून देते. पण मी म्हणतो, जर चाळ अगदी खराब झाली असली, अन् भाडेकरू पैसा देत नसला तर, सात-दहा-बारा रुपयांमध्ये त्या मालकांनी कुठून पैसा आणावा दुरुस्तीसाठी? एखाद्या मालकानि जर मग जागेचे ३०० रु. वार पैसे मागितले तर तुमी काय म्हणून नाव ठेवते? सरकार नाय पाच-सहा हजार रुपये वारानी जागा विकत? "


चाळीचे-चाळकऱ्यांचे प्रश्न असे विविध होते. दहा बाय दहा किंवा बाराच्या खोल्यातून सरासरी आठ-दहा जणांचे संसार उभे होते. कुठे शेदोनशे बिऱ्हाडांना पाच-सहा संडास होते. एक-दोन नळ होते. नळांना कधी अर्धा तास तर कधी तासभर पाणी येत होते. उघडी-नागडी, नाक वाहणारी पोरे कुणी शाळेत जात कुणी नाही. रोगराई, उपासमार, मारामाऱ्या- रोजचीच दृश्ये ही! त्यातच आता, चाळी-चाळीच्या नाक्यावर मटक्यांचे अड्डे! पूर्वी बेवडा होता. आता राजरोस खुली झालेली ताडी आहे. एका कामगाराने-भिवा मल्हारने-सांगितले, ' किती पोरे दाखवू तुम्हांला शाळेतनं येता जाताना ताडी पिऊन झिंगून येणारी? " ह्यातच कित्येक ठिकाणी- का, बऱ्याचशा ठिकाणी चाळीचे सांगाडे केव्हा कोसळतील ह्याचा नेम नव्हता! अशा ह्या भयाण यमपुरीत लक्षावधी कामगार ओढून-ताणून जीवन जगत होते- जगत आहेत! जणू त्यांच्या साऱ्या आशा-आकांक्षा कुणी समूळ उपटून फेकून दिल्या होत्या. पंधरा-वीस दिवसांतल्या भ्रमंतीत हेच दृश्य वारंवार दिसले, मनावर ठसले! कुठे कुठे चाळकमिट्या स्थापन झाल्याचे समजे. पण बऱ्याच ठिकाणी अफरा-तफरी, आपसांतली भांडणे ह्यांमुळे ह्या कमिट्यां-कडून काहीच कार्य होताना दिसत नव्हते. जिथे चालू असलेले दिसले, तिथल्या कार्यकर्त्यांचे शासन, नगरपालिका, कामगार-नेते वगैरेविषयीचे अनुभव चीड आणणारेच ठरले. खोजाच्या चाळीचे 'श्रमिक-नगरा'त रूपांतर घडवून आणणारे श्री. गायकवाड सांगत होते, "एवढे भव्य काम होत असताना सरकारी यंत्रणे-कडून मात्र आम्हांला सहकार्य मिळाले नाही. प्रचलित सरकार, संबंधित मंत्री, अधिकारी वर्ग ह्यांना आमची व्यथा सांगितली. परंतु कोणीही आमच्याकडे आस्थे-वाईकपणे पाहिले नाही. सचिवालय, नगरपालिका यांचे उंबरे आम्ही अनेक वेळा झिजविले, परंतु निराशेशिवाय काहीच पदरी पडले नाही. आर्थिक मदत तर दूरच राहिली. मुंबई भाडेकरू संघ, परिषद ह्यांच्याकडे तर कधी आम्ही गेलोच नाही, किंवा त्यांचे मार्गदर्शनही मिळाले नाही. हे श्रमिक-नगर लोकांचे कष्ट आणि पैसा

ह्यांच्या जोरावर तयार झाले आहे- इतर कुणा-कुणाचे साहाय्य आम्हांला लाभले नाही ! ”

आणि श्री. गायकवाडांचा हा अभिमान सार्थही होता. खोजाच्या चाळीचे कामच गिरणगावातल्या इतर अनेक चाळींना स्फूर्ती देईल असे झाले होते. १९०४ साली पाडायची नोटीस बजावली गेलेली चाळ, पासष्ट वर्षे दुरुस्तीशिवाय उभी होती. मालक बघत नव्हता, चाळकरी हालत नव्हते. चाळ अगतिकपणे उभी होती-दोघांपैकी कुणीतरी पुढे सरसावण्याची वाट बघत ! शेवटी मानवांतल्या पुरुषार्थानेच हे आव्हान स्वीकारले. बघता बघता दमदार पायावर उभी असलेली संघटना उभी राहिली. कायदा-कानूची फिकीर न करता तिने कंबर कसली. भाडे थांबवले



**जिच्यामुळे खोजाची चाळ जागी झाली......**




**कालची खोजाची चाळ**

गेले. पैसा उभारला गेला. सव्वादोन लाखांचे काम सुरू झाले. आज श्रमिकनगर दिमाखाने उभे राहत आहे—श्रमिकांच्या एकजुटीच्या बळावर अन्य कुणाच्याही सहकाराशिवाय ! ! धडपडीच्या काळात काही वाटचाला आलेच असले तर तो असहकार होता—मालकाचा, सरकारचा, नगरपालिका अधिकाऱ्यांचा. पण त्या सर्वांतून तावून सुलाखून ही चाळ पुन्हा नव्या जोमाने उभी राहत आहे. अजून देणी बाकी आहेत. दुकानांना जागा देऊन काही रक्कम उभी केली आहे. बाकी खर्च संपेपर्यंत भाडी द्यायची नाहीत असे ठरवले गेले आहे. अजूनही काही प्रश्न आज चाळीपुढे शिल्लक आहेत. कोर्टात चालवायची केस, शैक्षणिक—सांस्कृतिक कार्यक्रम हाती घेणे—वगैरे वगैरे. पण ह्या एकंदर कार्यामुळे गिरणगावातल्या पडक्या चाळींपुढे एक

आदर्श उभा केला गेला आहे हे निश्चित. आज खूपजण काम बघून जात आहेत, अनेक विचारणा होत आहेत.

" हा प्रश्न केवळ कामगारांचा राहू नये तर सर्वच समाजाचा प्रश्न व्हावा. ह्या प्रकारची दुरुस्ती–चळवळ व्यापक बनली पाहिजे. कामगारांना भेडसावणारा हा पडक्या चाळींचा प्रश्न सफेद कॉलरवाल्या मध्यमवर्गीयांनाही भेडसावतो आहे. त्यांनीही ह्या चळवळीत भाग घेतला पाहिजे. आमचा इथला हा प्रयोग ' खोजाच्या चाळी 'पुरता मर्यादित न राहता एक व्यापक प्रश्न बनला पाहिजे, त्यातून एक उग्र आंदोलन उभे राहिले पाहिजे, अशी आमची इच्छा आहे. समाजातल्या सर्वच थरांनी, ह्या चळवळीला उचलून धरले पाहिजे. " श्री. गायकवाड शेवटी म्हणाले. ह्या प्रयोगाचे व्यापक आंदोलनात रूपांतर करण्याच्या दृष्टीने मुंबईतील जुन्या चाळकऱ्यांची एक परिषद, ' श्रमिक–नगरां 'ची संपूर्ण उभारणी झाल्यावर बोलावण्याची त्यांची कल्पना आहे. त्यांच्यासारखी हजारो ' श्रमिक–नगरे ' मुंबईत तयार व्हावीत ह्यासाठी ते प्रयत्नरत होणार आहेत.

खोजाच्या चाळींचे नविनीकरण होत असताना बऱ्याच अडचणी आल्या. काही किरकोळ बनवाबनवीच्या प्रकारांनाही त्यांना तोंड द्यावे लागले. ह्या सर्वांतून



आजचे श्रमिकनगर



हजारो श्रमिक नगरे
उभारली जावीत ... श्री. गायकवाड

ते तावून-सुलाखून निघाले ते केवळ त्यांच्या अभेद्य एकीमुळे व जिद्दीमुळेच.

चाळ दुरुस्तीच्या एकंदर प्रश्नाविषयी बोलताना त्या भागातले इंटक व काँग्रेसचे एक कार्यकर्ते व माजी नगरपिते श्री. गोविंदराव हुले म्हणाले, "पक्षीय प्रश्न बाजूला ठेवून सर्वांनी एकत्रित येऊन कार्य करणे हीच खरी निकड आहे. ४९९ कलम ह्या बाबतीत फारसे उपयुक्त ठरले नाही, किंवा नवीन घर-दुरूस्ती विधेयकही फारसे उपयोगी पडणार नाही...वास्तविक चाळीची दुरुस्ती करणे हे खरे निकडीचे कार्य आहे-चाळी पाडण्याचे हुकूम सोडणे हे नाही! चाळी पाडल्यानंतर पर्यायी जागा उपलब्ध करून द्याव्या लागतात. मालवणीसारख्या दूरच्या उपनगरांत जागा देणे म्हणजे कामगारांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे करणे आहे...पर्यायी जागा जवळपास उपलब्ध करून देणे महापालिकेला, सरकारला परवडणारे नाही-निदान जमिनी ताब्यात घेतल्याशिवाय तरी! आणि म्हणूनच मालक-भाडेकरूंना सहकार्य देऊनच दुरुस्त्या करवून घेणे आवश्यक आहे. दुरुस्तीचा खर्च भाडेकरू ३५टक्के, मालक ४०टक्के आणि महापालिका अधिक किंवा सरकार २५टक्के असा वाटून घेतला जावा. जो कोणी अशा गोष्टींना विरोध करील त्याला शासन व्हावे."

ह्या प्रश्नावर मत व्यक्त करताना अशा तऱ्हेच्या दुरुस्त्यांची अनेक कामे करणाऱ्या आर्किटेक्ट वाळिब्यांनी दुरुस्ती खर्चावर मर्यादा असू नयेत असे सांगितले. त्याचप्रमाणे चाळ मालकांनाही दुरुस्तीच्या वेळी एफ्. एस्. आय्. वाढवून मिळावा असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादले. ह्यामुळे मालकाला जादा उत्पन्नाची हमी मिळून त्याचा विरोध मावळेल व मालक-भाडेकरूंच्या सहकार्यातून चांगले काम उभे राहील. परंतु एवढे करूनही जिथे मालकाचा विरोध असेल किंवा जिथे मालकाला अजिबातच शक्य नसेल तिथे मात्र वाजवी भावाने भाडेकरूंना चाळीचा ताबा दिला जावा व त्यांच्यामार्फत दुरुस्ती करून घेतली जावी. त्यांना त्या बाबतीत संपूर्ण अर्थसाहाय्य दिले जावे.

चाळीच्या दुरुस्तीच्या प्रश्नासाठी हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशच्या धर्तीवर एखादी महापालिका-सरकार ह्यांची संयुक्त योजना असावी, अशी एक कल्पना

चर्चेच्या ओघात पुढे आली. ह्या संस्थेने मालक व भाडेकरू ह्यांना दुरुस्तीसाठी दीर्घ मुदतीची कर्जे पुरवावीत, स्वतःचे बिल्डिंग सुपरवायझर्स नेमावेत व चाळींची दुरुस्ती, जवळ जवळ आवश्यक ठरवून, करवून घ्यावी अशी ही सूचना. ह्यासंबंधी बोलताना बहुतेक सर्वच नेत्यांनी, कामगारांनी ह्या संबंधांतली सरकारी तत्त्वे आधी निश्चित झाली पाहिजेत, असे सांगितले. अशी काही तत्त्वे निश्चित झाली तरच चाळ-कमिटयांना, कामगारांना पुढे येऊन कामे करता येतील. त्याचप्रमाणे ह्या सर्वच प्रश्नाच्या मुळाशी जागांचे वाढते भाव आहेत व ते कोणत्या तरी पातळीवर, शक्यतो १९४८ च्या पातळीवर, गोठवणे आवश्यक आहे ह्याबाबत सर्वांचे एकमत दिसले.

बृहन्मुंबई भाडेकरू परिषदेचे कार्यवाह व उजव्या कम्युनिस्टांचे प्रतिनिधी श्री. सरमळकर व नगरपित्या श्रीमती अहिल्या रांगणेकर ह्यांची मात्र ह्या सगळयाच प्रश्नांवरील मते कडवट वाटली. श्री. सरमळकर म्हणाले, "सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनी, भाडेकरूंच्या प्रतिनिधींनी एकत्रित येऊन हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न केला पाहिजे; त्यासाठी सरकारवर दडपण आणले पाहिजे." नगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर श्रीमती रांगणेकर आदींनी कडाडून हल्ला चढवला. "जेवढा पैसा प्रत्यक्षात घर-दुरुस्त्या, स्लम-क्लिअरन्स वगैरे योजनांसाठी मंजूर केलेला असतो, तेवढा खर्चच ह्या योजनांवर होत नाही. नगर प्रशासक वेळोवेळी सांगतात की, महापालिकेजवळ

## सामाजिक प्रश्नाकडे दुर्लक्ष

"कामगार हा राष्ट्राच्या, समाजाच्या पाठीचा कणा आहे असे आम्ही मानतो. आणि म्हणूनच राष्ट्रियीकरण नव्हे, तर आजचे कारखाने त्यात राबणाऱ्या कामगारांच्या मालकीचे व्हावेत. कामगारांना कारखान्यांच्या नफ्या—तोटयात वाटा असावा, ही आमची धारणा आहे.

कामगारांच्या आर्थिक मागण्यांसाठी चळवळी झाल्या, आंदोलने उभी राहिली. मात्र त्यांच्या सामाजिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यात आले हे खरे आहे. त्यांच्या घराचे प्रश्न, शिक्षणाचे प्रश्न वगैरेबाबत कामगार संघटनांनी काही प्रयत्न केले असते, सरकारी सहकार्य मिळाले असते तर ह्या प्रश्नांना चालना मिळाली असती हेही खरे. आता असे प्रयत्न करायचा आमचा मानस आहे. पण अपुरे द्रव्यबळ व कार्यकर्त्यांचा तुटपुंजा संच पाहता ह्या गोष्टीला वेळ लागेल!"

**किशोर देशपांडे**
**भारतीय मझदूर संघ.**

पैसा नाही. पण त्याच वेळी मरीन लाईन्स विभागात अत्याधुनिक व त्याही १०–१२ च संडास-मुत्र्या बांधायसाठी २१ लाख रुपयांची योजना सादर केली जाते. वर्गीय राजकारण महापालिकेत आणू नये, असे सगळेच सांगतात, पण ते हे असे येते ! वरळी नाका ते प्रभादेवी ह्या औद्योगिक पट्ट्यातले अठरा प्लॉटस् कामगार वसाहतींसाठी महापालिकेने ताब्यात घ्यावेत, असा ठराव मंजूर झाला होता. पण आता मात्र 'पैसा नाही' म्हणून ह्या ठरावाला बगल द्यायचे पद्धतशीर प्रयत्न चालू आहेत. इथे 'पैसा नाही' हे खरे कारण नाही, तर तिथल्या उद्योगपतींचा दबाव हे खरे कारण आहे. चर्चगेट ते फाऊंटन रहदारीचा प्रश्न सोडवण्यासाठी ओव्हर-ब्रीज बांधावा (२१ लाख रुपयांची योजना) अशी सूचना आहे. वास्तविक त्याहीपेक्षा फार मोठा रहदारीचा प्रश्न लालबाग, परळ, दादर इथे भेडसावतो. पण हे भाग मोडतात कामगार विभागातले ना—म्हणून इथे साऱ्या योजना मागून, कधी काळी जमल्यास !

"शासन असो, महापालिका असो, कुणालाच ह्या प्रश्नांची खरी नड नसते. पैसे-वाल्यांच्या विभागांत सारी कामे भराभर होत असतात, इकडे मात्र शून्य ! म्हणूनच इथे पाहिजे प्रखर आंदोलन !"

चाळींचे प्रश्न, नवे चाळ-दुरुस्ती विधेयक वगैरेंवर बोलताना श्री. सात्रीकरांनी ह्या विधेयकांतर्गत नवीन यंत्रणेची जी सूचना केली गेली आहे, तिला विरोध दर्श-विला. नगरपालिकेच्या अखत्यारातला हा प्रश्न आहे व त्यांचे ह्याविषयी काम करणारे स्वतंत्र खातेही आहे. मग ही नवीन, स्वतंत्र यंत्रणा निर्माण करायचे कारण काय ? त्यापेक्षा नगरपालिकेवर अधिक जास्त जबाबदारी टाकून त्यांनाच ह्या प्रश्नाची संपूर्ण दखल घ्यायला सांगितले जावे, असे मत त्यांनी मांडले. श्री. वाळिंबे, श्री. किशोर देशपांडे आदी म्हणाले, "ही योजना राबवली जायला हरकत असू नये, पण त्यासंबंधी सरकारने काटेकोर धोरण मात्र आखायला हवे. नाहीतर कामगार विमा योजनेप्रमाणे प्रकार घडू लागले तर सारी योजनाच कोसळायची." श्री. गायकवाड आदी कार्यकर्त्यांनी चोख काम व्हावे, अशी अपेक्षा व्यक्तविली. नाहीतर गृहनिर्माण मंडळासारखी ओरड व्हायची व सगळ्यांचा पैसा, श्रम फुकट जायचे, अशी कित्येक मते वेगवेगळ्या मंडळींनी या प्रश्नावर मांडली. □

# ३


# सहकार

त्या सर्वच प्रश्नांतून एक धागा निश्चित हाती लागला. तो म्हणजे मालक-भाडेकरू ह्यांचे सहकार्य झाले तर बरेसचे प्रश्न सहज सुटू शकतील. परंतु असे सहकार्य फारच कमी ठिकाणी पाहायला मिळाले. बृहन्मुंबई भाडेकरू परिषदेच्या कार्य-कर्त्यांच्या वतीने काही ठिकाणी असा समझौता घडवून आणून चाळ दुरुस्त करून घेतली गेली. आणि पुलराणी चाळ, लोअर परेल, राधानिवास, दादर, मिरांडा–मॅन्शन, लालबाग वगैरे ठिकाणी अशी कामे झाली. ह्या श्री. विजय पौंडवाल, श्री. तावडे मास्तर, श्री. राजा शेटकर आदींच्या नेतृत्वाखाली त्या त्या चाळींच्या मज-बूत संघटना उभ्या राहिल्या. त्यांनी पुढाकार घेऊन त्यात काही पैसा उभा केला, मालकाशी बोलणी केली, दोघांचे सहकार्य घेतले आणि चाळींची स्वरूपे पालटली. ह्या बहुतेक ठिकाणी भाडेकरूंनीही स्वखुशीने भाडेवाढीला संमती दिली. मालक-भाडेकरूंमधल्या उत्तम सहकार्याचे उदाहरण मात्र खरास चाळीत (एलिफन्स्टन रोड) पाहायला मिळाले. ' क्रॉस चाळ ' ह्या नावाने ही चाळ ओळखली जाते.

मुंबईतल्या अनेक जुन्या चाळींप्रमाणे ह्या चाळीचे मालक श्री. कमरुद्दीन हसन अली हे देखील ' बोरा-मुसलमानच. ' आठ-दहा महिन्यांपूर्वीच त्यांच्याकडे ह्या चाळीची मालकी आली. ह्याशिवाय ह्यांच्या आणखी चार चाळी मालकीच्या आहेत. त्यांपैकी चुनाम लेन, ग्रँटरोडवरील गांधी बिल्डिंग त्यांनी अशीच भाडेकरूंच्या सहकार्याने दुरुस्त करून दिली. तिथे त्यांनी चाळकऱ्यांकडून काही रक्कम 'गुडविल' म्हणून घेतली, व त्याशिवाय दुरुस्तीनंतर २५% भाडेवाढ केली. चाळकऱ्यांनी त्यांना आनंदाने सहकार्य दिले. भेंडी बाजार विभागातली पाखमोडिया इस्टेट-मधली जबलपूरवाला चाळ, निजाम इस्टेट चाळ वगैरे चाळीही त्यांनी नुकत्याच दुरुस्त करून घेतल्या होत्या. ' क्रॉस चाळी 'ची मालकी घेतेवेळी चाळीची परि-स्थिती खूपच खराब होती. जुन्या मालकाची परिस्थितीही अगदीच हलाखीची होती. दुरुस्ती कित्येक वर्षांत का, कधीच म्हणाना, झाली नव्हती. श्री. शिवय्या, श्री. पांडुरंग गाडेगावकर आदींच्या नेतृत्वाखाली चाळकमिटीची स्थापना झाली होती. भाडेकरूंकडून पैसा गोळा करायला सुरुवात झाली होती तोच ' शेठ ' बदलले. चाळ-कमिटीच्या लोकांनी नव्या मालकाशी बोलणी केली. आपसात सारे ठरले—भाडे

करूंनी मालकाला, दुरुस्तीसाठी ४४ हजार रुपये ३ वर्षांसाठी विनव्याजी द्यावेत. मालकांनी बाकीची भर घालून, जवळजवळ ९० हजाराचे ते दुरुस्ती काम पूर्ण करावे दुरुस्तीनंतर भाडेकरूंनी २०% भाडे वाढवून द्यावे वगैरे अटी ठरल्या. इथले बहुतांश भाडेकरू गिरणीकामगार आहेत. तरीही काहीतरी करून, सर्व भाडेकरूंनी मिळून सहा महिन्यांत रक्कम उभी केली. आता काम सुरू झाले आहे, बरेचसे पूर्णही होत आले आहे. त्यात आणखी एक विशेष असा की, मालक स्वतः जातीने कामावर लक्ष देत आहे, कॉंट्रॅक्टर वगैरेवर अवलंबून नाही.


ह्या एकंदरच प्रश्नाच्या स्वरूपाविषयीही मी श्री. कमरुद्दीन हसन अली ह्यांच्याशी



एल्फिन्स्टनरोड स्टेशनजवळील जीर्णावस्थेतील ही खरास चाळ

बोललो. ते म्हणाले, " हे प्रश्न परस्परसहकार्यानेच सोडवणे जरूरीचे ठरते. मालकांनीदेखील फार मोठी हाव न धरता अत्यंत आवश्यक तेवढीच भाडेवाढ करून चाळी दुरुस्त कराव्यात. काही काही ठिकाणी मालकाची परिस्थिती अगदीच बेताची असते. भाडी १०–१५ रुपये. त्यातून टॅक्सेस, खर्च वजा जाता त्याला पोटापुरेसेही मिळत नाही. मग त्याच्याकडून दुरुस्तीची अपेक्षा कशी करता येईल ? अशा वेळी चाळकऱ्यांनी मालकाला मदत केली पाहिजे. मुख्य म्हणजे भाडेकरू-मालक ह्यांनी परस्परांना समजावून घेऊन आपसातले संबंध सुधारले पाहिजेत. अशा तऱ्हेच्या कामांसाठी एखादा सार्वजनिक फंड असावा त्यातून आवश्यक तिथे भाडेकरूंना व चाळमालकांना चाळदुरुस्तीसाठी नाममात्र व्याजाने कर्ज मिळावे " असे त्यांनी सुचवले. 'हिजबूल इमान' व 'दाउदी बोरा मर्चंट अॅसोसिएशन' ह्या दोन अशा कर्ज देणाऱ्या संस्था त्यांच्या बोहरी समाजात आहेत असेही त्यांनी सांगितले. श्री. अलींचं हे मत मी पुढे अनेकांना सांगितलं. अनेक चाळकरी–झोपडवासी कामगारांनी अशा फंडाच्या उभारणीसाठी समाजातल्या प्रगत वर्गांनी, पुढाऱ्यांनी पुढे यावे असे सांगितले, अनेकांनी असा फंड कितपत यशस्वी होईल ह्याविषयी शंका प्रगट केली, तर अनेक नेत्यांनी ह्यावर मौनच पाळले. बोहरी समाजाला वरील दोन संघटनांतर्फे मिळणारी कर्जे बिनव्याजी व दीर्घ मुदतीची असतात; व ती काही धंद्यासाठीही मिळू शकतात हे ह्या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

ह्या चाळीच्या कार्यकर्त्यांनाही काही वाईट-साईट अनुभव आले. विशेषत: प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अडवणुकांचे. परंतु सर्वांतून ते आज पार पडले आहेत. शिवसेनेचे नगरपिते श्री. वसंत तावडे व प्रि. मनोहर जोशी ह्यांचेही आम्हांला चांगले साह्य मिळाले असे श्री. शिवय्या ह्यांनी सांगितले. "मालक सहकार्य द्यायला तयार आहे नं, मग फारसे अडवणुकीचे धोरण तुम्ही स्वीकारू नका. थोडयाबहुत तुमच्याही अटी शिथिल करा. जिथे जिथे तंटे ह्या पद्धतीने सुटत असतील तिथे तिथे ते असेच सुटले पाहिजेत. एखादा अगदीच आडमुठा भेटला तर इलाज नाही. " प्रि. मनोहर जोशींनी चाळकमिटीच्या सदस्यांना दिलेला सल्ला !




आज झपाट्याने बदलत आहे.

दुरुस्तीनंतर काही सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे हाती घ्यायचे आहेत असे कार्यकर्त्यांनी सांगितले !

मालक-भाडेकरूंचे सहकार्य झाले तर हे प्रश्न चुटकीसरशी सुटतील हे खरेच, पण असे सहकार्य अपवादात्मकच पाहायला मिळते आणि असे सहकार्य मिळाले असूनही भाडेकरूंनीच आडकाठी आणल्याची एक चमत्कारिक हकीकत आर्किटेक्ट श्री. वाळिंबे ह्यांनी सांगितली. फणसवाडीतली एक चाळ मालकांनी दुरुस्तीला काढली. कोयनेच्या भूकंपानंतर ह्या चाळीच्या भिंती अक्षरश: तिरप्या होऊन लगतच्या इमारतीच्या भिंतीला भिडल्या होत्या. दुरुस्तीचे काम सुरू झाले. दुसऱ्या मजल्यावरील एका भाडेकरूने ह्या दुरुस्तीला हरकत घेतली. त्याच्या कल्पनेप्रमाणे दुरुस्तीनंतर त्या खोलीला पुरेसा प्रकाश मिळणार नाही असे त्याला वाटत होते. हरकतीचे कारणही हेच होते. शेवटी कोर्टामध्ये श्री. वाळिंबे व स्वत: मालक ह्यांना त्या भाडेकरूला असे लेखी लिहून द्यावे लागले की, त्याच्या खोलीतल्या खिडकीचा आकार कायम राहील. सूर्यप्रकाश सध्या आहे तेवढा तरी निश्चितच कायम राहील. ह्या प्रसंगावर न्यायाधिशांनीदेखील आश्चर्योद्‌गार काढले. कारण त्यांच्या मते, आधी मालक स्वत: होऊन दुरुस्त्या करत नाहीत. एखादा समजूतदार मालक अशी दुरुस्ती करू लागला आणि त्याला भाडेकरूनेच आडकाठी घेतली तर तो शुद्ध मूर्खपणाच म्हणावा लागेल.

दुरुस्तीच्या वेळी भाडेकरूंचे संपूर्ण सहकार्य असले पाहिजे हे अर्थात ओघानेच आले. विशेषत:, जेव्हा मालकाच्या विरोधात जाऊन, ४९९ खाली किंवा इतर कुठल्या मार्गांनी हे कार्य करायचे असते, तेव्हा अशा सहकार्याची फार मोठी आवश्यकता असते. नाहीतर आपसांतल्या मारामाऱ्या, काही भाडेकरूंचा असहकार ह्यामुळे कमिटीप्रमुखांना त्रास तर सहन करावाच लागतोच पण त्याचबरोबर कामही रेंगाळत राहते, असा स्वानुभव ना. म. जोशी मार्गावरील 'हशम बिल्डिंग'चे चाळ-कमिटी प्रमुख श्री. माळगावकर ह्यांनी सांगितला. ह्याही ठिकाणी मालकाचा चाळ दुरुस्तीला संपूर्ण विरोध होता व आहे. चौसष्ट भाडेकरूंनी शेवटी स्वत:ची संघटना उभी केली आणि १९६३ पासून निधीची जमवाजमव करायला सुरुवात केली. एकदोन वर्षांपूर्वी सव्वा लाखाचे काम सुरू केले. काम वास्तविक बऱ्हंशी पूर्ण होत आलेले आहे, पण काही भाडेकरूंचे मतभेद झाल्याने त्यांनी दुरुस्तीवर स्थगिती आणण्याचा प्रयत्न केला. जमा करावयाच्या पैशांच्या हप्त्यांवरून मतभेद होता. कुणाला त्यांच्या खोल्यांतली दुरुस्ती कमी असूनही हप्ता इतरांएवढाच बसल्याने ती दुरुस्तीच नको होती. भांडणे पोलिसांपर्यंत गेली होती. शेवटी श्री. हुल्यांनी मध्यस्थी करून पुन्हा समेट घडवून आणला. पण ह्या सर्व भानगडीमध्ये पैसा जमायला, काम पूर्ण झाल्याचा दाखला मिळवायला विलंब झाला. नियमानुसार काम पूर्ण झाल्याचा दाखला मिळवल्याशिवाय ४९९ खाली भाडे थांबवता



खरास चाळीचे मार्गदर्शक व मालक श्री. शिवय्या, श्री. गाडेगावकर

येत नाही. अर्थात ह्या गोष्टीमुळे सर्व इतर गोष्टींना विलंब लागलेला आहे. ह्या प्रसंगाविषयी बोलताना श्री. हुले म्हणाले, "त्या विरोध करणाऱ्या व्यक्तीचा मला इतका राग आला होता की, जर त्या व्यक्तीने आपला हेका आणखी काही काळ सोडला नसता, तर मी त्याच्या दोन थोबाडीत ठेवून दिल्या असत्या."

ह्या चाळीतले आणखी एक वैशिष्टय म्हणजे ह्या चाळीच्या तळमजल्यावर नगरपालिकेची प्राथमिक शाळा आहे. वास्तविक चाळीतला सर्वांत मोठा भाडेकरू नगरपालिकाच असल्याने, खुद्द तिनेच ह्या दुरुस्तीप्रकरणात पुढाकार घ्यायला हवा होता. पण प्रत्यक्षात घडतंय मात्र नेमकं उलटं. दुरुस्ती काम सुरू करताना नगरपालिकेने आपला वाटा (तिथे शाळा आहे म्हणून) ह्या नात्याने १५,००० रुपये चाळ-कमिटीला दिले. आता चाळीतल्या मानगडींची कल्पना असताना, काम पूर्ण झाल्याचा दाखला मिळालेला नसल्याचे माहीत असतानादेखील नगरपालिकेने आपले पंधरा हजार रुपये तरी परत मिळावेत किंवा पाच वर्षांची भाडेबंदी तरी चालू व्हावी ह्यासाठी चाळ-कमिटीकडे तगादा लावलेला आहे. ह्याविषयी व नगरपालिकेच्या आणि प्रशासनाच्या एकूण अनुभवाविषयी श्री. माळगावकर, श्री. हुले आदींनी अत्यंत कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली. ह्या चाळीतही ४९९ खाली असलेल्या तरतुदींपेक्षा अधिक खर्च झालेला आहे. हा खर्च अर्थातच चाळकरी स्वतः-मध्ये वाटून घेणार आहेत.

कामगार-भाडेकरूच स्वतःच्या किंवा आपल्या इतर बांधवांच्या पायावर धोंडा पाडून घ्यायचे कृत्य करायला कसे सरसावतात ह्याचेही एक उदाहरण श्री. हुले ह्यांनी सांगितले. त्या वेळी ते नगरपिते होते. महापालिकेत अधिकारावर होते. एक चाळकरी कामगार एकदा त्यांच्याकडे आला. त्याची मुलगी नगरपालिकेत कामाला

होती. तिच्या नावावर नगरपालिकेच्या चाळीतून त्याला जागा हवी होती. त्यासाठी त्याने श्री. हुल्यांना सांगितले की, तो ज्या चाळीत राहत होता ती चाळ ' राहण्या-योग्य नाही, ' असा दाखला त्यांनी त्याला द्यावा. त्या दाखल्याच्या आधारावर तो नगपालिकेच्या चाळीतील जागा मिळवू पाहत होता. पण त्याच वेळी तो त्या चाळी-तील इतर शेकडोंच्या जीवनाशी खेळत होता, ह्याचा त्याला कल्पना नव्हती. त्या चाळीचा मालक चाळ पाडायचा हुकूम मिळवायलाच टपलेला होता. श्री. हुल्यांच्या किंवा कुठल्याही नगरपित्याच्या अशा दाखल्याचा आधार घेऊन त्याला तो हुकूम केव्हाही मिळवता आला असता !

मुंबईतल्या बऱ्याचशा चाळी अशा आहेत की, ज्या आज तरी दुरुस्तीपलीकडे गेल्या आहेत, किंवा तशाही अवस्थेत दुरुस्ती करायचीच म्हटले तर दुरुस्तीचा खर्च काही लाखांच्या घरात जाणार आहे. अर्थात ४९९ खालील तरतुदींचा तिथे उपयोग होणे जवळ जवळ कठीणच ! अशा चाळींबाबत काय केले पाहिजे की, जेणेकरून त्या दुरुस्त तरी होतील वा चाळकऱ्यांचे पुनर्वसन होऊन कामगार जगताला भेडसाव-णारा हा प्रश्न थोडा तरी सुसह्य होईल, ह्याबाबतची काही मते वर आली आहेतच. बरीचशी चर्चेच्या ओघात पुढे येतीलही. परंतु आज अशाही कित्येक चाळी आहेत की, ज्यांची अद्याप फारशी खराबी झालेली नाही. ह्या चाळींकडे आजच लक्ष दिले गेले तर, मला खात्री आहे की ह्या चाळींचे आयुष्य आणखीन वीस-पंचवीस वर्षे तरी वाढेल. त्यामुळे निदान ह्या चाळींच्या प्रश्नांची भर तरी सध्या अगदी मोडकळीला आलेल्या चाळींच्या प्रश्नांत पडणार नाही. अशा चाळी-इमारती नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी शोधून काढल्या पाहिजेत. तिथल्या चाळकऱ्यांच्या संघटना बांधल्या पाहिजेत. मालकांना आताच जागृत केले पाहिजे. आणि हे फार तातडीने घडले पाहिजे. हे घडले नाही तर उद्या ह्या चाळीही मुंबईच्या समस्या भयानक रीतीने वाढवतील ! ह्या बाबतीत मिरांडा चाळीचा आदर्श ठरावा !

चाळीस भाडेकरूंची ही दुमजली चाळशिवाजी पार्कला डी. एल्. वैद्य रोडवर उभी आहे. श्री. परब ह्यांच्या नेतृत्वाखाली इथली संघटना बांधली गेली. दुरुस्त्या थोड्याच होत्या, पण त्याही करून द्यायला मालक तयार नव्हते. शेवटी धावपळ करून ४९९ खाली दुरुस्ती करून घ्यायची परवानगी महापालिकेकडून त्यांनी मिळविली. पैसे गोळा केले. काम केव्हाच पूर्ण झालंय. आज ही चाळ दिमाखाने उभी आहे. निदान आणखी काही वर्षे तरी ताठ उभे राहायचे सामर्थ्य वेळीच घेण्यात आलेल्या निर्णयामुळे तिला प्राप्त झाले आहे. वेळीच निर्णय घेतल्याचा आणखी एक फायदा म्हणजे ४९९ खाली मंजूर असलेल्या तरतुदींतच त्यांचे सगळे दुरुस्तीचे काम झालेले आहे. शिवाय यातायातही खूपच कमी पडली.

[ पान ७६ वर पाहा. ]



रखरखीत उन्हातून जाणाऱ्या बायका सरलाबाईंनी स्वयंपाक करता करता पाहिल्या. हातामध्ये पूजेचे सामान घेऊन प्रत्येकीने भरजरी रेशमीशालू नेसला होता. होता होईतो जास्तीत जास्त दागिन्यांनी मढलेल्या स्त्रिया दिसत होत्या. प्रत्येकीने मानाने मिरवायचा होता तो सौभाग्य टिळा फक्त. वटसावित्रीचा दिवस तो. सौभाग्य टिळा टिकून राहण्यासाठी सगळीचे मागणे.

# सौभाग्य टिळा

अशोक गोखले

वटवृक्षाच्या छायेतच राहण्याची इच्छा असणारी भावना प्रत्येकीच्या मनात तरळत होती. किती मंगल दिवस. " या दिवशीच सौभाग्याचे मरण आले तर ..या मंगल दिवशी असा अशुभ विचार शुभ म्हणून मनात तरी कसा आणायचा सरला" बाई थोड्या शहारल्या. दचकून त्यांनी स्वतःला सावरले. वासंतीबाई देशपांड्यांचे घर हे. डोळ्यांतून येऊ पाहणाऱ्या आसवांना त्यांनी पदराने

पुसले. पदराने वारा घेत त्यांनी भाजी चिरायला सुरुवात केली. वासंतीबाई पूजेला जाता जाता सांगून गेल्या होत्या, " सरलाबाई, आज मस्तपैकी बेत करा. ह्यांना बटाट्याची भाजी फार आवडते आणि पाकातले चिरोटेदेखील करायचे आहेत आज. पूजेहून आल्यावर हे जेवतील. माझा आज उपासच आहे. मी यईपर्यंत सगळे करून ठेवा. नंतर तुम्ही जा पूजेला."

सरलाबाईंनी मान हलवनच होकार दिला. परंतु शेवटच्या वाक्याने त्यांचे मन शहारले. स्मृतींचे जळमट पाल पडावी तसे पडले. काय अधिकाराने मागायचे हे सौभाग्याचे जिणे? माधवराव वेडे झाले त्या दिवशीच आपण विधवा झालो होतो. नुसता जीव आहे म्हणून जगतो आहोत. बिनवल्ह्याची नाव हिंडते आहे–फिरते आहे. वाटेल तशी. या प्रवासामध्ये मंजू आपल्याबरोबर नसती तर खुशाल उडी घेतली असती मृत्यूच्या जबडचात. मंजू आता मोठी झाली आहे. मागल्या वर्षी ती बी. ए. झाली तिच्या नोकरीला वर्षदेखील झाले. वर्षे कशी फुलपाखराने उडत घालवावी तशी गेली. तिला चांगले स्थळ मिळाले की......सरलाबाई चमकल्या... चांगले स्थळ?...त्यांचे मन स्वतःशीच हसले...खिन्न. माधवरावांचे स्थळ मिळाले तेव्हा सरलाबाईंचे वडील किती आनंदात होते. सरलाबाईदेखील आनंदल्या होत्या. मैत्रिणींच्या चिडवण्याने बेजार झाल्या की त्या खूप हसत. नकळत त्यांच्या गालावर रक्तिमा चढे. तो मात्र त्यांच्या मनातल्या गुलाबाला फुलवीत होता. त्या गुलाबाला त्यांनी तसेच जपले.

लग्नानंतरचे दिवस तर अगदी तरंगत्या लाटांसारखे गेले. त्या दिवसांत त्या मनातल्या गुलाबाचा रंग अगदी तांबूस झाला होता...बहरून आलेल्या नव्हाळी-सारखा. माधवरावांबरोबरचे ते दार्जिलिंगचे दिवस आठवले, की एक मोहकशी थंड झुळूक आल्यासारखे त्यांच्या मनाला वाटते.


कामे भरभर आटपायची होती... कुकर चुलीवर चढवला होता आणि त्यातून येणाऱ्या वाफेकडे सरलाबाईंनी पाहिले. त्यातून माधवरावांची पुसटशी मूर्ती वेडे-वाकडे हातवारे करीत त्यांना बोलावत होती. साऱ्या दुनियेवर संतापलेले माधवराव ...पैसे खाल्ल्याच्या आरोपाने बडतर्फ झाले आणि त्याचा परिणाम त्यांच्या डोक्या-वर झाला. मंजूचा जन्म झाला तेव्हा सरलाबाईंचे मन थोडे खट्टू झाले; कारण, माधवराव सरलाबाईंना म्हणायचे, " सरल, तू माझ्या आयुष्यात आलीस आणि माझ्या आयुष्यात गोड बदल घडवून आणलास. तू या घरात आलीस नि मी प्रमोशनवर गेलो. आता येणाऱ्या पाहुण्याचा पायगुण लागला तर मी मोठा अधिकारी होईन. मुलगा पाहिजे हं मला. चांगला माझ्यासारखा...धट्टाकट्टा आणि तुझ्यासारखा सुंदर." माधवरावांनी सरलाबाईंच्या नाकाच्या शेंड्यावर टिचकी मारली. सरलाबाई तर लाजेने अगदी चूर झाल्या आणि त्यांच्या मनातला गुलाब त्यांच्या गालावर खुलला.

मंजूच्या जन्मानंतर सरलाबाई खट्टू झाल्या तरी माधवराव म्हणायचे, " अग सरल, एवढं वाईट कशाला वाटायला पाहिजे ? मुलगी तर मुलगी. म्हणतात नं, पहिली लडकी तूप रोटी. " आपल्याच विनोदावर खूष होत माधवराव खळखळून हसायचे. हसता हसता लालबुंद व्हायचे आणि त्यांच्या डोळ्यांतून पाणी यायचे. ते असे हसायला लागले की, सरलाबाई त्यांना म्हणत. " इतकं काय हसायचं ते ? आम्हा स्त्रियांना असं हसायचं का पुरुषांनी...जास्त हसत तरी काय राहायचं... वेडं म्हणतात लोक. " सरलाबाई रुसल्यासारखे बोलत.

त्यानंतर काही दिवसांनी माधवरावांवर पैसे खाल्ल्याचा आळ आला आणि तो खरा ठरवला गेला. तेव्हापासून माधवरावांच्या चेहऱ्यावरचे हास्य मावळले ते कायमचे. सकाळी थोडे खायला प्यायला मिळाले की ते बाहेर पडत आणि वणवण नुसते भटकत. सायंकाळी परतत...घराची आस होती म्हणून. परंतु त्यातले सुख पार दुरावले होते. मनातली खंत त्यांना खचवत होती. आपण पार दुबळे झाल्याची


तुमच्या चेहेऱ्याची नि सौंदर्याची काळजी घ्या

चिघकणारी मुरूमें नि पिंपल्स यांपासुन हमखास संरक्षण मिळवा



७ दिवसांची उपचार-योजना—फक्त २ रु.



Nital

नितल

मुरूम पुटकुळ्यावरील औषधि क्रीम

- जंतुनाशक औषधि द्रव्यांनी युक्त.
- वेळीच लावण्यास सुरवात केली तर पँच वा डाग राहात नाहींत
- फक्त २% इतका कमी गंधकाचा अंश असणारें एकमेव उत्पादन
- फक्त 'नितल' मध्येंच, व्हिटॅमिन 'एफ्' असतें की जे व्रण राहूं न देता मुलायम त्वचा निर्माण करतें.



प्रतिबंधात्मक उपचार

वृन्हमुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

त्यांना नेहमी जाणीव होई. आजूबाजूच्या लोकांनी काही दिवस दिलासा दिला पण तो दिलासा तरी किती दिवस टिकणार होता ?... खाणाऱ्या पोटाला अन्नाची आवश्यकता होती. सरलाबाई धीराच्या म्हणून संसारगाड्याचे धुरे त्यांनी आपल्या खांद्यावर घेतले. अगदी सहजतेने. त्याचेच फळ म्हणजे मंजू बी. ए. होऊन नोकरीला लागली होती. मंजू कधी कधी सरलाबाईंना म्हणायची, " आई, इतकं केलंस... आता मी कमावणार आणि तू नि बाबांनी मजेत राहायचं...आता काळजीचं कारण नाही. "

" अग मंजू, तू नोकरी करायची ती तुझा संसार सजवण्यासाठी...तू मिळविलेले पैसे बँकेत ठेवतो आहोत आपण. सर्व तुझ्या संसारासाठी आहे...माझा संसार मला सांभाळायचा आहे. " सरलाबाई समजावणीच्या स्वरात बोलत.

" नाही आई...असं असेल तर मी लग्नच करणार नाही. तुम्हांला दुःखाच्या खाईत लोटून मी गाद्यागिरद्यांवर लोळू शकणार नाही. " मंजू ताडकन बोले.

" अग, सुखदु:खांचं समीकरण बरोबर सोडवायचं असतं जे दुःख असं दुसऱ्याला वाटतं, ते कधीकधी सुख असू शकतं आणि जे सुख–सुख आपण म्हणतो, ते सुख फक्त शब्दरूपच असतं...नुसत्या वाफेसारखं. पण नशीबानं पाढे मात्र बरोबर म्हटले पाहिजेत. " सरलाबाई समज देत.

फर्रर्रऽऽ असा कुकरचा आवाज झाला. तशा सरलाबाई भानावर आल्या. कुकर झाला होता. भाजी करून सरलाबाईंनी चिरोटे केले. सगळे भरभर करायचे होते. अजून विमलताई बेडेकरांच्या घरचे व्हायचे होते.

वासंतीबाई परतल्या तेव्हा सरलाबाईंचे सगळे आटोपले होते. वासंतीबाईंनी एकदा स्वयंपाकाचे निरीक्षण केले. सर्व ठीक असल्याचे समाधान दिसल्यावर त्यांनी सरलाबाईंना थोडे आंबे दिले. ते सरलाबाईंनी पदरात बांधले आणि त्या चालू लागल्या, विमलताई बेडेकरांच्या घरी.

सारे आटोपायला दुपारचा एक वाजला. अजून घरचे आटोपायचे होते. माधवराव सायंकाळी येतील. सुंदरसा स्वयंपाक करून माधवरावांना वाढायचे आणि पूजेला जायचे. घरी आल्या तेव्हा मंजूने सकाळचा स्वयंपाक केला होता. तिच्यापुरता आणि माधवरावांसाठी केलेला उपमा तसाच झाकून ठेवलेला दिसला. " म्हणजे, आज हे तसेच बाहेर पडले म्हणायचे..." सरलाबाईंचे मन पुटपुटले. हे असे कधी झाले नाही. सरलाबाईंच्या काळजात चर्रर्र झाले. नकळत त्यांच्या डोळ्यांत आसू तरळले आणि त्या आसवांत माधवरावांच्या असंख्य प्रतिमा साकारल्या गेल्या.

" रडतेस काय वेडे...आजचा दिवस किती शुभ आणि रडतेस काय? " त्यांचे मन स्वतःशीच कुजबुजले.

त्यांनी ते आसू तसेच ओघळू दिले, गालावरल्या त्या गुलाबाला लाली चढावी म्हणून.

सायंकाळी माधवराव अचानकपणे परतले. आपल्या नेहमीच्या जागी बसून त्यांनी स्वतःला शून्यात गुरफटून घेतले. सरलाबाईंनी आपली बरेच दिवस बंद असलेली ट्रंक उघडली. शालू, नथ आणि कोल्हापूरच्या देवीचा मळवट असलेला कुंकवाचा करंडा...त्याभोवती सौभाग्याचा सुगंध दरवळत होता. सरलाबाईंनी माधवरावांकडे पाहिले. ते आपल्याचकडे पाहत असल्याचा भास त्यांना झाला... उगीचच.

"इश्य...हे असं काय पाहायचं सारखं...मंजूदेखील चांगली मोठी झाली आहे आपली...शोभत नाही या वयात हे..." सरलाबाईंचे तरुण मन बोलले...भूतकाळात घिरट्या घेणारे.


सौभाग्याचा साज चढविल्यावर त्यांनी करंड्यातला मळवट भरला...हातात पूजेचे सामान घेऊन सरलाबाई माधवरावांना म्हणाल्या, "मी पूजेला जाऊन येते." त्यांनी पदर डोक्यावर घेऊन माधवरावांना वाकून नमस्कार केला आणि त्यांच्या चरणधुलींना मळवटावरून फिरविले. माधवराव अजूनही शून्यातच पाहत होते... त्यांचे मन फुलपाखरांसारखे झाले असेल आणि फुलणाऱ्या गुलाबावर गुंजारव करीत असेल, असे सरलाबाईंना उगीचच वाटले.

सर्व बायका सरलाबाईंकडे वळवळून पाहत होत्या. "सरलाबाई या वयातही किती सुंदर दिसतात...चेहऱ्यावर कोल्हापूरच्या देवीचं तेज आहे अगदी. पण... काय दैवानं खेळ साधला कुणास ठाऊक! " दिलासा दाखवीत...त्या पुढे होणाऱ्या बायका बोलत.

सरलाबाई परतल्या तेव्हा माधवराव अंधारात अजूनही तसेच बसले होते... समाधी लागल्यासारखे. मंजू अजून ऑफिसातून परतली नव्हती...सौभाग्याचे जीवन किती मनोहर असते, या कल्पनेने त्यांचे मन मोहरले...फुलले. असेच मरण आले तर...देवा...एवढेच मागणे आहे तुझ्या चरणांशी. त्यांच्या मनातल्या पालीने चुक्चुक् केली.

अचानक हर्षाची एक कळ त्यांच्या छातीत आली आणि कसेतरी स्वतः सावरत त्यांनी माधवरावांना वाकून नमस्कार केला. परत हर्षाची असंख्य कारंजी मनातल्या मनात नाचू लागली आणि कळ वाढली...हृदयाची गती थांबवणारी...असह्य. सरलाबाई खाली कोसळल्या आणि माधवरावांच्यावरचे शून्याचे जाळे तुटले होते. खूप दिवसांनी ते असे जागले होते...पण खूप उशीर झाला होता. मोठ्याने हसत हसत त्यांनी सरलाबाईंच्या देहाला कवटाळले. त्यांचे हसणे वाढतच गेले...डोळ्यांतून पाणी येईपर्यंत...सुखापासून दुःखापर्यंत आणि दुःखापासून सुखापर्यंत. सर्वच संपले होते.

सरलाबाईंचा सौभाग्याचा टिळा दिमाखाने मिरवीत होता...सावित्रीचा टिळा होता तो. ○




लेखक **बिग्रेडिअर जे. पी. दळवी**

अनुवाद **ॲडव्होकेट माधव कानिटकर**


लेखांक **नऊ**

जानेवारी १९६२ मध्ये सातव्या पायदळ तुकडीचा कमांडर म्हणून माझी नियुक्ती झाल्याचा अधिकृत हुकूम मला मिळाला. माझे कॉर्पस कमांडर लेफ्टनंट जनरल विक्रमसिंग नाराज झाले. कारण लडाखमध्ये मी किती तल्लीन होऊन काम करत होतो ते त्यांना ठाऊक होते. मला सहजासहजी सोडायला ते प्रथम तयार नव्हते. पण काय करणार ? किती झाले तरी सरकारी हुकूम होता तो. शेवटी त्यांनी मला कळकळीची विनंती केली की, निदान आघाडीवरच्या लष्करी अधिकाऱ्यांसाठी दिल्लीमध्ये घेण्यात येणाऱ्या सभेला मी जावे आणि मगच सूत्र सोडून कमांडर म्हणून नव्या प्रदेशात रवाना व्हावे. त्यांच्या ह्या विनंतीचा मी आनंदाने स्वीकार केला. कारण त्या सभेच्या निमित्ताने मला D. M. O. (Director

............

**मला हे कळेना की धोला या ठिकाणी चौकी उभारण्याचा स्फोटक हुकूम दिला कुणी ? समोर ४०,००० चिनी सैनिक हातात शस्त्रास्त्रे घेऊन उभे आहेत, त्यांना फक्त निमित्त हवे आहे आणि आपले अवघे ४० जवान तिथे चौकी बांधणार होते.**

---

of Military Operations) ब्रिगेडिअर डी. के. पलित यांच्याशी सल्लामसलत करण्याची संधी मिळणार होती. ब्रिगेडिअर डी. के. पलित यांनी पूर्वी ७ व्या पायदळ तुकडीचे कमांडर म्हणून कामकाज पाहिले होते. जो प्रदेश मला अनोळखी आणि अपिरिचित होता त्याची त्यांना चांगलीच माहिती होती. माझ्यासारख्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची अशी मध्येच बदली करण्याबाबत लेफ्टनंट जनरल विक्रमसिंग नाखूष आहेत, हे ठाऊक असूनदेखील नाइलाजास्तव आणि D. M. O. श्री. डी. के. पलित यांच्याकडून नवीन माहिती मिळविण्यासाठी मी दिल्लीला रवाना झालो. श्री. डी. के. पलित या दयाळू, शांत प्रवृत्तीच्या आणि विचारी अधिकाऱ्याने मला अतिशय चांगले मार्गदर्शन केले. त्यांनी मला खाजगीत सांगितले की, " इतक्या लवकर चिनी पुढे येतील असे वाटत नाही. असे असूनदेखील ९/ पंजाब ही आपल्या जवानांची तुकडी डिसेंबर १९६१ मध्ये तावांगमध्ये का पुढे घुसवली आहे ते मला कळत नाही. डिसेंबरमध्ये तावांग येथे मरणप्राय थंडी असते. जवानांची राहण्याची आणि खाण्या-पिण्याची सोय सरकारने केलेली नाही. त्यांना पुरेसे अन्नवस्त्र टाकले जाईल इतपत एअर क्रॅफ्टस आपल्याकडे नाहीत. तावांग-मध्ये गल्यानंतर कमांडर या नात्याने तू परिस्थितीचा अंदाज घे. आणि ९/ पंजाब या ७ व्या पायदळ तुकडीच्या जवानांना खास आणि आवश्यक असे काही काम नसेल तर ९/ पंजाब ही तुकडी तू चक्क सुरक्षित ठिकाणापर्यंत मागे घे ! कारण आपले जवान लढता लढता मेले तरी चालतील पण ते भुकेने आणि थंडीने मरता कामा नयत. " मी श्री. पलित यांना विनयाने सांगितले की, "तावांगमध्ये माझ्या-पेक्षा वरिष्ठ असलेल्या G.O.C. ( General Officer Commanding ) ला मी तुमचा स्पष्ट सल्ला कळवीन आणि त्यांच्या परवानगीने आपले जवान

केवळ भुकेने मरणार नाहीत, याची काळजी घेईन." श्री. डी. के. पलित मला पुढे म्हणाले, "आघाडीवर गेल्यानंतर भूतान बॉर्डरवर नीट लक्ष ठेव. एरव्ही सध्या चिंता करण्यासारखे विशेष असे तावांगमध्ये काही घडले नाही."

आघाडीवर जाण्यासाठी २७ फेब्रुवारीलाच मी दिल्ली सोडली. वाटेतच मला ९/ पंजाब या तुकडीचे ऑफिशिएटिंग ब्रिगेड कमांडर लेफ्टनंट-कर्नल बैराम मास्टर हे भेटले आणि त्यांनी मला अधिक माहिती पुरवली (ऑगस्ट १९६५ मध्ये पाकिस्तानबरोबर झालेल्या लढाईत हे ब्रिगेडिअर बैराम मास्टर मरण पावले. आपण एक चांगला लष्करी अधिकारी गमावला.)

वाटेत रंगिया (Rangiya) या रेल्वे स्टेशनवर मी आलो. रंगिया हे जंक्शन आहे. तिथली परिस्थिती पाहून कमांडर या नात्याने मी थक्क झालो. रेल्वे प्लॅटफार्मवर जवान अस्ताव्यस्त पसरलेले होते. त्यांच्या सामानाचा पसारा बघवत नव्हता. हाडाच्या लष्करी अधिकाऱ्याला प्लॅटफॉर्मवर कचरा आणि घाण या गोष्टी सहन होत नाहीत. शिस्त आणि टापटीप ही लष्करातल्या माणसाने पाळलीच पाहिजे. मला राग आला. एक-दोन जवानांना मी दमात घेतल्याबरोबर त्यांनी सांगितले की, "साहेब, आमचा काही दोष नाही. इथे आमच्या आंघोळी होऊ शकतील, अशी पाण्याची व्यवस्था नाही. खायची-प्यायची सोय नाही. आघाडीवर जायचा हुकूम मिळायला पण कनेक्टिंग ट्रेनच नाही." काय बोलू शकणार होतो मी? माझ्या अंगावर काटा आला मनात म्हटले, आघाडीवर जाणाऱ्या जवानांची इथे ही अवस्था तर पुढे काय असेल?

नंतर जनरल चौधरींनी या बाबतीत लक्ष घातले. जवानांना पुढे घेऊन जाण्यासाठी खास गाड्या सोडल्या. रेल्वे प्लॅटफॉर्मवर जवानांची आबाळ होणार नाही याची खबरदारी घेतली.

तावांगमध्ये गेल्यानंतर मी ठरविल्याप्रमाणे G.O.C. मेजर जनरल अमरिकसिंग यांना D.M.O श्री. डी. के. पलित यांनी ९/ पंजाब या तुकडीबाबत व्यक्त केलेले विचार कळवले आणि त्यांना विचारले की, "९/ पंजाब ही तुकडी जवान भुकेने मरू नयेत म्हणून मागे घेण्याचा हुकूम देऊ का? तुमचे काय मत आहे?" त्यावर G.O.C. श्री. अमरिकसिंग, माझ्यावर एकदम गरम झाले! आणि म्हणाले, "काय मला हौस आहे म्हणून पंजाबी मी पुढे पाठविले आहेत? हेड क्वार्टरकडून मला जो हुकूम आला त्याप्रमाणे मी केलंय. 'हे असं का करता?' असे वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याला कधी विचारायचं नसतं हे ठाऊक नाही तुला? मी जो हुकूम देईन तो पाळावयाचा. त्या तुझ्या D.M.O. डी. के. पलितला म्हणावे की, आघाडीवरच्या जवानांच्या जीवांची तुला इतकी काळजी असली तर 'ती तुकडी मागे घ्या!' असा हुकूम हेडक्वार्टर, ईस्टर्न कमांडकडून घेऊन ये! मग मी तो पाळीन. तोपर्यंत आहे हे असंच राहील!"

मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण वृत्तीने जनरल अमरिकसिंग हा असा शीघ्रकोपी नव्हता. ते D.M.O. असताना आर्मी हेडक्वार्टरमध्ये मी त्यांच्या हाताखाली काम केलेले होते. उगाच आणि एकदम गरम होणाऱ्या लोकांपैकी जनरल अमरिकसिंग नव्हते. उलट त्यांची मूळ प्रवृत्ती अत्यंत शांत आणि घुमी होती. पण लवकरच माझ्या लक्षात आले की, त्यांच्या स्वभावात असा बदल होण्याचे मुख्य कारण म्हणजे पुढे काय होणार आहे ते ठाऊक होते व नेफामध्ये त्यांनी जे काम केले होते त्याचा त्यांच्या मनावर ताण पडला होता. त्यांना कदाचित असे वाटले असावे की, सरकारचे हुकूम म्हणजे गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ आहे. इथे जनरल म्हणून देशाचे आणि जवानांचे हित करायला गेलो तर आपला जनरल थिमय्या होईल. त्यापेक्षा वरून आलेला हुकूम जसाच्या तसा पाळलेला बरा ! जनरलल्ससुद्धा त्या वेळी अशा विमनस्क परिस्थितीत होते. माझे यथायोग्य स्वागत करून झाल्यानंतर G.O.C. अमरिकसिंग यांनी मला माझ्या कामाची सविस्तर माहिती मिळावी म्हणून मला G.S.O.I (General Staff officer, Grade I) लेफ्टनंट कर्नल मनोहरसिंग यांची भेट घ्यायला सांगितले. डिव्हिजनल ऑपरेशन ऑर्डरचा बारकाईने अभ्यास करून G.S.O.I मनोहरसिंग यांनी मला सांगितले की, येत्या काही महिन्यांत तुझे मुख्य काम असे काही आहे की, तावांगमध्ये आघाडीवर जाऊन काहीही करून (!) सरहद्दीवर आपल्या चौक्या उभारायच्या. या आपल्या लष्करी कारवाईचा परवलीचा गुप्त शब्द आहे. "ऑपरेशन ॐकार !" (Operation Onkar).

मी मागेच असे म्हटले आहे की, जनरल कौलनी फेब्रुवारी महिन्यात गौहत्ती येथे एक मिटिंग घेऊन त्यानंतर असा सक्त हुकूम दिला होता की, आघाडीवर पुढे जाऊन चौक्या बांधा ! फॉरवर्ड पॉलिसी ! G.S.O. I श्री. मनोहरसिंग मला पुढे असे म्हणाले की, "ऑर्डर स्पष्ट आहे आता उगाच वेळ घालवू नकोस. तावडतोब पुढे जा !"(जनरल थोरातांचे मत होते की तयारी नसताना उगाच पुढे जाऊ नका !)

...त्यानंतर AA & QMG (Asssstant Adjutant and Quarter Master General) यांच्याशी मी सल्लामसलत केली. त्यांनी मला सांगितले की, "विमानांतून टाकलेली रसद जवानांना बरोबर योग्य त्या ठिकाणी मिळावी यासाठी असलेलं यंत्र (supply dropping equipment) सध्या आघाडीवर आहे आणि त्या यंत्राचा सरंजाम शक्य तितक्या लवकर परत करा. त्याची दुसरीकडे जरूर आहे असा हुकूम वरून आलेला आहे. तू कमांडर या नात्याने स्वतः या बाबतीत लक्ष घाल. नाहीतर लफडचात येशील !"

माझ्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या प्रत्येक लष्करी अधिकाऱ्याने मला असे हुकूम दिले होते की, ते पाळावे तरी पंचाईत, न पाळावे तरी पंचाईत. आपले ९/ पंजाब या तुकडीतले जवान कदाचित थंडीने आणि भुकेने उगाच मरतील हे ठाऊक

असून ती मागे घ्यायची नाही. भूतान बॉर्डरवर लक्ष ठेवायचे. आणि स्वत: लक्ष घालून मदत पोचवण्याचे यंत्र परत करायचे. त्याचा परिणाम म्हणून माझ्या तुकडीतल्या जवानांना अन्न वेळेवर मिळाले नाही तर ? काय झाली असेल माझी मन:स्थिती ? याची नुसती कल्पना केलीत तरी पुरे.

माझी कमांडर म्हणून पहिलीच प्रतिक्रिया अशी झाली की, आपली लडाखमध्ये जी आणि जशी दुर्दशा होती तशीच याही आघाडीवर आहे. त्यानंतर दोन दिवस मी माझ्या तुकडीतल्या जवानांशी ओळख करून घेण्यात घालवले आणि माझ्या असे लक्षात आले की, मिसमारी या आपल्या ठिकाणी अडकून पडलेले जवान अजून सरहद्दी-पासून फार मागे आहेत. कारण तिथून पुढे वरून अन्न टाकून त्यांना पोसणे शक्य नव्हते. जवान पुढे जायला तयार आहे पण त्याला आपण पुढे पोसू शकत नाही. तो मागे अक्षरश: अडकून पडतो याला काय म्हणायचे ? फॉरवर्ड पॉलिसी ! आपल्याला ज्या प्रदेशात लढायचंय, एवढेच नव्हे तर तो प्रदेश लढवीत असताना कमांडर म्हणून जवानांना हुकम सोडायचे आहेत, तो प्रदेश आहे तरी कसा ? रस्ते कसे आहेत ? वाटेत काय काय अडचणी येतील ? हे एकदा पाहिलेले बरे, असा विचार करून मिसमारीपासून तावांगकडे मी जीपने निघालो. सुमारे ७,००० फूट उंचीवर असलेल्या चाक्को (Chacko) या ठिकाणी आम्ही चहासाठी थांबलो. तिथे काही फाटक्या तुटक्या झोपड्या माझ्या दृष्टोत्पत्तीस आल्या. काय होता त्या दरिद्री झोपड्यांचा अर्थ ? जवानांसाठी रेस्ट कॅम्प्स ! मला आपल्या साध्या भोळ्या जवानांची करुणा आली. काय हे ? या झोपड्यांना काय रेस्ट कॅम्प्स म्हणायचे ? इथे ही परिस्थिती ! तर पुढे तावांगमध्ये काय परब्रह्म असेल ? दुसऱ्या दिवशी मी ५,५०० फूट उंचीवर असलेल्या आपल्या डिरांग (Dirang) या ठिकाणी पोहोचलो. तिथे लेफ्टनंट कर्नल संधू (कमांडिंग ऑफिसर, टास्क फोर्स) यांनी एक इंजिनीयर या नात्याने त्यांचा स्पष्ट आणि सुबोध अहवाल दिला आणि सांगितले की, "इथे मोठा रस्ता बांधायला अडथळे येतात; कारण लष्करी ट्रक्स सहज आणि भरधाव जाऊ शकतील, असे रस्ते बांधायचे तर त्या रस्त्यांना भक्कम पाया घातला पाहिजे आणि पायासाठी लागणारे दगड इथे मिळत नाहीत. तरीदेखील तात्पुरते आणि अत्यावश्यक असे मोठे रस्ते शक्य तितक्या लवकर बांधायच्या कामात मी यशस्वी झालो आहे. कारण, कुठल्याही प्रकारच्या हवामानात टिकू शकतील असे पक्के आणि मोठे रस्ते बांधायला काही वर्षे लागतात ! नुसता पक्का आणि मोठा रस्ता बांधायला अनेक वर्षे लागतात हे दिल्लीपतींना ठाऊक नव्हते असे नव्हे ! संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांनी एकदा असा कबुलीजबाब दिला होता की, 'येत्या दोन वर्षांत भारत सरकारच्या सरहद्दीवर मोठे रस्ते बांधून काढण्याचा प्रयत्न करील (!) की जे रस्ते निर्माण करायला खरे म्हणजे बारा वर्षे लागतील !'

डिरांगहून आम्ही सेंज – सेला खिंड मार्गावरून तावांगकडे निघालो. वाटत भयानक चढउतार होते. वरून बर्फ पडत होते. आम्ही आता १३,००० फूट उंचीवर होतो. मला जीप सोडून देणे भाग पडले. कारण आपल्या इंजिनीयर्सनी बर्फ दूर करण्याचे भगीरथ प्रयत्न करूनदेखील जीप पुढे हलायला तयार नव्हती. १३,००० फूट उंच गेल्यावर कसे काय वाटते, हा अनुभव मला जन्मात प्रथमच येत होता. थंडीमुळे माझे दोन्ही पाय गोठून गेले. मला पाय नाहीतच असा मला भास होत होता. कारण माझ्या पायातले बूट १३,००० फूट उंचीवर जाण्याच्या लायकीचे नव्हते. पायाला मुंग्या आल्या किंवा पाय बधीर झाला तर तुम्हांला जे वाटते ना, ते मला केवळ थंड हवामानामुळे वाटले. तुमचा विश्वास बसणार नाही पण मला असे वाटते की, मानवी शरीरसुद्धा जिवंतपणीच गोठवून टाकणारा इतका थंड प्रदेश जगाच्या पाठीवर कुठे नसेल. तिथे सूर्य फक्त दोन तास दिसतो. एरव्ही अंधार. त्या वातावरणाची आणि हवामानाची चांगलीच सवय असलेल्या आणि खेचरावरून मालाची नेआण सहज करू शकणाऱ्या साध्या भोळ्या लोकांचा मला हेवा वाटला. त्या ठिकाणी प्राणवायू अत्यंत कमी प्रमाणात सापडतो. सबंध रात्रभर मी अस्वस्थ होतो, कारण मला नीट श्वास घेता येत नव्हता. ती





रात्र मी जागूनच काढली. नशीब एवढेच की, तिथून पुढच्या जांग या ठिकाणापर्यंत उतार होता. जांग या ठिकाणी आपली ९ / पंजाब ही तुकडी मला प्रथमच दिसली. ही तुकडी मागे घे असे D.M.O. श्री. डी. के. पलित का म्हणाले होते ते काल रात्री मला चांगलेच समजले होते. तावांग इथून पुढे फक्त ५ मैल होते. पुढे चिखलाचा समुद्र होता. मला घेऊन येण्यासाठी तावांगपासून मागे पाठवलेल्या जीपमध्ये मी बसलो. चिखल तुडवीत जीप निघाली आणि संध्याकाळी ६–३० वाजता दमल्या–भागलेल्या आणि केस पिंजारलेल्या अवस्थेत असलेला मी आघाडीवरच्या हेड क्वार्टर्स मध्ये कसाबसा पोचलो ! मिसमारी ते तावांग ह्या सैतानी प्रवासाचा अनुभव घेतल्यानंतर माझ्या अंगावर काटा आला. मी कमांडर असल्यामुळे प्रवासात मला मध्येच जीप, मध्येच खेचर...पुन्हा जीप या सर्व सोयी उपलब्ध होत्या. पण माझा जवान इथपर्यंत वाहनाशिवाय कसा बरे येईल ? इथे येईपर्यंतच जवान मेटाकुटीला येतील. अक्षरशः हात–पाय टेकत त्यांना मघला प्रचंड चढ चढून यावे लागेल. काय होणार जवानांचे ? कसा रस्ता होता वाटेत ? प्रथम ९००० फूट उंचीवर ईगल्स नेस्ट हे ठिकाण. नंतर आणखी १,००० वर फूट गेल्यानंतर बोम–दिला. नंतर एकदम खाली उतरायचे ते ५५०० फूट उंचीवरच्या डिरांग या ठिकाणी. पुन्हा वर चढायचे किती ? एकूण उंची १३,५०० फूट. तेव्हा लागणार रसेला खिंड. नंतर पुन्हा भयानक दरी. सरळ खाली उतरायचे ते ५००० फूट उंचीवर असलेल्या जांग या ठिकाणी. नंतर पुन्हा १०,००० फूट वर चढून खाली उतरायचे तेव्हा कुठे तावांग ! आणि इतकी दमछाक झाल्यानंतर अद्ययावत शस्त्रास्त्रे हातात घेऊन काहीही परिश्रम न घेतलेल्या चिन्यांशी आपला जवान लढणार होता. जितक्या सहज तुम्ही डास आणि ढेकूण मारता तितक्या सहज चिन्यांनी आपले जवान मारले. कारण आधीच ते अर्धमेले झालेले होते. हे लिहीत असताना माझ्या अंतःकरणाला काय यातना होत असतील ते माझे मलाच ठाऊक ! कारण, तुम्ही हे नुसते वाचता आहात. मी ते पाहिलेले आहे. वाटेत जवानांसाठी काहीही सोयी नव्हत्या. आश्चर्य एकाच गोष्टीचे वाटते की, नोव्हेंबर १९६१ मध्ये जनरल थापर आणि जनरल कौल ह्या दोघांनी हा प्रदेश पाहिला होता. किती कठीण मार्ग आहे, हवामान किती प्रतिकूल आहे, जवान वाटेतच मरतील हे त्यांना ठाऊक नव्हते असे कसे बरे म्हणता येईल ?...... आणि तरीदेखील आपल्या ' अनटोल्ड स्टोरी 'त तावांगपर्यंत रस्ता कसा आहे ? वाटेत किती हजार फूट उंचीचे चढउतार आहेत ? जवानांसाठी वाटेत काही सोयी होत्या का नव्हत्या ? याचा उल्लेख करायला जनरल कौल विसरले ! विसरले कसले ? त्यांनी ही माहिती देण्याचे जाणून बुजून टाळले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी तावांगची पाहणी केली. जवानांसाठी म्हणून बांधलेल्या झोपड्या इतक्या भिकार होत्या की, काही विचारू नका ! त्यातल्या त्यात

समाधानकारक अशी एकच गोष्ट तावांगमध्ये होती ती अशी की, तिथे वैद्यकीय मदत चांगली होती. १९६० पासून काम करीत असलेल्या M.S.U (Mobile Surgical Unit) ची मदत चांगली होती. मेजर जयरामन हा हुशार सर्जन तर पेट्रोमॅक्सची वत्ती लावून ऑपरेशनदेखील करीत असे. १९६१ पर्यंत २५ कॉटस असलेले एक हॉस्पिटल तिथे निर्माण झाले होते. या हॉस्पिटलचे X–Ray मशीन त्सेला खिंडीतून वर न्यायला १६ हमाल लागले होते. या लष्करी हॉस्पिटलचा फायदा तावांगमधल्या स्थानिक आणि अडाणी लोकांनादेखील चांगला होत होता. जन्मात कधी पाहिल्या नव्हत्या अशा सोयी आणि औषधे त्यांना आता मिळू शकत होती. या हॉस्पिटलवर ते लोक बेहद्द खूष होते. माझ्या मनात मात्र संशयाची पाल चुकचुकली की लढाई जर का सुरू झालीच तर चिनी हे हॉस्पिटल इथे टिकू देतील का ?

प्रथमदर्शनीच तावांग हा अतिशय नितांत रम्य प्रदेश आहे अशी माझी खात्री पटली. वाटले, तिथून हलूच नये. फक्त बघत राहावे ! तावांग या शब्दाचा अर्थच मुळी कुरण असा आहे. वरून खाली नुसते पाहिले मात्र अतिशय सुंदर झोपडयांची वस्ती असलेली ८ खेडी स्पष्ट दिसत होती. तावांगमध्ये वस्ती आहे ती मुख्यत: बौद्धांची. मठ, आश्रम, आणि विहार यांचा सुकाळ आहे. तिथले लोक पाहिले म्हणजे हा नाही धड चिनी, नाही धड तिबेटी, नाही इंडियन, की नाही गुरखा. साम्य असलेच तर ते मंगोलियन चेहऱ्याशी. पण श्रद्धा मात्र भारतावरच. त्यांच्या कपडयांचे हुबेहूब वर्णन करावयाचे तर अंगावर लाल रंगाचे लोकरीचे कपडे आणि डोक्यावर पाच गोंडयांची टोपी. मी त्यांच्याकडे जेव्हा जेव्हा पाहत होतो, तेव्हा तेव्हा मला त्यांचा हेवा वाटायचा. कारण खांद्यावर जड ओझी घेऊन ते सहज तुरूतुरू चालत आणि वाटेत एकमेकांची थट्टामस्करी आणि विनोद करीत. किती मजेत जीवन जगत होते ते. त्यांच्या गावात इंडियन आर्मी आल्यामुळे त्यांचे जीवनच बदलून गेले होते. त्यांच्यापैकी अनेकांना सरहद्दीवर रस्ते बांधण्याच्या कामी हमाल म्हणून नोकरी मिळाली होती. या लोकांना तावांगमध्ये मोंपा म्हणून ओळखत. मी लष्करात २५ वर्षे नोकरी केली. जगाच्या पाठीवर अनेक ठिकाणी फिरलो; पण मोंपांच्या इतकी आतिथ्यशील, नम्र तितकीच धीट, साधी सरळ आणि सहिष्णू माणसे मी कुठेच पाहिली नाहीत.

मोंपांच्या वागण्याच्या पद्धतीकडे पाहून मला असे वाटले की, कल्चर आणि मॅनर्स खरे म्हणजे शहरातल्या लोकांनी बॅकवर्ड ट्राईब्जकडूनच शिकले पाहिजेत. मोंपांची भाषा मला समजत नव्हती. दुभाषा घेऊन मी हळूहळू त्यांच्याशी दोस्ती करायला सुरुवात केली. कारण त्याशिवाय भारतीय लष्कराला आवश्यक ती मदत मिळाली नसती. त्यांच्या प्रमुखाला भेटायला जात असताना मी कमांडर आहे या अभिनिवेषात मला जाता येणार नव्हते. कारण त्या टोळीवाल्यांचा असा रिवाज होता की आमच्या



लेखकाच्या नव्या झोपडीचे खेंपोच्या हस्ते उद्‌घाटन, १९६२

नेत्याला प्रथम लीनतेने नमस्कार करा मग पुढच्या गोष्टी. तावांगमधला त्यांचा प्रमुख मठाधिपती होता खेंपो नावाचा त्यांचा धर्मगुरू. त्याला ते परमेश्वराचा अवतार मानीत. या खेंपोचे धर्मशास्त्रविषयक शिक्षण झाले होते तिबेटमध्ये. त्याच्या चेहऱ्यावर विद्वत्तेची आणि पावित्र्याची चिन्हे स्पष्ट दिसत होती. तो राहत असे तोदेखील आपल्या उच्चाधिकाराला शोभेल अशा इतमामाने. नशीब एवढेच की त्याची निष्ठा भारताशी निगडित होती. एक भारतीय लष्करी अधिकारी आपल्याला भेटायला येतोय हे कळल्यावरोबर नेहमीचा रिवाज मोडून आपला सगळा लवाजमा बरोबर घेऊन धर्मगुरू या पदाला शोभेल अशा थाटात तो मला समोरा आला. माझ्यासाठी नवीन झोपडी बांधून देण्याचा हुकूम त्याने त्याच्या भक्तांना दिला. आणि ज्या ठिकाणी माझ्यासाठी झोपडी बांधली जाणार होती त्या जमिनीवर उभे राहून त्याने डोळे मिटून मंत्र म्हटले. आणि ॐ शांतिः शांतिः शांतिः ! अशा अर्थाने सर्व दिशांना पाणी फेकले ! मी मध्येच विनयाने विचारले की, "महाराज ! हे काय करता ?" तेव्हा डोळे उघडून माझ्याकडे पाहत तो म्हणाला, "मित्रा ! दुष्ट शक्तींच्यापासून तुला धोका आहे. आकाशातल्या आणि जमिनी-

वरच्या सर्व अनिष्ट शक्तींना शांत करून मी तुला आशीर्वाद दिला आहे !"

असे हृदयस्पर्शी प्रसंग आणि नितांत रमणीय निसर्गसौंदर्य सोडले तर एरव्ही मात्र तावांगमध्ये मला कंटाळा आला. एकलकोंडेपणा घालवून टाकण्यासाठी पेपर हातात मिळत नव्हता किंवा वाचायला पुस्तके नव्हती. आपली अपुरी लष्करी तयारी, त्याचे संभाव्य परिणाम, माझ्या जवानांचे होणारे हाल, भारत सरकारने सरहद्दीकडे आत्तापर्यंत केलेले दुर्लक्ष याचा विचार करीत मी उदास चेहऱ्याने बसून राहत असे. नकळत माझ्या डोळ्यांत पाणी येत असे, ते या विचारांनी की, हा माझा तावांग आता चिन्यांच्या हातात जाणार आहे. आणि अनिष्ट शक्तींपासून माझे रक्षण व्हावे म्हणून मला आशीर्वाद देणाऱ्या ह्या देवभोळ्या माणसांच्या छातीत चिनी संगिनी खुपसणार !

पण मग असे नुसतेच अन्तर्मुख होऊन बसून चालणार नव्हते. माझ्यातला लष्करी अधिकारी माझे खंबीर मन जागृत करून मला इशारा देत असे की, अरे तुला काय संत व्हायचंय ? त्यासाठी आलास का इथे ? चल ऊठ ! वेळ फार थोडा आहे. लढाई झालीच तर काय करायचे याचा फक्त विचार कर.

मी मग स्वतःला कामात बुडवून घेऊ लागलो. पुढच्या तयारीच्या दृष्टीने मी कमांडिंग ऑफिसर्सबरोबर बैठका घेण्याचा सपाटा लावला. कमांडिंग ऑफिसर ही भारतीय लष्करातली अत्यंत महत्त्वाची व्यक्ती असते. कारण कमांडिंग ऑफिसर या नात्याने आपली तयारी कितपत चांगली आहे हे तोच सगळ्यांत चांगल्या तऱ्हेने सांगू शकतो. या महत्त्वाच्या जागेवरचा मनुष्य स्पष्टवक्ता असावा लागतो. नुसतेच 'यस सर !' करणारा तो शक्यतो नसावा. सुदैवाने माझ्या तुकडीतले कमांडिंग ऑफिसर्स स्पष्टवक्ते निघाले. युद्धशास्त्रात असे म्हटले जाते की, कुठलाही कमांडिंग ऑफिसर आपली लढण्याची तयारी नाही असे स्पष्ट सांगत नाही. पण एखादा कमांडिंग ऑफिसर खरे बोललाच तर कमांडरने त्याला तुच्छ लेखू नये; उलट त्याच्या धाडसी प्रामाणिकपणाचे कौतुक करावे. माझ्या तुकडीतल्या लेफ्टनंट कर्नल बी. एस्. आलुवालिया आणि लेफ्टनंट कर्नल मास्टर या दोघांनी अत्यंत प्रामाणिकपणाने सांगितले की, चिन्यांबरोबर सामना देण्याइतपत आपली तयारी झालेली नाही. लढाई झालीच तर आपली सेना सज्जड मार खाईल. त्यांच्या या प्रामाणिक कबुलीजबाबाचे मला कौतुकच वाटले. निदान माझ्या तुकडीचे कमांडिंग ऑफिसर्स तरी परिस्थितीबाबत अंधारात नव्हते. कमांडिंग ऑफिसरबरोबर विचारविनिमय करून झाल्यानंतर मी डिव्हिजनल ऑपरेशनच्या ऑर्डरचा बारकाईने अभ्यास सुरू केला. या पूर्वी कमांडर म्हणून यशस्वी कामगिरी बजावलेल्या ब्रिगेडिअर पलित आणि ब्रिगेडिअर रणवीरसिंग यांचे या बाबतीत काय विचार आहेत याचे काळजीपूर्वक मनन केले. कारण एखाद्या नवीन जागी नेमणूक झाल्यानंतर कामकाज सुरू करण्यापूर्वी आपल्या-

अगोदर या पूर्वी या खुर्चीत बसलेल्या माणसाचे विचार काय होते ? तो कसे काम करीत असे ? याचा विचारपूर्वक अभ्यास केल्याशिवाय तुम्हांला तुमचा नवीन हुद्दा सांभाळताच येणार नाही. आणि इथेतर काय ब्रिगेडिअर पलित ही युद्धशास्त्रातली अधिकारी व्यक्ती होती. त्यांनी युद्धशास्त्रावर लिहिलेली सुबोध आणि टीकात्मक पुस्तके परदेशांत प्रचंड संख्येने विकली जातात. जगातल्या प्रमुख राष्ट्रांच्या लष्करी अधिकाऱ्यांनी त्या पुस्तकांचे नुसते वाचन नव्हे तर पठण केलेले आहे हे आपल्या देशातल्या फारच थोड्या लोकांना ठाऊक असेल. पिकते तिथे विकत नाही या म्हणीचे अस्सल उदाहरण म्हणजे ब्रिगेडिअर पलित.

सातव्या पायदळ तुकडीला नेमून दिलेली कामे एकूण चार प्रकारची होती. ती अशी :—

१. सर्वप्रथम तावांगचे संरक्षण करा.

२. मॅकमोहन रेषेच्या आत चिन्यांना येऊ देऊ नका.

३. आसाम रायफल्सच्या चौकीची निर्मिती करा.

४. आसाम रायफल्सच्या चौक्यांना मदत करा.

ही अजब डिव्हिजनल ऑपरेशन ऑर्डर नुसती वाचली तरी तावडतोब लक्षात येत होते की, ही ऑर्डर संदिग्ध आणि पुस्तकी ज्ञानावरच आधारलेली आहे. ऑर्डर-मधली ही चारही कर्तव्ये फक्त एका ब्रिगेडला पार पाडता येणे शक्य नव्हते. कारण, माझ्या तुकडीतले १२०० जवान दररोज लाकडे गोळा करणे, झोपड्या बांधणे, असल्या अत्यावश्यक (!) कामासाठी लावले जात होते. त्यासाठी त्यांना २५०० फूट खाली उतरून पुन्हा काम संपल्यानंतर वर यावे लागत असे. एक बुल-डोझर जे काम थोड्या दिवसांत करू शकला असता त्या कामासाठी १२०० जवान सतत तीन महिने खपत होते. काय हा मनुष्यशक्तीचा नाश ! जवानांना युद्धाचे शिक्षण दिले जात नव्हते. उखळी तोफांच्या पथकाने गेल्या कित्येक महिन्यांत एकही बॉम्ब उडवला नव्हता. कारण निशाणबाजीची प्रॅक्टिस करण्यासाठी भरपूर मोकळी जागा लागते आणि मुलकी अधिकारी अशी जागा लष्कराला देऊ शकत नव्हते.

१/९ गुरखा रायफल्स ही आपली तुकडी अतिशय उत्तम होती. १९४३ साली इटलीमध्ये १९४८ साली काश्मीरमध्ये या तुकडीने अभूतपूर्व पराक्रम गाजवला होता. पण त्यानंतर १९६२ पर्यंत त्यांना विशेष कामगिरी दिली गेलेली नव्हती. रिकामटेकडेपणामुळे ते थकले होते. जून १९६२मध्ये या तुकडीतल्या जवानांना सुटी मिळणार होती. आणि केव्हा एकदा घरी जाऊन बायका-मुलांना भेटतो असे त्यांना वाटत होते.

९/पंजाब ही माझ्या अखत्यारातली दुसरी तुकडी होती. पण नको त्या वेळी

फार उंचीवर पाठवल्यामुळे या तुकडीचेदेखील हाल झाले. जवान पार थकून गेलेले होते.

१/सिख ही माझी तिसरी तुकडी फार मागे होती. कारण तावांगमध्ये या तुकडीचे पोषण करणे शक्य नव्हते. वस्तुत: एका ब्रिगेडमध्ये ३५०० माणसांपेक्षा जास्त माणसे असली तरच ती ब्रिगेड चांगली लढू शकते. पण पायदळ तुकडी क्रमांक ७ मध्ये नोव्हेंबर १९६१ मध्ये १७०० आणि सप्टेंबर १९६२ पर्यंत २४०० जवान होते. आणि त्यांपैकी मोजकेच जवान पुढे पाठवण्यात आले होते. कारण विमानांतून अन्न खाली टाकून सगळ्यांना पोसणे शक्य नव्हते. आघाडीवरचे जवान जगवायचे कसे हा प्रश्न आधी होता, लढाई नंतर. त्यामुळे तुकड्या कशा हलवायच्या, किती जवान पुढे पाठवायचे, त्यांची जमवाजमव कशी करायची याचा निश्चित आराखडा तयार करणे कठीण होऊन बसले. आपल्या आघाडीवर जाण्यासाठी निघालेल्या एका तुकडीला तर वाटेतच डिरांग या ठिकाणी लष्करी ट्रक सोडून देऊन सेला खिंडीपर्यंत चालत जावे लागले. कारण पेट्रोल संपल्यामुळे पुढे जायला ट्रक्स तयार नव्हते आणि वाटेत कुठेच पेट्रोल पंप नव्हते. आयत्या वेळी धांदल नको म्हणून तावांगमध्ये अगोदरच राखीव फौजा आणून ठेवा या माझ्या इशाऱ्याकडे भारत सरकारने दुर्लक्ष केले......कारण ? आहेत तेच जवान पोसता येत नाहीत तर राखीव फौजांना पोसणार कुठून ? एक स्टाफ ऑफिसर आणि कमांडर या नात्याने माझी निराशा झाली. याच अडचणीमुळे ७ व्या पायदळ तुकडीतले जे जवान फार मागे ठेवले गेले होते ते अडचणीत आले. कारण तावांगसारख्या १५,००० फूट उंचीवर असलेल्या ठिकाणचे हवामान त्यांना एकदम मानवले नाही.



तावांगच्या हवामानाशी जुळवून घ्यायचे तर जवान तिथे कमीत कमी सहा आठवडे तरी राहायला पाहिजे असे डॉक्टरांचे मत होते. एका अडचणीतून अनेक अडचणी निर्माण होत गेल्या त्या ह्या अशा. त्यामुळे झाले काय ? आघाडीवर आपल्या दोन बटालियन्स पाठवल्या आहेत असे भारत सरकारला वाटत असे तेव्हा आपली खरी लष्करी ताकद फक्त एका बटालियनची असे. कारण काही जवान रजेवर, काही पोसता येत नाहीत म्हणून मागे ठेवलेले, तर काहींना तावांगचे हवामान मानवले नाही म्हणून ते आजारी पडलेले. एका बटालियनजवळ कमीत कमी ८०० संगिनी लावलेल्या रायफल्स असाव्या लागतात. आपल्या एका बटालियनजवळ फक्त ४०० रायफल्स होत्या.

लढाई जिंकायची तर शत्रूच्या ताकदीचा आपल्याला अनुकूल असा अर्थ लावून चालत नाही. कारण, लढाई म्हणजेच धोका. प्रतिकूल तेच बहुधा घडेल असे धरून चालावे लागते. आपण असे धरून चालत होतो की, चीन सरहद्दीवर फार तर १ रेजिमेंटइतके सैन्य आणील. आपली एक ब्रिगेड म्हणजे चिन्यांची एक रेजिमेंट होती ! ... आणि आपला अंदाज तरीदेखील चुकलाच. कारण प्रत्यक्षात चिन्यांनी लढाईसाठी आघाडीवर सैन्य आणले होते २ डिव्हिजन्स ! चिनी सरकार त्यांच्या इतक्या प्रचंड सैन्याला पोसू शकत होते तर भारत सरकारला आपल्या एका ब्रिगेडला कसे पोसायचे याची चिंता पडली होती. १९४७ सालापासूनच सैन्य भरती, शस्त्रास्त्र खरेदी, दोस्ती करताना जरा मागचा पुढचा विचार भारत सरकारने केला असता तर चिन्यांच्या २ डिव्हिजन सैन्याला जबाब देण्यासाठी भारताचे ४ डिव्हिजन सैन्य सरहद्दीवर उभे राहिले असते... ! झुंड आपणदेखील करू शकतो ! आसाम रायफल्स या सातव्या पायदळ तुकडीच्या हुकमतीखाली असलेल्या तुकडीजवळ पुरेशी शस्त्रास्त्रे नव्हती तरीदेखील त्यांना हुकूम दिला गेला होता की, " Fight to the last man and the last round !" हातात शस्त्रे असल्याशिवाय ? बोलणे सोपे आहे, करणे कठीण आहे. माझी खात्री पटली की, तावांगमधल्या परिस्थितीची अजिबात कल्पना नसलेल्या आणि सरहद्दीपासून फार मागे असलेल्या कुणीतरी हा हुकूम काढला असला पाहिजे. सैन्यात सुसूत्रता आणि योजना लागते असे उगाच म्हटलेले नाही. आसाम रायफल्स या तुकडीला लढायचे होते ७ व्या पायदळ तुकडीबरोबर. पण एरव्ही त्या तुकडीवर आधिपत्य होते इन्स्पेक्टर जनरल ऑफ आसाम रायफल्सचे. आर्मी युनिट आणि आसाम रायफल्स पोस्टस यांना एकमेकांशी संपर्क ठेवता येत नव्हता. कारण, पुरेसे वायरलेस सेटस् आघाडीवर नव्हते. ही कार्यपद्धती चुकीची आहे असे प्रत्येकजण म्हणत होता, पण मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी ? प्रत्यक्ष लढाईपूर्वीच आणखी एक अडचण आली. ती येणारच होती, कारण शत्रूच्या प्रदेशात आपली अतिशय हुशार माणसे गुप्तहेर म्हणून घुसवावी लागतात. शत्रूची सध्या हालचाल काय चालली आहे, यावरून शत्रू

पुढे काय करील याचा अदाज लागतो आणि अगोदर तयार राहता येते. आपल्या आघाडीवरच्या कमांडर्सना आर्मी हेड क्वार्टर्सकडून या बाबतीत काहीच खबर मिळत नव्हती. इकडे काय चालले ते चिन्यांना तिकडे कळत होते. पण तिकडे काय चालले ते इकडे कळत नव्हते. कुठलीही गोष्ट डोके वापरल्याशिवाय करता येईल का ? चिनी काय करू शकतील याचा विचार करून लढाईची तयारी होत नव्हती तर आपण काय करू शकतो यावर अवलंबून राहून लढाईची तयारी चालू होती. लढाईच कशाला ? पत्त्यातला झब्बू खेळतानादेखील डोके लागते. आपल्या हाता-तल्या पानांवर अवलंबून राहून डाव खेळता येत नाही. दुसऱ्याच्या हातातल्या पानांचा अंदाज घ्यावा लागतो. तो अंदाज नसल्याने भारत सरकार गाढव ठरले.

ज्या प्रदेशाची जबाबदारी कमांडर या नात्याने माझ्यावर होती त्या प्रदेशाची टेहळणी करण्यासाठी मी स्वतःच बाहेर पडलो. वस्तुतः तावांगमध्ये येऊन मला अवघे वीस दिवस झाले होते. तिथल्या हवामानाची मला सवय झाली नव्हती पण एका गोष्टीची जाणीव झाली होती की, वेळ फार थोडा आहे. मी सर्वप्रथम मॅकमोहन रेषेपासून फार जवळ असलेल्या थांगला रीज विभागातील किंझमाने या ठिकाणी जायचे ठरवले. हेतू हा होता की प्रदेश कसा आहे ? रस्ते कसे असतील ? वाटेत कुठे पूल आहेत काय ? असल्यास ते कुठल्या स्थितीत आहेत ? काय रचना केली असता आसाम रायफल्स या तुकडीला ७ वी पायदळ तुकडी मदत देऊ शकेल ? हमाल कुठे मिळतील ? विमानातून जवानांसाठी खाली टाकल्या जाणाऱ्या पिशव्या जवानांना सहज मिळतील अशी ठिकाणे कुठे आहेत ? हे एकदा पाहावे. कारण पर्वतमय प्रदेशात कमांडर म्हणून हुकूम सोडण्यापूर्वी तो प्रदेश कसा आहे याची चांगली माहिती कमांडरला असावी लागते.

माझ्याबरोबर गुरखा पलटणीचे लेफ्टनंट कर्नल आलुवालिया निघाले. या प्रदे-शाची त्यांना चांगलीच माहिती होती. आमच्याबरोबर एक दुभाष्या घेऊन आम्ही निघालो. मी कमांडर असल्यामुळे माझ्यासाठी एका तट्टाची व्यवस्था केली गेली होती. त्या तट्टावर मी बसलोदेखील. पण लगच गोंधळलो, कारण एक खेडूत स्त्री त्या तट्टाचा लगाम घऊन पुढे चालू लागली. मला लाज वाटली ! पुरुषासारखा पुरुष मी ! मी घोड्यावर बसायचे आणि बाईने तो घोडा ओढायचा ! कसे दिसेल ते ? मी घोड्यावरून खाली उतरलो आणि भलतेच घडले. आपण चांगल्या हेतूने काही तरी करायला जातो आणि लोक अर्थाचा अनर्थ करून आपल्याला दूषण देतात. बाई रडायला लागली. मी बुचकळ्यात पडलो. दुभाष्यामार्फत चौकशी केली, तेव्हा दुभाष्या म्हणाला, " साहेब ! बाईंचे म्हणणे असे की, घोडा सोडून देऊन तुम्ही त्यांचा आणि त्यांच्या घोड्याचा अपमान केलात ! " एखाद्या पामर माणसा-सारखे हात हालवीत मी दुभाष्याला सांगितले की, " बाईंना सांगा की, माझा तसा हेतू नव्हता. उलट घोडा सोडून देऊन मी स्त्री जातीचा आणि घोड्याचा मान राख-

लाय ! कारण पुरुषांनी वर बसून बाईने तो घोडा ओढणे यातच बाईचा अपमान आहे असे मला वाटते." दुभाष्याने बाईंना समजावले आणि शेवटी मी थोडा वेळ घोड्यावर बसावे आणि मग तो सोडावा असे ठरले.

सुमारे १० मैल चालत गेल्यानंतर आम्ही थांग्लेन (Thonglen) या खेड्यात शिरलो. मी विचार केला की, गावबुराशी (पाटील) दोस्ती केलेली बरी. कारण जवानांना आवश्यक त्या वस्तू मिळणार होत्या त्या या खेडुतांकडून. जड लष्करी सामान वाहून नेण्यासाठी हमाल मिळावायचे होते ते त्यांच्याकडूनच. आणि सगळ्यांत महत्त्वाचा हेतू हा होता की, आघाडीवरच्या या खेडुतांना भारतीय लष्कर हे आपले आहे, जवान आपले आहेत असे वाटावे. त्यांची मने जिंकणे अत्यंत आवश्यक होते. आम्हांला लांबून पाहिल्याबरोबरच सगळा गाव स्वागतासाठी गोळा झाला. पाटील स्वतः समोर आले. त्यांच्या पद्धतीप्रमाणे आम्ही एकमेकांचे गळपट्टे बदलले. माझा त्यांना दिला आणि त्यांचा मी घेतला. गळपट्टे कसले ? अंतःकरणेच बदलली आम्ही. एका साध्या समारंभाने आम्ही दोघे एक आहोत ही भावना निर्माण झाली. गावकरी खूष झाले. पण अजून एक समारंभ बाकी होता. पाहुण्याने गावच्या प्रमुखाबरोबर दारू घेतली की पाहुणा पाहुणा राहत नाही. तो त्यांचा होतो असा त्यांचा समज आहे. आणि मला तर त्यांचाच व्हायचे होते. गावबुरा आणि मी आम्ही दोघे दारू प्यायलो. मोंपांचे आदरातिथ्य, मेहनतीची काम करण्याची सवय, त्यांच्या कलाकृती, त्यांचे चित्रविचित्र वेष, भोळ्या समजुती हे पाहून मी खूष झालो. आदिवासींच्या पूर्ण गणवेषातला मोंपा केवळ अविस्मरणीय आहे. खेड्याजवळ आर्मी आल्यामुळे त्यांची संस्कृती मात्र हळूहळू बदलू लागली. १९६२ पर्यंत केमांग फ्रॉंटियर डिव्हिजनवरचा हा मोंपा अदलाबदली करून वस्तू खरेदी करीत असे. रुपया म्हणजे काय ते त्यांना ठाऊक नव्हते. त्यांच्यापैकी काही लोक लष्करात हमाली करीत तेव्हा त्यांना पगार मिळे तो रुपयात. त्यांना कळत नसे की या कागदाचे करायचे काय ? अनेक मोंपांनी बांबूच्या नळकांड्यात नोटा भरून ठेवल्या होत्या. भारतीय लष्कराची उपस्थिती पाहून अनेक फिरत्या भूतानी व्यापारी प्रवाशांनी तावांगमध्ये बाजार उघडला, तेव्हा कुठे मोंपाला कळले की, बांबूच्या नळकांड्यात ठेवलेला तो कागद साधा नव्हे. त्या कागदात जादू आहे. तो दिला की भूतानी व्यापारी प्लॅस्टिकची बादली किंवा रंगीत टोपी देतो. मोंपांशी दोस्ती करण्याच्या कामात १/९ गुरखाज या तुकडीतल्या जवानांचा मला फार उपयोग झाला. कारण गुरख्यांना त्यांची भाषा येत असे. गुरखे येतात तेसुद्धा मुख्यतः याच प्रदेशातून. थांग्लेनपासून पुढे लुमला (Lumla) या खेड्यात गेलो आणि वाटेत अनेक छोट्या खेड्यांत आमचे स्वागत त्यांच्या पद्धतीप्रमाणे झाले. लुमलानंतर आम्ही शक्ती या खेड्यात पोचलो. इथे मात्र अनुभव वेगळा आला. शक्ती गावचा पाटील माझ्याशी नीट बोलेना. आणि गावचा प्रमुख काही बोलत नाही. म्हणून गावकरी बोलेनात.



आम्ही एकमेकांचे गळपट्टे बदलले

एखाद्या लहान मुलाने रुसून बसावे तसे पाटील रुसलेले. मी विचार केला, हे प्रकरण जरा वेगळं दिसतंय चुचकारून घेतले पाहिजे. नीट आणि आस्थेवाईकपणाने चौकशी केल्याबरोबर गावप्रमुखाने माझ्याजवळ तक्रार केली, तुम्ही लष्करातले लोक कामे करून घेता आणि पैसे देत नाही. दोन वर्षांपूर्वी इथे लष्कर आले तेव्हा त्यांना मी लाकडे विकली, माझी माणसे हमाल म्हणून दिली. त्याचे पैसे मला अजून मिळालेले नाहीत. सरहद्दीवरच्या या साध्या भोळ्यालोकांचा भारतीय लष्कराबद्दल असा गैरसमज होऊन कसे बरे चालेल ? मी ताबड तोब वर जनरलला या प्रकरणाचा रिपोर्ट दिला. आणि चौकशीअन्ती जनरलदेखील खवळला. कारण पैसे खरोखरच त्याला द्यायचे होते. पण काही तांत्रिक कारणांमुळे सरकारचे ऑडिट पूर्ण व्हायचे होते आणि म्हणून पैसे अडकले होते. मी स्वत: या बाबतीत लक्ष घालून शक्तीच्या गावप्रमुखाला त्याचे पैसे शक्य तितक्या लवकर मिळवून देऊन त्याचा विश्वास संपादन केला.

शक्तीपासून पुढे झिमिथांग (Ziminthaung) आणि तियून पुढे किझमनने आणि लुंपू (Lumpu) या ठिकाणी मी गेलो. वाटेत मला द्रोकुंग सांबा ब्रिज (Drokung Samba Brdige) हा प्रसिद्ध पूल लागला. माझ्या भावना दाटून आल्या. हा पूल साधासुधा नव्हता. या पुलाच्या पुढे २ मैल मॅकमोहन रेषा आहे आणि १९५९ मध्ये चिन्यांनी दंडेली करून आपल्या जवानांना मॅकमोहन रेषेपासून ढकलीत–अक्षरश: ढकलीत–दोन मैल मागे हटवले होते ते या पुलापर्यंत. कारण चिन्यांच्या मते भारताची सरहद्द या पुलाशी संपते. पुलाखालून रुंद पात्रातून

पाण्याचा जोरदार प्रवाह वाहत होता. पुलाखाली दगडांच्या कमानी होत्या. २० ऑक्टोबर १९६२ ला आपणच हा पूल उडवून द्यायला हवा होता. चिनी पुढे येऊ शकले नसते. वेळप्रसंगी एक मिनिटात सबंध पूल उद्ध्वस्त करून टाकणारा दारू-गोळाच आपल्याकडे नव्हता. दुर्दैव असे की, हा पूल जसाच्या तसा चिन्यांना हातात सापडला आणि याच पुलावरून चिनी सैन्यान दौडत येऊन भारतात मुसंडी मारली.

लष्करी डावपेचाच्या दृष्टीने बघता किझमाने हे ठिकाण फारसे उपयोगी पडण्यासारखे नव्हते. माझ्याबरोबर आलेल्या मुलकी अधिकाऱ्यांशी चर्चा करून मॅकमोहन रेषा नक्की कुठून कशी जाते याचा मी काळजीपूर्वक अभ्यास केला. माझ्या परतीच्या प्रवासात विशेष किंवा खास असे काहीच घडले नाही. माझ्या या टेहळणीमध्ये माझ्या फक्त इतकेच लक्षात आले होते की, वाटेत काही काही ठिकाणी रस्ता इतका अरुंद आहे की, जेमतेम जवानांना घेऊन फक्त घोडाच जाऊ शकेल. वाटेत काही काही ठिकाणी पूल आहेत. पण पूल म्हणजे साकव (बांबूंच्या आधारांचे पूल) आहेत. दगडी बांधकामाचे पूल नव्हते. या अडचणीमुळे जवानांना पुढे जाण्याच्या कामात अडचणी येतील. शक्ती आणि लुंपू ही ठिकाणे संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत., त्यानंतर एका आठवड्याच्या आत मी बुमला–तावांग सरहद्दीची पाहणी केली. कारण त्या ठिकाणापासून तिबेट हाकेच्या अंतरावर आहे. बुमला हे ठिकाण १४,००० फूट उंचीवर आहे. एप्रिलमध्येदेखील तिथे थंडी असते. तावांगच्या संरक्षणासाठी काय काय करावे लागेल याचा मी नीट अभ्यास केला.

ब्रिग्रेडिअर रणबीरसिंग यांनी यापूर्वीच १९६१ च्या नोव्हेंबरमध्ये जनरल थापर आणि जनरल कौल यांना ते दोघे तावांगची पाहणी करण्यासाठी आलेले असताना कल्पना दिली होती की, तावांगच्या संरक्षणासाठी आणखी सैन्य लागेल. ब्रिगेडिअर रणबीरसिंगांशी जनरल कौल सहमत झाले. पण ते अंमलात आणणे त्यांना जमण्यासारखे नव्हते. कारण आधीच आपले सैन्य कमी आणि त्यात आघाडी-वरच्या जवानांना आवश्यक तेवढे अन्न पुरवणे शक्य नव्हते. याचा परिणाम म्हणून सप्टेंबर १९६२ मध्ये तावांगच्या संरक्षणासाठी तावांगमध्ये १ बटालियन पाठवली गेली. १ बटालियन चिन्यांच्या १ डिव्हिजनबरोबर काय लढणार? तावांगमध्ये लढाई अशी झालीच नाही. चिनी सेना अक्षरशः मुंग्यांसारखी आत घुसली. समोर नजर टाकावी तर जमीन दिसणार नाही इतके चिनी. हां हां म्हणता चिन्यांनी भारताची भूमी व्यापून टाकली. माझ्या टेहळणीवरून मी एवढे शिकलो की, ७ व्या पायदळ तुकडीच्या आघाडीवरच्या जवानांनीसुद्धा हा अनोळखी प्रदेश एकदा नजरे-खालून घातलेला बरा. तरच त्यांना नीट लढता येईल आणि म्हणूनच ९ / पंजाब या तुकडीला मी आजूबाजूच्या भौगोलिक प्रदेशाची प्रत्यक्ष ओळख करून दिली. तावांग-मध्ये सैन्याची रचना वेगळ्या तऱ्हेने केली. तोफखाना कसा, कुठे आणि केव्हा आणायचा याच्या सूचना दिल्या. पण माझी ही सगळी तयारी फुकट गेली. कारण

आयत्या वेळी ह्या जवानांची दुसरीकडे बदली केली गेली आणि नवखे जवान तावांगमध्ये संरक्षणासाठी पाठवले गेले.

' ऑपरेशन ॐकार ' या परवलीच्या शब्दावर मला फॉरवर्ड पॉलिसी अंमलात आणायची होती. सरहद्दीवर पुढे जाऊन चौक्या बांधायच्या. प्रथमपासूनच माझे असे मत होते की, ही पॉलिसी चुकीची आहे. उदाहरणार्थ, धोला हे ठिकाण उघड उघड वादग्रस्त टापूत येत होते. तिथे चौकी बांधली की चिनी स्वस्थ बसणार नव्हते.

१९६० मध्ये वाटाघाटींसाठी आलेले चिनी अधिकारी पुन्हा पुन्हा सांगत होते की, मॅकमोहन रेषा धोला या प्रदेशातून जाते हे आम्हांला मंजूर नाही. अशा नाजूक ठिकाणी आपण आयत्या वेळी चौकी उभारणे कितपत शहाणपणाचे होते ? बरे एवढे करून ती चौकी लढवायची आपली ताकद नाही हे आपल्याला ठाऊक होते. मी हा प्रश्न उपस्थित केल्यावरोवर मला असे स्पष्ट कळवण्यात आले की, फॉरवर्ड पॉलिसी ही नॅशनल पॉलिसी आहे; आणि ती अंमलात आणण्याचे काम मुख्यत: आसाम रायफल्सचे आहे. तुला फक्त आसाम रायफल्सला मदत करायची आहे. काय बोलणार ? मला हे कळेना की, धोला या ठिकाणी चौकी उभारण्याचा स्फोटक हुकूम कुणी दिला ? समोर सुमारे ४०,००० चिनी सैनिक हातात अद्ययावत् शस्त्रास्त्रे घेऊन उभे आहेत, त्यांना फक्त निमित्त हवे आहे. धोला या ठिकाणी आपले अवघ ४० जवान या परिस्थितीत चौकी बांधणार होते ! ४०,००० विरुद्ध ४० ! याला काय लढाई म्हणतात ? याच संदर्भात सिव्हिल सुप्रीमसी (Civil Supremacy) म्हणजे काय ते बघू या. कारण, धोला या ठिकाणी चौकी उभारण्याचा निर्णय लोकनियुक्त प्रतिनिधींचाच होता. नोव्हेंबर १९६७ पर्यंत श्री. व्ही. के. कृष्णमेनन हे असे कबूल करायला नव्हते की, " १९६२ साली भारताचा जो पराभव झाला तो आमच्या चुकीच्या फॉरवर्ड पॉलिसीमुळेच. " 'स्टेटसमन्'च्या श्री. इन्द्र मल्होत्रांना मुलाखत देताना श्री. कृष्णमेनन म्हणाले, " मला याची जाणीव आहे की, काही लोकांच्या मते आमच्या फॉरवर्ड पॉलिसीमुळे आघाडीवर पुढेपर्यंत जाऊन चौक्या बांधण्याच्या धोरणामुळे जो प्रश्न वाटाघाटींनी सुटला असता त्याला वेगळे वळण लागले आणि चिन्यांनी तो प्रश्न शस्त्रबळावर सोडवला. भारताचा पराभव झाला कारण फॉरवर्ड पॉलिसी ! पण हे चूक आहे. कारण दुसऱ्याच्या प्रदेशात अन्यायाने घुसून चौक्या बांधणे हा फॉरवर्ड पॉलिसी या इंग्रजी शब्दाचा खरा अर्थ आहे. जी जमीन आमची नाही तीवर भारत कधीही घुसणार नाही. आमच्याच जमिनीत पुढे जाऊन चौक्या बांधणे याला खऱ्या अर्थाने फॉरवर्ड पॉलिसी असे म्हणता येणार नाही. उलट चीननेच फॉरवर्ड पॉलिसी स्वीकारून भारतीय हद्दीत चौक्या बांधल्या !" मेननसाहेब पुढे म्हणाले, " ते काही का असेना ! राजकीय नेतृत्वाचा विचार करता एखादा विशिष्ट प्रदेश लढवायचा का नाही ?

धोरण कुठले स्वीकारायचे ? चिन्यांना आपल्या हद्दीतून घालवायचे की नाही ? हे प्रश्न मूलतः राजकीय आहेत आणि राजकीय प्रश्नांचा निर्णय फक्त सरकारनच घ्यायचा असतो–जे सरकार लोकनियुक्त प्रतिनिधींचे असते–काय करायचे ते सांगायचा अधिकार फक्त सरकारचा आहे आणि सरकारी हुकूम कसा अंमलात आणायचा ते लष्करी अधिकारी बघतील. सरकार लष्कराला इतकेच सांगेल की अमूक एक ठिकाणाचे संरक्षण करा किंवा अमूक एक ठिकाण सोडून द्या.

मेननसाहेब ! जाहीर सभेत जर का असे बोलला असतात तर खवळलेल्या राष्ट्रवादी भारतीय जनतेने तुम्हांला तिथेच सांगितले असते की, भारतीय जनता, भारत सरकार आणि भारतीय सेना यांच्यांतला विसंवाद सहन करू शकत नाही. कुठलेही ठिकाण सोडून द्यायला भारत सरकारचे लोकनियुक्त प्रतिनिधी तयार होतील, पण भारतीय जनता मात्र ही कल्पना कदापि–कदापि सहन करणार नाही !

डोके शांत ठेवून अशी कल्पना करू की, भारताच्या घटनेप्रमाणे भारत सरकार हे भारतीय लष्करावर अनभिषिक्त हुकूमत चालवू शकते. तरीदेखील प्रश्न असा उपस्थित होतो की, धोला या ठिकाणी चौकी उभारण्याचा हुकूम देत असताना भारत सरकारने परिस्थितीचा काय अभ्यास केला ? कुणी दिला धोला या ठिकाणी चौकी बांधण्याचा हुकूम ? कारण पंतप्रधान या नात्याने पंडित नेहरूंचा हुकूम स्वच्छ आणि स्पष्ट असा होता की, " जी ठिकाणे आपली आहेत अशी आपली खात्री आहे तिथेच चौक्या बांधा ! " अशा परिस्थितीत धोला या ठिकाणी चौकी बांधायचा हुकूम कुणी दिला ? व्ही. के. कृष्णमेननने ? मिनिस्ट्री ऑफ एक्सटर्नल ॲफेअर्सच्या अधिकाऱ्यांनी ? गृह खात्याच्या इंटेलिजन्स ब्युरोचा फॉरवर्ड पॉलिसी-बाबत सल्ला घेतला जात असे, त्यांनी दिला हा हुकूम ? कुणी दिला ? कुणी ?...

(क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi.
Thacker& Co. © with the Original Publisher.

## ☐ पापड लाटणारा फॉरीन एक्स्पर्ट

एअर इंडिया विमान-कंपनीने आपल्या हवाई सुंदरींसाठी साडीच्या ऐवजी सलवार-कमीजचा नवीन गणवेश तयार केला आहे व हा पोषाख खास एका फ्रेंच बाईकडून तयार करून घेण्यात आला आहे. आता माझ्यासारखा गावठी माणूस म्हणेल सलवार-कमीज हा पंजाबी पोषाख, तेव्हा दिल्ली-पंजाबकडचा एखादा शिंपी तो शिवू शकला असता. पण तसे नाही. " महाराजा " ! हिंदुस्थान सरकारने पोलादाचा कारखाना कसा चालवावा किंवा पेट्रोलची रिफायनरी कशी उभारावी असल्या क्षुल्लक गोष्टींपासून पाव कसा भाजावा आणि गुरे कशी वळावी असल्या महत्त्वाच्या गोष्टींपर्यंत प्रत्येक बाबतीत परदेशी टेक्निकल नो-हाऊवर भिस्त ठेवली आहे. तेव्हा एअर-इंडियाचा सलवार-कमीज पंजाबी शिंप्याने शिवायच्याऐवजी फ्रेंच शिंपिणीने शिवला हे योग्यच आहे. खरे म्हणजे आपल्याकडच्या इतर सुबुद्ध लोकांनी स्वावलंबनाचा बुद्दूपणा सोडून एअर-इंडियाचे अनुकरण करावे अशी मी शिफारस करतो. उदाहरणार्थ, बेडेकरांनी पापडाच्या लाटया करण्यासाठी एखाद्या जर्मन तज्ज्ञाला बोलावणे पाठविले तर लाटीचा आकार व पापडाची गोलाई यांचे शास्त्रशुद्ध गणित मांडता येऊन पापडांचा एक्स्पोर्ट निश्चितच वाढेल. त्याचप्रमाणे दिवाडकरांचा चिवडा अधिक खमंग लागायचा असेल तर लाह्या पाडणारा इटालियन एक्स्पर्ट बोलावण्याशिवाय गत्यंतर नाही.

## ☐ सुगंधी धर्म : एक टाटा उत्पादन

प्राचीन काळचे ऋषि-मुनी जटा का वाढवीत याचा मला लहानपणी उलगडा होत नसे, व त्या काळी हेअर-कटिंग सलूनची सोय नसल्याने त्याचा नाइलाज होत असावा, अशी मी माझ्या बालमनाची समजूत घालीत असे. परंतु लांब केसांचा व ईश्वर-भक्ती, शांतता असल्या उच्च गोष्टींचा काहीतरी निकटचा संबंध असला पाहिजे असे दिसते. कारण बीटल् नामक अत्याधुनिक केसाळ प्राण्यांपैकी एकाने नुकतेच असे वैचित्र्यपूर्ण मत प्रकट केले आहे आहे की, केस हे 'शांततामय' असतात. तेव्हा प्रत्येकाने केस वाढवावेत. आता केसात शांतता असेल तर ईश्वर-भक्ती का नसावी ? अर्थात आधुनिक युगात धर्माचा अधःपात का झाला आहे याचे उत्तर ओघानेच सापडते. धर्म हा रोमारोमात भिनावा लागतो, पण क्लोज-अप पुरुषांच्या व बॉबकट बायकांच्या आधुनिक जमान्यात रामच नाही तर धर्म राहणार कोठे ?

आता लांब केसात शांतता असते हा सिद्धांत चाळीतल्या नळावर दोन गृहिणींची 'केशाकेशी' पाहणाऱ्याला पटणे जरा कठीण आहे. परंतु जागतिक शांततेसाठी कोठलाही उपाय वर्ज्य नाही. तेव्हा व्हिएटनामचे युद्ध थांबविण्यासाठी टक्कल पड-

लेल्या माओपासून करडया केसाच्या निक्सनपर्यंत सगळया युद्धपिपासू मंडळींना केशवर्धिनी तेलाचे एक-एक पिंप पाठवायला हरकत नाही. मात्र त्याबरोबरच हेही विसरता कामा नये की, जागतिक शांततेला सर्वात मोठा धोका आहे. तो व्हिएट-कॉंगपासून नव्हे तर कोपऱ्यावरच्या न्हाव्यापासून. युद्ध हे माणसाच्या मनात उद्‌भवते असे एक वचन आहे ते बदलून युद्ध हे हेअरकटींग सलूनमध्ये उद्‌भवते अशी नवीन म्हण सुरू केली पाहिजे. कारण जगात न्हावी नसता तर केस आणि शांतता दोन्ही गोष्टी काढल्या असत्या. शेवटी प्रश्न एकच उरला—टाटाच्या पर्फ्यूम्ड हेअर ऑईलने जगात शांततेचा सुगंध दरवळेल का सोनेरी कॅथॅरडीन हेअर ऑईलने शांततेचे सुवर्णयुग सुरू होईल ?

## ☐ माओ-नामाचा लघुरुद्र

हिंदुस्थानातल्या माणसाला नाम-माहात्म्य माहीत आहे. "इंद्रशत्रु" पुत्रो भवेत्" अशी मागणी करताना शत्रूवर जोर आणण्याऐवजी इन्द्रावर जोर दिला गेल्याने वृत्रासुर इंद्राच्या हातून मारला गेला, अशी आख्यायिका आहे. पण सनातनी भारतात जे होते तेच साम्यवादी चीनमध्येही होणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. कारण नुकतेच असे दिसून आले आहे की माओ त्से-तुंगच्या नावातली त्से आणि तुंग यांच्यामधली रेघ सरकारी आज्ञेने लुप्त झाली आहे. अर्थात् या बदलाचा अन्वयार्थ सगळया जगभर लावण्यात येत आहे हे सांगायला नकोच. माझ्या मते या कारणाचे एक सोपे कारण म्हणजे रेघेचा टाइमच संपला असावा. माओचे नाव चीनमध्ये असंख्य वेळा छापले जाते, तेव्हा असा तुटवडा पडल्यास नवल नाही. दुसरे संभाव्य कारण म्हणजे सांस्कृतिक क्रांतीच्या लाल रक्षकांना माओ-नामाच्या या रेघेत काही तरी माओ-विरोधी सापडले असावे. अन् तिसरे सर्वांत सबळ कारण म्हणजे माओची आरती म्हणताना या रेघेचा अडथळा होत असावा. काही का असेना, नावात काही असो की नसो, रेघेत काही तरी खासच आहे. उलट नावात काय नाही असे विचाराल तर त्याचे उत्तर—रेघ ! ○


Manufacturers of :
JEBIVAK HIGH VACUUM PUMPS
**J. B. SAWANT ENGINEERING pvt. Ltd.**
Udyog Nagar, S. V. Road,
Goregaon (West), Bombay 62
Phone : 692407
Gram : GEBIVAK-Bombay 62

दत्तप्रसाद दाभोळकर

# तुमचे भविष्य अंदाजही तुमचाच ...

आमचे मित्रमंडळ नेहमीचेच. इराण्याचे हॉटेलही तेच. चहाही नेहमीचाच. आमच्या गप्पा मात्र आज वेगळ्याच विषयावर म्हणजे चक्क ' माणूस 'वर जाऊन घसरल्या होत्या. माझा कवी मित्र भयंकर संतापला होता. तो म्हणाला, " ' माणूस '-सारख्या साप्ताहिकाने भविष्यासाठी स्वतःची पाने खर्च करणे साफ चुकीचे आहे. ' माणूस 'कडून आमची असली अपेक्षा नाही ! त्यातून या भविष्यामुळे संपादकांच्या-कडे कविता द्यावयास जागा उरत नाही. " माझ्या दुसऱ्या एका मित्राने त्याचे हे बोलणे तेवढेच गंभीरपणे घेतले. तो म्हणाला, ' माणूस 'मध्ये भविष्य येणे मलाही फारसे पसंत नाही. पण या भविष्यामुळे जर कविता बंद होत असतील तर हे भविष्यच काय, इतर काहीही आपणांला चालेल. या तुमच्या कविता म्हणजे ताप असतो नुसता !" मी माझ्या मित्रांचे हे भांडण मजेत ऐकत होतो. माझे मित्र जोपर्यंत ' विज्ञानेश्वरी ' हे सदर बंद करा असे म्हणत नव्हते तोपर्यंत मला काही चिंता करण्याचे कारण नव्हते !

पण ही सारी चर्चा अशी रंगात आली असताना एक गोष्ट मात्र आम्ही साफ विसरलो होतो. कोणत्याही रंगलेल्या चर्चेचा बेरंग करू शकणारे दस्तुरखुद्द टिंगोजीराव कुरकुरे त्या वेळी आमच्यात उपस्थित होते. इतरांना न पटणारे मुलखा-वेगळे प्रक्षोभक विचार आग्रहाने मांडणे हा टिंगोजीरावांचा विशेष होता. आम्हा सर्वांनाच टिंगोजीरावांनी खूप वेळ वाफ दवडायला दिली. त्यानंतर आपल्या नेहमीच्या चिरचिऱ्या आवाजात टिंगोजीराव म्हणाले, " कोणत्याही विज्ञाननिष्ठ माणसाने भविष्यावर विश्वास ठेवणे चुकीचेच. आपले भविष्य आधी ठरलेले असते असे मानणे हाच शेवटी मानवाचा मोठा पराभव आहे. प्रत्येकाचे भविष्य शेवटी प्रत्येकाने घडवायचे असते. आपले भविष्य शेवटी तळहातावरील रेषांत नव्हे तर मनगटा-मधील सामर्थ्यात असते. ग्रहगोलांची गती आपले भविष्य ठरवू शकत नाही, तर शेवटी ग्रहगोलांची गती आणि मार्ग मानव ठरवणार आहे ! या साऱ्या गोष्टी बोलावयास तशा बऱ्या आहेत. पण हे सारे जरी खरे आणि बरे असले तरी तुम्ही आणि मी दोघेही कोठेतरी मनाच्या कोपऱ्यात भविष्यावर विश्वास ठेवत असतो.



उगाच खोटे बोलू नका. निरनिराळ्या मासिकांतील स्वतःची भविष्ये आवडीने, आस्थेने वाचताना तुम्हां सर्वांना मी पाहिलेले आहे आणि हे फक्त तुमच्या माझ्या-बद्दल घडते आहे असे नव्हे. खुद्द दिल्लीला आपल्या झाडून साऱ्या मंत्र्यांचे खाजगीतले ज्योतिषी आहेत आणि हे सारे फक्त अप्रगत अशिक्षित देशांत घडतंय असेही नव्हे. अगदी अमेरिकेतही भविष्य हा चांगला चलतीतला धंदा आहे. आणि जगभर हे जे घडतंय त्याला एक सावे कारण आहे. आपणा साऱ्यांच्याच आयुष्यात अकल्पित अशी घटना कधीतरी घडते. कधीकधी हातात घेतलेल्या मातीचे सोने बनते. कधी हातात घेतलेल्या सोन्याचीही माती होते...बघता बघता पायाखालची वाट हरवून जाते...! व्याकुळ हळव्या मनःस्थितीत आपण अगदी नकळत भविष्याच्या आहारी जातो...एखादा अगतिक थकलेला गरीब कामगार जितक्या सहजपणे दारूच्या व्यसनाच्या आहारी जातो ना तितक्या सहजपणे !

आता दारू व्यसन म्हणून वाईट, करमणूक म्हणून वाईट नव्हे ! पण करमणूक आणि व्यसन यांची सीमारेषा ठरवणेही खूप कठीण असते. त्यातून त्या कामगाराला जर या व्यसनापासून मुक्त करावयाचे असेल, तर दारूचा निषेध करून वा दारूबंदी करून काही उपयोग नाही. त्यासाठी त्यागी निष्ठावान समाजसेवकांची जरुरी असते. भविष्याचेही अगदी असेच आहे. भविष्यही करमणूक म्हणून वाईट नव्हे. त्यातूनही भविष्याच्या व्यसनापासून समाजाची मुक्तता करावयाची असेल तर त्याचा निषेध करून वा त्यावर बंदी घालून काही उपयोग नाही. विज्ञान हे शेवटी विज्ञाननिष्ठ तरुणांना आव्हान आहे. विज्ञानावर लिखाण करणाऱ्या लोकांच्यात जर काही कुवत असेल तर ते हे व्यसन कमी करू शकतील. हा खरा त्यांच्या कुवतीचा प्रश्न आहे ! लोकांची भविष्यापासून मुक्तता करावयास निघालेल्या एका पाश्चात्य मासिकाने सध्या एक मजेशीर प्रयोग सुरू केलाय. त्या मासिकात भविष्य दिलेले असते. पण त्या भविष्याच्या वर रास दिलेली नसते. त्या ऐवजी

भविष्यावर कोणते तरी क्रमांक घातलेले असतात. दर वेळी हे क्रमांक बदलत असतात.. त्याच मासिकात एका वेगळ्या पानावर त्या आठवड्याला कोणत्या राशीसाठी कोणता क्रमांक आहे, हे दिलेले असते. ज्या लोकांना भविष्य पाहिल्याशिवाय चैन पडत नाही, ते लोक ते क्रमांक पाहून आपले भविष्य पाहतात. पण ज्यांना शास्त्र म्हणून भविष्याचा अभ्यास करावयाचा आहे ते लोक सर्व क्रमांकांची भविष्ये वाचतात. आठवड्याच्या शेवटी त्या आठवड्याला कोणत्या क्रमांकाचे भविष्य आपल्याला बरोबर ठरले ते नोंदवहीत नोंदवून ठेवतात. चार महिने अशी क्रमांकाची नोंद केल्यावर मग ते लोक प्रत्येक आठवड्याला कोणत्या क्रमांकाला कोणती रास होती ते पाहतात. आणि त्या वेळी दर आठवड्याला आपली रास बदलत होती, हे त्यांपैकी बहुतेकांच्या लक्षात येते ! नकळत ते लोक भविष्याच्या व्यसनापासून दूर होतात. आणि भविष्यापासून तुमची माझी मुक्तता करावयास आपणांसमोर आणखीही एक मार्ग आहे. ज्याला योगायोगाचे गणित म्हणतात ते आपण समजावून घेतले पाहिजे. हे योगायोगाचे गणित तसे बरेचसे सरासरीच्या गणितासारखे आहे. ते शास्त्र अजून तसे प्राथमिक अवस्थेत आहे. पण ते शास्त्र समजावून घेत गेलो तर स्वत:चेच भविष्य आपण स्वत: आधी लिहू शकू.

अमेरिकेच्या संरक्षण खात्यातील एका शास्त्रज्ञाने या योगायोगाच्या गणिताचे एक मजेशीर उदाहरण मध्यंतरी प्रसिद्ध केले होते. समजा, उद्या अमेरिका आणि रशियाचे अणुयुद्ध सुरू झालंय. शत्रूपक्षाची अणुबाँब साठवणारी केंद्रे उद्ध्वस्त करणे हे दोन्ही देशांसमोरील त्या वेळी प्रमुख काम आहे. समजा, रशियाचे ' अ ' हे अणुकेंद्र उद्ध्वस्त करण्यासाठी अमेरिकेचा एक अग्निबाण अणुबाँब बरोबर घेऊन त्या केंद्राच्या दिशेने सोडलेला आहे. आता हा अग्निबाण त्या केंद्रावर जाऊन ते केंद्र उद्ध्वस्त न करावयास अनेक कारणे घडू शकतील. काही यांत्रिक चुकीने त्या अग्निबाणाची दिशा चुकली, वा त्या अग्निबाणातील अणुबाँब काही कारणांनी निर्जीव बनलेला असला, अथवा रशियाच्या अग्निबाणविरोधी तोफांनी वाटेतच त्या अग्निबाणाचा निकाल लावला तर रशियाचे ते केंद्र उध्द्वस्त होणार नाही. अमेरिकन शास्त्रज्ञांनी या साऱ्या गोष्टी लक्षात घेऊन एक प्राथमिक अंदाज केलाय. अमेरिकेचा कोणताही अग्निबाण पाहिजे त्या नेमक्या ठिकाणी जाऊन ते ठिकाण उद्ध्वस्त करावयाची शक्यता फक्त सरासरी पन्नास टक्के आहे. आता प्रश्न एवढाच आहे, ' अ ' हे केंद्र हमखासपणे उद्ध्वस्त करावयाचे असेल तर अमेरिकेचे किती अग्निबाण ' अ 'च्या दिशेने पाठवले पाहिजेत ?

एक अग्निबाण पाठविला त्या वेळी यशाची खात्री पन्नास टक्के होती. दोन अग्निबाण पाठवले तर यशाची खात्री किती टक्के ?– चटकन या प्रश्नाचे उत्तर शंभर टक्के असे द्यावयाचा मोह आपणांला होतो. पण जरा शांतपणे विचार करा. पहिला अग्निबाण पाठवला त्या वेळी यशाची खात्री पन्नास टक्के होती. अपयशाची

पन्नास टक्के. समजा, तो अग्निबाण पोचलेला नाही. म्हणज दुसरा अग्निबाण पोचण्याची शक्यता उरलेल्या पन्नास टक्क्यांपैकी पन्नास टक्के. म्हणजे पंचवीस टक्के. थोडक्यात दोन अग्निबाण पाठवले तर यशाची शक्यता पंचाहत्तर टक्के. गणितज्ञ हे गणित अशा प्रकारे मांडतात.

$\frac{१}{२} + \frac{१}{२} - \frac{१}{२} \times \frac{१}{२} = \frac{३}{४} =$ ७५ %

हेच गणित पुढे वाढवत गेलो तर आपल्या लक्षात येईल की यशाची नव्वद टक्के खात्री हवी असेल तर अमेरिकेला असे चार अग्निबाण सोडावे लागतील. आणि शंभर टक्क्यांच्या जवळपास यशाची खात्री हवी असेल तर हा आकडा अनेक पटींनी वाढवावा लागेल. आता यशाचा प्राथमिक अंदाज देणारा जो प्राथमिक पन्नास टक्के सरासरीचा जो अंदाज आहे तो जर पन्नास टक्क्यांहून कमी झाला तर पुन्हा अग्निबाणांची संख्या वाढवावी लागेल. म्हणजे अमेरिकेकडे एकूण किती अग्निबाण पाहिजेत हे रशियाची एकूण किती अणुकेंद्रे उद्ध्वस्त करावयाची आहेत आणि प्राथमिक सरासरीचा अंदाज काय आहे या दोन गोष्टींवर ठरवावे लागेल. या दोन गोष्टींवर हा आकडा न ठरवता ग्रहगोलांच्या गतीवर आणि अमेरिका-रशियाच्या कुंडलीवर कोणी हा आकडा ठरवला तर अमेरिकेचे पुन्हा एकदा 'पर्ल हार्बर' होईल !

त्यामुळे स्वतःचे भविष्य ज्याला स्वतः घडवायचे आहे त्या प्रत्येकाने सरासरीच्या नियमांपेक्षा थोडे वेगळे असलेले हे योगायोगाचे गणित समजावून घेतले पाहिजे. हे गणित समजावून घेत गेलात तर स्वतःचे भविष्य स्वतः घडवत असतानाच तुम्ही ते आधी सांगूही शकाल. मानवी जीवनात घडणाऱ्या घटनांचा क्रम, स्वतःच्या आयुष्यात गेल्या काही वर्षांत घडलेल्या घटना, भोवतालची परिस्थिती, आयुष्यात अकल्पित घडणाऱ्या गोष्टींचे प्रमाण या साऱ्या गोष्टी लक्षात घेऊन स्वतःचे पुढील वर्षाचे स्थूल भविष्य तुम्हीही आधी सांगू शकाल. हे भविष्य असे आधी मांडलेत तर कोणत्या संधीचा किमान श्रमात फायदा उठवावयाचा आणि कोणत्या वरवर क्षुल्लक वाटणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टींसाठी अमाप ताकद खर्च घालवायची हे तुमच्या लक्षात येईल. पण हे करण्यापूर्वी सरासरीचे नियम तुम्ही आधी नीट समजावून घेतले पाहिजे." — आणि सध्या खुद्द टिंगोजीराव हे नियम समजावून घेण्याचा प्रयत्न करताहेत. हे नियम समजावून घेण्याच्या प्रयत्नांत टिंगोजीरावांना आलेले हे मजेशीर अनुभव पाहा.

(अ) टिंगोजीराव एकदा छापकाटयाचा खेळ खेळत होते. या खेळात छाप वा काटा येण्याची शक्यता प्रत्येकी पन्नास टक्के असते. त्या दिवशी तो खेळ खेळताना टिंगोजीरावांनी मनाशी एकूण चारदा छापकाटा टाकण्याचे ठरवले होते. ओळीने तीन वेळा छाप वरती आला. चवथ्या वेळी छापकाटा टाकताना टिंगोजीरावांच्या मनात विचार आला, आता या वेळी काटा येण्याची शक्यता किती ?— पन्नास टक्के.

पन्नास टक्क्यांहून अधिक की पन्नास टक्क्यांहून कमी ?

(ब) टिंगोजीरावांना लोकलच्या गर्दीत एकदा त्यांचे जुने कॉलेजमित्र गोपाळराव भेटले. गोपाळरावाबरोबर एक मुलगा होता. गर्दीत लोकलमधून उतरता उतरता गोपाळराव म्हणाले, "मला एकूण दोन मुले आहेत. त्यांपकी हा एक. घरी आल्यावर टिंगोजीरावांना प्रश्न पडला. गोपाळरावांचे दुसरे मूल मुलगा की मुलगी हे आपण विचारलेच नाही. गोपाळरावांचे दुसरे मूल मुलगाच असण्याची शक्यता किती ?

१/२ = ५०% की १/३ = ३३%

(क) समजा, गोपाळरावांनी उतरता उतरता टिंगोजीरावांना सांगितले असते, मला दोन मुले आहेत. त्यांपैकी हा थोरला. अशा वेळी गोपाळरावांचे दुसरे मूल मुलगाच असण्याची शक्यता किती ?

१/२ = ५०% की १/३ = ३३%

योगायोगाने गणिताने टिंगोजीरावांना दिलेली उत्तरे अशी.

(अ) अजूनही छाप येण्याची शक्यता पन्नास टक्केच. कारण टिंगोजीराव किती वेळा छापकाटा खेळणार आहेत, वा पहिल्या तीन वेळा काय उत्तर आले आहे, हे त्या नाण्याला माहीत असण्याचे काहीच कारण नाही.

(ब) गोपाळरावांचे दुसरे मूल मुलगाच असण्याची शक्यता फक्त १/३ किंवा ३३% आणि तुमचे उत्तर चुकले असले तरी फारसे वाईट वाटून घेऊ नका. आम्ही सारेच मित्र उत्तर सांगताना चुकलो होतो. टिंगोजीरावांनी दिलेले स्पष्टीकरण असे आहे.—गोपाळरावांना दोन मुले एकूण खालील चार प्रकारे होऊ शकली असती.—(१) पहिला मुलगा दुसरा मुलगा. (२) पहिला मुलगा दुसरी मुलगी. (३) पहिली मुलगी दुसरी मुलगी. (४) पहिली मुलगी दुसरी मुलगी. त्यांपैकी चौथी शक्यता आपण लक्षात घेण्याचे कारण नाही. कारण त्यांच्या मुलांपैकी किमान एक तरी मुलगा आहे हे आपणांला माहीत आहे. म्हणजे एकूण शक्यता फक्त तीन. या शक्यतेपैकी जर क्रमांक एकची गोष्ट घडली असेल तरच त्यांचे दुसरे मूल मुलगा असण्याची शक्यता आहे. म्हणजे अशी शक्यता तीनपैकी एक वेळा. म्हणजे फक्त ३३%.

(क) या वेळी मात्र दुसरे मूल मुलगा असण्याची शक्यता पन्नास टक्के आहे. कारण गोपाळरावांचे पहिले मूल मुलगा आहे हे आपणांला माहीत आहे. त्यामुळे आपण वर मांडलेल्या शक्यतेपैकी शक्यता क्रमांक तीन आणि चार आपण विचारात घेण्याचे काही कारण नाही. म्हणजे एकूण शक्यता उरल्या फक्त दोन. त्यांपैकी क्रमांक १ ची घटना घडली तर दुसरे मूल मुलगा असू शकेल. म्हणजे तशी शक्यता. दोनांत एक किंवा पन्नास टक्के. O

# कामगार चळवळ . . . नवी चाहूल

[ पृष्ठ ४४ वरून

कामगारांना काही कंपन्या घरे पुरवतात. अर्थात हा आकडा फार लहान आहे; परंतु ज्या ठिकाणी अशा प्रकारे घरे पुरवण्यात आली आहेत, त्या ठिकाणचा अनुभव मात्र असा आहे की, निवृत्तीनंतर किंवा नोकरीतल्या बदलानंतर कामगार त्याला मिळालेली जागा सोडायला तयार नसतो. ह्या ठिकाणी दोन्ही पक्षांची भूमिका आपापल्या परीने समर्थनीय असते. कंपन्यांना, कामगार कंपनीत कामावर नसताना त्याला जागा देणे परवडणारे नसते. त्याचप्रमाणे, अनेक वर्षे त्या जागेत काढल्यामुळे कामगारालाही ती जागा सोडून पुन्हा नवी जागा हुडकणे, त्या नवीन जागेचे वारेमाप भाडे देणे वगैरे गोष्टी अशक्य वाटतात–अशक्य असतातही ! 'बेस्ट 'च्या व्यवस्थापकांनी मात्र ह्याबाबत एक नवीन प्रयोग करून पाहायचा ठरवलेले दिसते.

'बेस्ट 'ची ओशीवरा येथे बरीच मोठी जागा आहे. 'बेस्ट 'मध्ये विविध युनियन्सनी प्रस्थापित केलेल्या विविध सहकारी संघटनांना 'बेस्ट 'ने ही जागा ९९ वर्षांच्या कराराने दिली आहे. ह्या जागेवर सुमारे ८,००० रु. किमतींचे गाळे कामगारांसाठी 'भाडे-खरेदी ' तत्त्वावर उभारावयाचे अशी योजना आहे. ह्यांपैकी फक्त २,००० रु. कामगाराने द्यावयाचे आहेत. तेही त्याला प्रॉव्हिडंट फंडातून मिळवून द्यायची सोय करून दिली गेली आहे. उरलेले ६,००० रु. तूर्त 'बेस्ट ' खर्चणार आहे. ही रक्कम नाममात्र व्याजाने सभासदाकडून दीर्घ मुदतीत वसूल केली जाणार आहे. ही योजना प्रथम पुढे आल्याला खूपच दिवस लोटले. त्यानंतर तीन जनरल मॅनेजर्स बदलले. आता मात्र ही योजना मूर्त स्वरूप घेऊ पाहत आहे. आठशे गाळ्यांची ही योजना ह्या डिसेंबरपूर्वी पूर्ण होईल, असा अंदाज आहे. मला वाटते, मुंबईतल्या कामगारांच्या राहत्या घरांचा प्रश्न सोडवायला, ह्या प्रयोगाचे अनुकरणही बराच हातभार लावू शकेल. गिरण्या, कारखाने, रेल्वे, नगरपालिका, आदींनी जर आपापल्या कामगारांना अशी मदत दिली तर हा प्रश्न सुटायला मदत तर होईलच; पण त्याचबरोबर कारखान्यांतला कामगार कारखान्यांजवळच, एका निश्चित ठिकाणी एकत्रित राहत असल्याने कारखान्यांचेही अनेक प्रश्न सुटतील. शिवाय, मुंबईतल्या चाळींवरील ताणही खूपच कमी होईल. ह्या कल्पनेविषयी मी अनेक कामगारांशी बोललो. राहण्याची चांगली सोय असली व तीही कायमची, तर ह्या योजनेला सहकार्य देण्याची त्यांची विनाअट तयारी दिसली. अनेकांनी असेही सांगितले, " आमच्या बोनसच्या वाट्याचा पैसा टाकूनही जर मालकांनी अशी सोय आम्हांला उपलब्ध करून दिली तर आम्ही त्या बोनससाठीही भांडणार नाही." ह्या ठिकाणीच मला वाटते, युनियन्सना व कामगार पुढाऱ्यांना महत्त्वाचे कार्य

करता येईल. ह्या गोष्टींनाही कारखानदार सहजासहजी तयार होणार नाहीत. इथे नेतृत्वाला लढा उभारावा लागेल. मी ज्या अनेक कामगारांशी बोललो, त्यांवरून मला एवढी खात्री निश्चित देता येईल की, पगारवाढीच्या वा बोनसच्या आंदोलनालाही जेवढा पाठिंबा मिळणार नाही, तेवढा प्रचंड पाठिंबा ह्या लढ्याला कामगारांचा मिळेल. मालकांचाही काही पैसा वापरायला मिळणार असल्याने व इमारत बांधणीमुळे खर्ची पडलेला पैसा परत यायचा असल्याने, ह्या लढ्यांना खूप मोठा विरोध होणार नाही. पण त्याच वेळी जागांचा प्रश्न सुटत असल्याने कामगारांच्या डोक्यावरील फार मोठी जबाबदारी उतरणार आहे. ' बेस्ट 'च्या ह्या प्रयोगाच्या वेळी सारे पक्षीय मतभेद विसरून, सर्वच संघटनांनी एकदिलाने काम केले असे ' बेस्ट 'चेच एक कर्मचारी श्री. करजकर ह्यांनी सांगितले आणि म्हणूनच असे वाटते की, ह्या प्रश्नावर युनियन्स काहीतरी हालचाल करतील !

चाळींची दुरुस्ती असो की, ' भाडे-खरेदी ' तत्त्वाखाली मालकांच्या सहकार्याने नवीन घरांच्या निर्मितीचे कार्य असो, दोन्ही ठिकाणी कॉंट्रॅक्टर चांगला मिळणे आवश्यक ठरते. नाहीतर फसवणूक व्हायचे व घाम गाळून जमा केलेल्या पैशांचा अपव्यय व्हायचेच संभव जास्त ! वेगवेगळ्या चाळींतून हिंडताना अशा फसवणुकींच्या अनेक कहाण्या ऐकायला मिळाल्या. खोजाच्या चाळीत तर शेवटी सर्व काम स्वतःच हाताळायचा निर्णय चाळकऱ्यांना घ्यावा लागला. ' खरास चाळी 'त हाच अनुभव मालक श्री. अलींनी सांगितला. गिरणगावातल्याच ' छगन कुशा ' चाळीची अशीच दुरुस्ती झाली. काही दिवसच झाले असतील-नसतील, तिथला एक संडास कोसळला आणि त्याखाली एक कामगार जागच्या जागी ठार झाला. कॉंट्रॅक्टरवर खटला भरला गेला. तो व त्या विभागाचा वॉर्ड इंजिनीयर दोषी ठरला. प्रत्यक्ष अंदाज बघितले गेले तेव्हा सिमेंटमधली भेसळ वगैरे अनेक प्रकार करून त्या कॉंट्रॅक्टरने प्रत्यक्ष सांगितलेल्या रकमेच्या अवघ्या अर्ध्या रकमेतच काम संपवले असल्याचे आढळून आले. पुढे त्या कॉंट्रॅक्टरने सर्व दुरुस्ती पुन्हा परत करून दिली, वगैरे भाग वेगळा. कारण, त्या वेळेपर्यंत फार मोठे नुकसान आधीच चाळकऱ्यांना पोचलेले होते.

लालबागला एका ठिकाणी ह्याच प्रकारे कामगारांनी स्वतःचा प्रश्न स्वतःच सोडवायचे ठरवले. पैसा गोळा झाला. काम सुरू झाले. अर्ध्यावर आले आणि अचानक एके दिवशी कॉंट्रॅक्टर हाती आलेल्या पैशांसह पळून गेला. सर्वांची माथी भडकली. त्याला पकडून आणले गेले. कायदाबियदा बघितला गेला नाही. त्यांनी त्या कॉंट्रॅक्टरलाच चक्क बांधून ठेवले न् त्याच्या माणसांकडून काम पुढे सुरू केले !

खाटकाच्या एका चाळीत चाळ-कमिटीचे प्रमुख, कॉंट्रॅक्टर व आर्किटेक्ट ह्या सर्वांनी संगनमत करूनच चाळकऱ्यांना लुबाडण्याचा घाट घातला. पैसे गोळा करून दुरुस्तीला सुरुवात झाली. काम अर्धवट झाले असेल नसेल, तोच चाळ-कमिटीच्या

प्रमुखांनी पैसा संपल्याचे सांगितले. सगळेच चाळकरी हतबल झाले. प्रमुखाने काँट्रॅक्टरची बिले, आर्किटेक्टचे दाखले सर्वांना स्वतःच्या म्हणण्याचे प्रमाण म्हणून दाखवले. पण तरीही कुणाचा विश्वास बसत नव्हता. काम काहीच झाले नव्हते आणि मोठ्या मेहनतीने जमा करून दिलेल्या अठरा-वीस हजारांचा चुराडा मात्र होऊन गेला होता. त्यांनी श्री. वाळिंब्यांकडे धाव घेतली. श्री. वाळिंब्यांनी तिथले कामकाज बघितले, हिशेब मांडले–एकूण जेमतेम आठ–दहा हजारांचे काम झालेले होते! वाळिंब्यांनी आपला अहवाल सादर केला. केस कोर्टात गेली. शेवटी तडजोड होऊन कमिटीप्रमुखाने संपूर्ण चाळ पुन्हा दुरुस्त करून द्यायचे ठरवले. कधीकधी असे खमके भेटले तर काँट्रॅक्टरकडून फसवणूक होऊनही सारे गाडे पुन्हा मार्गावर येते. पण कित्येकदा–बऱ्हंशी प्रसंगी–काँट्रॅक्टर सहजीच लुबाडून जातो, असे दिसून आले आहे. आणि ह्या वेळी चाळकरी, त्यांचे नेते ह्यांना हात चोळत बसून राहण्यापलीकडे काहीच करता येत नाही!

मुंबईच्या जागांइतकाच, ह्या चाळीमधल्या भाडेकरूंच्या पाण्याचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. मुंबईतल्या आलिशान भागांमध्ये पाण्याचा प्रश्नच असा मुळात नाही, मग भले ती मंडळी कितीही का ओरड करीनात! परंतु कामगारविभागात मात्र हा प्रश्न अत्यंत बिकट बनून राहिलेला आहे "युद्धाच्या पातळीवरून हा प्रश्न सोडवला जावा" अशा एकीकडे घोषणा असतात. तर दुसरीकडे अप्पर वैतरणा वगैरेसारख्या प्रश्नांवर पद्धशीर चालढकल चालू असते. आता हा प्रश्न म्हणे जागतिक बँकेच्या सहकार्याने हाताळणार! म्हणजे आणखी चार-पाच वर्षे तरी हरी हरी! ■

## असाही एक प्रकार

खाटकांची चाळ! चाळ दुरुस्तीसाठी कमिटी स्थापन झाली. पण कमिटी प्रमुखाने पैसे हडप करून काम अर्ध्यावरच सोडले. आर्किटक्ट, काँट्रॅक्टर ह्यांच्याकडून जमलेल्या पैशाचे काम पूर्ण झाले असे सर्टिफिकेट घेतले. सगळे चाळकरी हतबल झाले. जादा पैसा आणायचा कुठून?

"एका म्हाताऱ्या विधवेने कंबर कसली. दोघाचौघांना घऊन रात्री ९–९॥ ला माझ्याकडे आली. तिची हकीकत ऐकून घेऊन मी दुसऱ्या दिवशी त्या चाळीत गेलो. सगळ्या खाटकांचे सुरे परजत होते. मी मनाशी हबकलो. ह्यांच्या फंदात पडावे का? माझा विचार त्या विधवेने जाणला की काय कोण जाणे; पण ती माझ्या जवळ येऊन म्हणाली,

"साहब, डरिये मत, हम भी कुछ कम नही है। इनका एक तो हमारे दस छुरे चलेंगे! आप बेफिकीर रहना। लेकिन हमे मदद करना। हम मजबूर है।"

**श्री. वाळिंबे**

आर्किटेक्ट, खोजाची चाळ

# ४

# अयोध्यानगर

'अयोध्यानगर! तुर्भेचा खत कारखाना, रिफायनरी, टाटा पॉवर स्टेशन आदींच्या वसाहती, युनियन कार्बाईड, बर्माशेल आदी बडया बडया कंपन्या वगैरेंच्या परिसरात डोंगरपायथ्याशी ही तीनशेच्या वर झोपडया असलेली वस्ती उभी आहे. तिला 'झोपडपट्टी' म्हटले नाही त्याला कारणही तसेच आहे. काही दिवसांपूर्वीच 'अयोध्यानगरा'ला भेट देऊन गेलेला एक नगरपालिका कर्मचारी म्हणाला होता—"ही कुठली आली आहे झोपडपट्टी? हे तर आहे छोटंसं गावच!" आणि खरेच होते ते. नेहमीचे झोपडपट्टीचे दृश्य तिथे कुठेच नव्हते. पडक्या मोडक्या झोपडया, नरकाची घाण, काहीसुद्धा तिथे नव्हते. होते एक छोटेसे कालीमातेचे देऊळ. त्यापुढे छोटेसे मोकळे पटांगण असलेली छोटीशी शाळा—अयोध्यानगर प्राथमिक शाळा. नगरापर्यंत पोचणारी सुबक सडक त्यापुढे कौलारू टुमदार झोपडया सगळ्याच पक्क्या पायावर, व्यवस्थित उभ्या असलेल्या खुद्द झोपडपट्टीतूनही हिंडायला व्यवस्थित रस्ते. सगळीकडे इतर न आढळणारी स्वच्छता. एकदोन झोपडयांवर झळकणारे प्रासादिक भजनी मंडळाचे फलक. मध्यवर्ती ठिकाणी दोन चार नळ. एका बाजूला ८–१० संडास. कोण म्हणेल हे एखाद्या झोपडपट्टीचे वर्णन आहे म्हणून? पण खरोखरच 'अयोध्यानगर' ही झोपडपट्टी अशा तऱ्हेने डौलात उभी आहे. दोन वर्षांपूर्वी ती तशी नव्हती हेही तितकेच खरे! दोन वर्षांत हा सारा चमत्कार घडून आला होता.

हा सारा चमत्कार पाहत मी हिंडत होतो. कार्यकर्ते सांगत होते, "ही जागा सरकारी मालकीची आहे. जागेचे भाडे आम्ही सरकारला नियमितपणे भरीत आहोत. हीच जागा आम्हांला दीर्घ मुदतीने (लीझवर) सरकारने द्यावी असा आमचा प्रयत्न आहे. ती तशी दिल्यास पक्क्या इमारती उभ्या करायचा विचार आहे" त्याबरोबर ते हेही सांगत होते की, "नगरपालिका सरकार ह्यांचे धोरण मात्र ह्याबाबतीत भिन्न असते. झोपडपट्ट्या उभारलेल्या असतील तिथून त्या उठवायच्या. अन्यत्र दूर कुठेतरी पर्यायी जागा चाळी बांधून उपलब्ध करून द्यायच्या असे सर्वसाधारण धोरण दिसते. अर्थात इतक्या लांब जाणे त्यांना सर्वच दृष्टींनी त्रासदायक असते. ह्याच ठिकाणी सरकारने आम्हांला बाजवी दरा

जागा दिली तर फंड उभे करून आम्ही स्वतःच ह्या जागा घेऊ व त्यांवर पक्क्या चाळी बांधून काढू." कार्यकर्ते पुढे सांगत होते.

ह्या प्रश्नावर मी अनेकांशी बोललो. बहुतेकांनी चाळी उठवायच्या धोरणावर हल्लाच चढवला. एकतर कित्येक झोपडपट्ट्या आज आठ-दहा वर्षे एकेका ठिकाणी उभ्या आहेत. आज तिथून त्या उठवणे अन्यायमूलक आहे. सुरुवातीला एखादी झोपडी उभी राहत असतानाच प्रतिबंध करण्यात आला असता, झोपड्या उभ्या राहण्याच्या कारणांची चिकित्सा करून ती कारणेच नाहीशी करण्याचा प्रयत्न झाला असता तर कदाचित हा प्रश्नच इतका गंभीर झाला नसता. एका माहितगाराच्या अंदाजाप्रमाणे आज मुंबईत जवळजवळ अडीच हजारांच्या आसपास झोपडपट्ट्या आहेत. त्यांतल्या कित्येक दहा-पंधरा वर्षांहून अधिक काळापासून अस्तित्वात आहेत. त्या झोपड्यांतून असलेली वस्ती सहज दहा लाखांच्या घरात आहे. त्याशिवाय जवळजवळ चार-पाच लाख लोक अक्षरशः बेघर अवस्थेत फूटपाथ, पुलांखालची जागा वगैरेंचा आश्रय घेऊन राहत आहेत. ह्याशिवाय पडायला आलेल्या चाळीतल्या लोकांचा प्रश्न आहे. झोपडपट्ट्या किंवा फूटपाथ पुलाखालून राहणाऱ्या लोकांच्या वस्त्यांचे अवलोकन केले तर एक गोष्ट आढळून येते. ती म्हणजे हा सर्वच समाज आजूबाजूच्या जास्तीत जास्त एक दोन मैलांच्या परिसरातल्या कारखान्यांमधून काम करणारा असतो. जवळ पडते, जाणेयेणे सोयीस्कर पडते व कारखाना जवळ असल्याने सर्वच दृष्टींनी खर्चाचे मान किमान राखता येते. ह्याच कारणांनी उत्तर मुंबईतल्या कित्येक झोपडपट्ट्या आज उभ्या राहिल्या आहेत. ह्या झोपडपट्ट्या उठवून त्यांना दूर कुठेतरी पर्यायी जागा देणे हे त्यांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखेच आहे. "शिवाय या पर्यायी जागेची भाडी त्यांना परवडणारी असतात का, ह्याचाही कोणीच विचार करीत नाही," असेही मत अनेकांनी ऐकवले. "ही भाडी न परवडल्याने व जाणे-येणे-जेवणखाण आदीमुळे खर्चही वाढल्याने पुष्कळदा नव्या जागेत गेलेला कामगार आपली जागा दुसऱ्या कुणा गरजवंताला भाड्याने किंवा विकत देतो. आणि स्वतः मात्र पुन्हा जुन्या जागी येऊन झोपडी उभारतो," श्री. देशपांडे सांगत होते.

"ह्या नवीन पर्यायी जागा दोन-दोन खोल्यांच्या आणि अगदी कमीतकमी ५० वर्षे आयुष्य असलेल्याच बांधायचा आग्रह का धरला जावा हे मात्र मला समजत नाही." श्री. दिनकर साक्रीकर सांगत होते. "ह्यामुळे निष्कारण खर्च वाढतात व कामगारांना न परवडणारी भाडी आकारली जातात. त्याऐवजी एकेका खोल्यांच्याच (एवढीच जागा वापरण्याची त्यांना सवय असते त्यामुळे त्या बाबतीत त्यांना जड जाईल असे कोणी वाटून घेऊ नये) व त्याही १५-२० वर्षे आयुष्य असणाऱ्या इमारती बांधल्या तर हा प्रश्न अधिक गतीने सुटणार नाही का? शिवाय ह्या जागा शहरापासून लांबच्या उपनगरातून का बांधल्या जाव्यात तेच समजत नाही.

वास्तविक रेसकोर्स, गोल्फ-क्लब, आलिशान हॉटेले, क्षय, महारोग,कर्क रोग आदींची इस्पितळे आदी गोष्टी अशा आहेत की, त्या कुठेही असल्या, मुख्य वस्तीपासून कितीही दूर असल्या तरी तिथे जाणाऱ्याला फारशी झळ पोहोचणार नाही. मग ह्या वास्तूंसाठी शहरातील जागा निष्कारण का अडवली जावी ? ह्या वास्तू दुसरीकडे हलवल्या जाव्यात. त्या ठिकाणी झोपडवासियांसाठी, पडक्या चाळींच्या रहिवाशां-साठी किंवा रस्तारुंदीकरण्यामुळे बेघर झालेल्यांसाठी स्वस्त अशा पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात. "

श्री. सात्रीकरांच्या ह्या मताशी बरेचजण सहमत असलेले दिसले. शिवाय नवीन पर्यायी जागांची भाडी परवडणारी नसतात हेही सत्य आहे. काहींनी तर असेही बोलून दाखवले की, एवढी भाडी द्यायची, त्रास सोसायचे नि तरीही शेवटी जर बांधकाम गृहनिर्माण मंडळांच्या जागांसारखेच निघाले तर काय करायचे ?


ह्या सगळ्यावर पुन्हा एकच एक तोडगा अनेक झोपडवासी कामगारांकडून ऐकायला मिळत होता, आहे त्याच जागी झोपडपट्ट्यांचे पक्क्या इमारतींतून रूपांतर करायला परवानगी मिळावी, शक्य असल्यास आर्थिक साहाय्य मिळावे. नवीन झोपडपट्ट्यांच्या उभारण्यांनाच मुळांत विरोध व्हावा, ही कल्पना अनेकांनी मान्य केली. पण त्याचबरोबर जुन्या झोपडपट्ट्या नाहक हलवल्या जाऊ नयेत, असेही बहुतेकांनी प्रतिपादले. पण ह्याहूनही महत्त्वाचे कार्य जे झोपडपट्ट्यांतून व्हायला हवे आहे ते म्हणजे तिथल्या रहिवाशांच्या संघटना बांधणे. त्यांना त्यांच्या समाजा-तल्या स्थानांची जाणीव करून देणे, तिथल्या स्वच्छता सांभाळणे, वगैरे.

ह्या संबंधात बोलताना 'अयोध्यानगर'चे कार्यकर्ते श्री. खरात म्हणाले, "गिरणगावातल्या कामगारांच्या जुन्या चाळींचे प्रश्न व झोपडपट्टीतल्या कामगारांच्या घरांचे प्रश्न ह्यांत खूपच अंतर आहे. त्या चाळींतून राहणाऱ्यांचे तिथले वास्तव्य वर्षानुवर्षांचे असते. त्यामुळे तिथे संघटना बांधणे सोपे जाते. इथे परिस्थिती उलट असते. विभिन्न क्षेत्रांतली, वेगवेगळ्या कारखान्यांतली, भिन्न आर्थिक घडीतली माणसे इथे एकत्रित आलेली असतात. साधारणत: अशिक्षित व अगदी खालच्या पातळीवरची माणसे इथे असतात. अर्थातच अशा ठिकाणी संघटना बांधणे, ती राबवणे व तीतून काही भरीव कार्य करून दाखवणे कठीण जाते. थोड्याशा गैर-समजातून मोठाली भांडणे चटकन् उभी राहतात. गुद्द्यांवरून सुऱ्यांपर्यंत परिस्थिती केव्हा पालटते काहीच कळत नाही. पैशाचे दारिद्र्य एवढे जबरदस्त असते की, काही जणांना महिन्याला पाच–सहा रुपये देणेही जड जाते. ह्याच्याच जोडीला दारू, बाटली, मटका आणि पठाण ह्यांमुळे ह्या वस्त्यांतले जिणे म्हणजे प्रत्यक्ष नरकातले जिणे वाटू लागते.

आणि ह्या अशा परिस्थितीतूनच 'अयोध्यानगर'ने आपले आजचे स्वरूप उभे केले आहे हेही विशेषच ! सर्वश्री खरात, शिर्के, मूर्ती, बाबूभाई मिस्त्री, कदम

आदींनी ह्या झोपडपट्टीतल्या रहिवाशांची संघटना १९६६ मध्ये बांधली. ह्या वस्तीत एकूण दोनशेच्या वर झोपडया आहेत. वस्ती अदमासे २०००, प्रत्येक कुटुंबा-मागे दरमहा ६ रु. प्रमाणे वर्गणी गोळा करून संस्थेच्या कामाला सुरुवात झाली. १९६८ मध्ये " अयोध्यानगर नागरिक संघटना " रीतसर नोंदवली गेली आणि नंतर कायापालटाला सुरुवात झाली. सर्वप्रथम दारूच्या भट्टया आणि मटक्यांचे अड्डे ह्यांची अयोध्यानगरातून उचलबांगडी केली गेली. ह्याचा अर्थ असा नाही की, इथला एकही रहिवासी आज दारू पीत नाही किंवा मटका खेळत नाही ! पण ह्या उचलबांगडीमुळे ह्या गोष्टींचे प्रमाण खूपच कमी झाले आहे हे मात्र निश्चित. ह्यानंतर झोपडयांच्या मजबुतीकरणाकडे लक्ष दिले गेले. सगळीकडे कौलारू छपरे उभी केली गेली. सांगाडयांना अधिक मजबुती आणली गेली. ह्यामुळ निदान पाच-सात वर्षे तरी आमच्या ह्या झोपडयांना कसला त्रास नाही एवढे निश्चित ! त्यांच्यातला एक कार्यकर्ता म्हणाला, प्रत्यक्ष राहत्या घरांचा प्रश्न काही काळा-पुरता का होईना, सोडवला गेलेला असल्याने कार्यकर्त्यांना इतर प्रश्नांकडे लक्ष द्यायला फुरसत मिळाली.

सर्वांत प्रथम दोन हजार रुपये खर्चून ' नगरी 'त सार्वजनिक नळ, कामगारांच्या जमा झालेल्या पैशांतून आणला गेला. आज झोपडपट्टीत पाण्याचा त्रास अजिबात



कालच्या अयोध्यानगराचा

नाही. झोपडपट्टीच्या परिसरातच एक तलाववजा डबके होते. सर्वच दृष्टींनी ते बुजवणे आवश्यक होते. सर्वांचे परिश्रम सुरू झाले. कॅलिको, युनियन कार्बाईड, आदी कंपन्यांतून काम झाल्यानंतर बराचसा चुना फेकून दिला जातो. ह्या ठिकाणच्या कॉन्ट्रॅक्टर्सशी संपर्क साधण्यात आला. तो चुना झोपडपट्टीत आणण्यात आला व त्याच्या साह्याने तळे बुजवून टाकण्यात आले आहे. रामकृष्ण चेंबूरकर मार्ग ह्या हमरस्त्यापासून 'अयोध्यानगरापर्यंत'चा रस्ता श्रमदानाने करण्यात आला. आजही झोपडपट्टीच्या आतल्या भागातून व्यवस्थित हालचाल करता यावी ह्या दृष्टीने छोटे छोटे रस्ते तयार करण्याचे काम चालू आहे. हे रस्त्यांचे काम चालू असताना वाटेत येणाऱ्या झोपड्या पाडल्या जात आहेत. अन्य ठिकाणी पुन्हा नव्याने, डौलदारपणे सर्वांच्या सहकार्याने उभारल्या जात आहेत. ह्या ठिकाणचे वैशिष्टच हे की इथल्या वस्तीत गवंडी, सुतार, मिस्त्री, वायरमन आदी सर्व तऱ्हेचे कामगार आहेत. त्यामुळे कुठलेही काम असो, बाहेरच्या माणसाला बोलावले जात नाही; अर्थात कुठल्या कामासाठी कॉंट्रॅक्ट देणे वगैरे प्रश्नच त्यामुळे उद्‌भवत नाहीत.

ह्यानंतर संडासांच्या प्रश्नाला हात घातला गेला व नगरपालिकेचे उंबरठे अनेकदा झिजवून त्यात यशही आले. ह्या संबंधांत, ह्या भागातले शिवसेनेचे नगरपिते श्री. शरद आचार्य ह्यांची खूपच मदत झाली, असे श्री. खरात ह्यांनी सांगितले. ह्या संबंधात त्यांनी एक मजेशीर उल्लेख केला. ते म्हणाले, "मराठी, दक्षिणी, उत्तर भारतीय अशा सर्वच समाजांचे मिश्रण ह्या झोपडपट्टीत आहे. संघटना उभी राहिल्यानंतर पहिली एक-दोन वर्षे अत्यंत खेळीमेळीने काम पार पडले. परंतु 'शिवसेना' उद्रेकानंतर (१९६७ च्या) संघटनेत तट पडले. काही काळ सगळेच काम मंदावले. पण गंमत ही की, त्याच शिवसेनेच्या 'नगरसेवकाचे—श्री. शरद आचार्य ह्यांचे—आम्हांला नंतरच्या काळात भरीव साहृय मिळाले." आज ह्या




आज कायापालट होत आहे आणि जागोजाग हे दृश्य दिसून येत आहे.

संघटनेत विविध पक्षीय विचारसरणीची माणसे आहेत. परंतु 'अयोध्यानगर'ची संघटना राबवताना मात्र कुठल्याही पक्षाचे कांकण बांधून काम केले गेलेले नाही. ह्या सर्वच प्रयत्नांना यश येऊन आज ह्या झोपडपट्टीत आठ संडास उभे आहेत. अर्थातच, इतर ठिकाणी पाहायला मिळणारे दृश्य ह्या ठिकाणी नसते हे ओघानेच आले.

ह्यानंतर एक झोपडीवजाच, पण मोठी जागा उभारण्यात येऊन 'अयोध्यानगर प्राथमिक शाळे'ची सुरुवात केली गेली. ह्यासाठी एकूण खर्च सहा हजार रुपये आला. आज ह्या शाळेतून पहिल्या दोन इयत्तांतून मिळून शंभराच्या वर विद्यार्थी आहेत. दोन शिक्षक आहेत. शिक्षण अर्थात प्रायः विनामूल्य आहे. सुरुवातीला के. जी. व प्रौढवर्ग चालवायचाही प्रयत्न केला गेला. पण फारसे यश आले नाही. के. जी. वर एका पारशी युवतीला नेमले होते. तिने पगाराशिवाय मुलांच्या फीचे, पुस्तकांचे पैसेच हडप केले. अर्थात ह्या अनुभवानंतर तो प्रयोगच बंद केला गेला. शाळा सुरू झाल्यानंतर, साहजिकच, नगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले गेले. बहुधा येत्या जूनपासून ही शाळा नगरपालिकेला 'देणगी'दाखल दिली जाईल. अर्थातच, नगरपालिकेने शाळा चालवायला घेतली तर भाडे घ्यायचे नाही असे अयोध्यानगरच्या रहिवाश्यांनी ठरवले आहे. आजूबाजूच्या दीड–दोन मैलांच्या परिसरात दहा–पंधरा हजारांची वस्ती आहे. पण शाळा मात्र एकही नाही. अर्थात ह्या शाळेचा विकास व्यवस्थित झाल्यास शाळा फार छान चालू शकेल हे उघड आहे. "शाळा नगरपालिकेच्या ताब्यात देताना, शाळेच्या विकासाबरोबरच इथल्या भागाचाही विकास होईल, झोपडपट्टीलाही 'अभय' मिळेल, असा तर आपला हेतू नाही ना?" माझ्या ह्या प्रश्नावर अयोध्यानगरचे कार्यकर्ते अर्थपूर्ण हसले!

ह्या सर्व कार्यानंतरही आज संघटनेच्या नावावर आठ–दहा हजार रुपये जमा



आहेत. अद्यापही वर्गणी गोळा करणे चालूच आहे. शिवाय सांस्कृतिक कार्यक्रम, काही नाटकांचे प्रयोग वगैरेद्वाराही निधी उभा करण्याचे प्रयत्न चालू आहेतच. ह्याशिवाय प्रौढ शिक्षण-वर्ग, हायस्कूल, व्यायाम शाळा, मोफत वाचनालय वगैरे काही कार्यक्रम संघटनसमोर आहेत. झोपड्यांच्या मजबुतीकडे प्रथम लक्ष दिल्यामुळे पक्की इमारत हा प्रश्न इथे निकडीचा राहिलेला नाही. जोपर्यंत पुरेसा पैसा उभा राहत नाही व सरकारमार्फत जागा मिळत नाही, तोपर्यंत हे इतर कार्यक्रम हाती घ्यायचा आमचा विचार आहे. त्यामुळे आपोआपच कामगारांत जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. मटका, दारू, बाई ह्यांना ह्या लोकशिक्षणामुळेच पायबंद बसेल. निदान आमच्या संघटनेचे तरी ते कार्यक्षेत्र राहील. आज आमच्यापुढील महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, आम्हांला इथून हुसकले जात नाही ह्याची खबरदारी घेणे. काही वर्षांत आम्ही इथे पक्की इमारत निश्चित उभी करू!" अयोध्यानगरचे कार्यकर्ते सांगत होते.

अशा तऱ्हेच्या कार्याबाबत राजकीय पक्ष, कामगारसंघटना उपेक्षा दाखवतात

## सौंदर्यापेक्षा सोय...

"प्रश्न बेकारीचा असो, कारखान्याच्या टाळेबंदीचा असो, की चाळ दुरुस्तीचा किंवा झोपडपट्ट्यांचा असो, सर्वांचे मूळ आपल्याला जागांच्या वाढलेल्या भरमसाट किमतींमध्ये सापडेल. ह्या सर्वांवर उपाय, माझ्या मते तरी एकच. कम्युनिस्ट पद्धतीची विचारसरणी! सर्व जागा १९४७ च्या किंमतीप्रमाणे नुकसानभरपाई देऊन सरकारने ताब्यात घेतल्या आणि तिथे पुनर्वसनाची सोय केली तरच हा प्रश्न सुटायच्या दिशेने पावले पडू शकतील... सरकार चाळी पाडून, झोपडपट्टया उठवून, त्यांना पर्यायी जागा दूरवरच्या उपनगरांतून देते. त्याऐवजी रेसकोर्स, टी. बी., महारोग दवाखाने लांबवर नेऊन त्या जागी पुनर्वसन केले तर लांबवर जायला तयार नसलेले कामगार निश्चितच दुवा देतील. शिवाय कामाच्या जागेपासून लांब राहायला जाण्यात त्यांच्या अडचणीही वाढतात...दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी उद्‌ध्वस्त झाला. पूर्व बर्लिनमध्ये सरकारने जमिनी ताब्यात घेऊन तिथे एकसारखी घरे बांधली. कुणी म्हणतात हे सारे साचेबंद वाटते. साचेबंद असेल कदाचित् पण आज तिथल्या प्रत्यकाला राहयला घर तरी आहे ना? आणि तेही मासिक उत्पन्नाच्या केवळ पाच टक्के भाड्यात? त्यांतल्या सौंदर्यापेक्षा ही सोय मला अधिक महत्वाची वाटते!"

—श्री. दिनकर साक्रीकर.

असेच इथल्या एका कार्यकर्त्याचे मत दिसले. काही दिवसांपूर्वी ह्याच भागातल्या दोन ठिकाणच्या झोपडपट्ट्यांना आगी लागल्या. वास्तविक राजकीय पक्षाचे, कामगार संघटनांचे हे काम होते की, ह्या ठिकाणी जाऊन पुनवसनाला मदत करणे. पण खेद ह्याचा होतो की, असा पुढाकार कुणीच घेतला नाही. ह्या ठिकाणच्या रहिवाश्यांनी कशाबशा, उधार-उसनवारी करून, झोपड्या पुन्हा उभारल्या. आज अयोध्यानगराचे काम पाहून इथेही संघटना उभ्या राहत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन अर्थातच मिळाले पाहिजे. लिटल मलबार हिल्स, चेंबूर, वरळी, परळ येथील झोपडपट्ट्यांतूनही अशाच पद्धतीवर पावले उचलली जात आहेत. हे बदल स्वागतार्ह असले तरी अपुरे आहेत असेच मला वाटते. 'अयोध्यानगर'प्रमाणे काम करणारांचे संचच्या संच उभे राहिले पाहिजेत. त्यांच्या ह्या विधायक चळवळींना समाजातल्या सर्वच थरांनी, सर्व राजकीय पक्षांनी हातभार लावला पाहिजे. तरच ह्या उपेक्षितांचे अंतरंग बदलण्याची शक्यता आहे!

'झोपडपट्ट्यांतून अनैतिक धंदे–दारू गाळणे, वेश्याव्यवसाय वगैरे–करायला मिळतात, त्यांतून पैसाही बरा मिळतो. म्हणून खूप लोक आपली राहती घरे सोडून झोपड्यांतून राहायला जातात.' असा प्रवाद मला ऐकायला मिळाला. झोपडवासियांना ह्या प्रश्नावर मी मुद्दामच छेडले. "असा प्रकार असेल, पण क्वचितच. इथले बहुतेक रहिवासी कारखान्यांतून, बेस्ट, नगरपालिका, आदींतून व काँट्रॅक्टर्सकडे कामे करणारे असतात. अर्थात लोकांत समज आहेत तसले अनैतिक धंदे इथे होतच नाहीत असे नाही. पण अशा पद्धतीने जगणाऱ्यांची संख्या शेकडा दोन-तीनपेक्षा जास्त नाही हेही निश्चित! त्यासाठी सगळ्याच झोपडवासियांना झोडपण्यात काय अर्थ आहे?" असाच प्रतिसवाल मला बऱ्याच ठिकाणी केला गेला. भटकत असताना तो खरा आहे असेच मला आढळले. झोपड्या सगळ्याच अस्वच्छ असतात, हा प्रवादही श्री. साक्रीकरांनी व इतर अनेकांनी खोडून काढला. ते म्हणाले, "काठेवाडी हरिजनांच्या, नवबौद्धांच्या किंवा कॅथॉलिकांच्या झोपड्या तुम्ही पाहा. आतून बाहेरून अगदी स्वच्छ असतात. काठियावाडी हरिजन गृहिणी घासलेल्या भांड्यांची सुंदरशी उतरंड घरात रचून ठेवते. ह्या भांड्यांची स्वच्छता इतकी असते की त्यात तुम्ही आपले प्रतिबिंबही बघून घ्यावे. अर्थात अनेक झोपड्यांतून घाण, अस्वच्छता असते. अनैतिक धंदे चालतात. हेही बहुतेकांनी मान्य केले. पण त्यावरचा उपाय, त्याकडे पाहून नाके मुरडणे हा नाही तर यांच्या उद्धारांचा प्रयत्न करणे हाच असला पाहिजे. आणि ही सरकारची, तशीच सर्व पक्षांची, सर्वच समाजाची पण जबाबदारी आहे. ◻

# ५

# लेबर बँक

कामगार चळवळीच्या वाटचालीची नवी चाहूल ऐकू येऊ लागली आहे हे निश्चित ! राहत्या घरांच्या बाबतीत प्रत्यक्ष कामगारसंघटना काही कार्य करीत नाहीत हे खरे असले, तरी त्या त्या कामगारवस्त्यांतलेच कामगार पुढे येऊन त्या प्रश्नाबाबत काही हालचाल करताना दिसत आहेत, हेही निश्चित. हे प्रयत्न फारच तोकडे आहेत पण म्हणून त्यांचे महत्त्व कमी होत नाही हेही तितकेच खरे. दिशा मिळाली आहे. त्या दिशेने किती जोरात आगेकूच करायची हे नेतृत्वावर अवलंबून आहे. राहण्याच्या प्रश्नाबाबत जी परिस्थिती, तीच कामगारांच्या इतर प्रश्नांबाबत ! आजपर्यंत कामगार चळवळ म्हणजे वेतनश्रेण्यांतली वाढ, महागाई-भत्त्यांतली वाढ, बोनस वगैरे प्रश्नांवरचे लढे असे समीकरण बनलेले होते. निदान कित्येक जाणत्यांचे तरी तसे मत बनलेले होते. आजही एक प्रभावी मतप्रवाह हेच सांगतो की, आर्थिक चळवळींतूनच कामगारशक्ती उभी राहील. ह्या पंथियांनी आपल्या सगळ्याच कृतींचा रोख ह्या एका विचाराच्या दिशेने ठेवला आहे आणि ह्या विचारांच्या संघटनांचा आजही कामगारांवर बराच मोठा प्रभाव आहे. ह्या तऱ्हेच्या प्रश्नांवरील आंदोलनातून कामगाराला चटकन आकर्षित करता येते, हा त्यातला महत्त्वाचा भाग आहे.

असे असले तरी काही कामगारसंघटना व काही कामगारांचे गट आज वेगळ्या दृष्टिकोणातूनही विचार करू लागले आहेत. नुसत्या आर्थिक मागण्यांपेक्षा इतरही काही समस्या कामगारांपुढे आहेत ह्याची जाणीव हळूहळू होऊ लागली आहे आणि ह्या समस्या त्यांना सुशिक्षित करून, त्यांना जबाबदारीची जाणीव होईल असे कार्यक्रम देऊन सोडवल्या गेल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे अधिक सवलती, अधिक वेतन दिल्यास व त्यासाठी काही मर्यादा घालून दिल्यास कामगारही खुशीने अधिक उत्पादन देतो हेही हळूहळू उद्योग-धंद्यांच्या संचालकांना पटू लागलेले आहे. कामगार नेत्यांनीही हे सूत्र ध्यानात ठेवले पाहिजे. वेतनवाढीसाठी लढे उभारताना, तुम्ही वेतनवाढ द्या, आम्ही उत्पादनवाढ देतो, असे सांगितले पाहिजे. कामगारांनाही त्यांनी ह्या दृष्टीने बघायला शिकवले पाहिजे.

३ मे १९६९

'इन्सेंटिव्ह योजने'चा ( अधिक उत्पादन–अधिक लाभ ) 'बेस्ट' यंत्रणेवर झालेला परिणाम पाहण्यासारखा आहे. पूर्वी बसेस केव्हा कशा धावतील ह्याचा नेम नव्हता. कंडक्टर्स नियमानुसार तर सोडाच, पण बसमध्ये जागा असतानासुद्धा कित्येकदा प्रवाशांना आत न घेता दोन घंट्या मारीत. त्यात अर्थातच त्यांचा त्रास वाचत असेल. 'बस'च्या विशिष्ट सफरी (Trips) झाल्या पाहिजेतच ह्या बंधनामुळे बसेस 'नादुरुस्त' किंवा 'शैक्षणिक' सारख्या पाट्या लावून ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत रिकाम्याच पळवल्या जात असत. हे प्रकार पूर्वी नित्यातले असायचे. गैरहजेरीचे प्रमाण जास्त असायचे. परंतु 'इन्सेंटिव्ह' योजना चालू केल्यापासून मात्र सगळेच चित्र बदलले आहे. गैरहजेरी कमी झाली आहे. गाड्या नियमित धावत आहेत. नादुरुस्तीचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. पूर्वी बसेस रिकाम्या ठेवून दोन घंट्या मारणारा कंडक्टर आता एक–दोन नव्हे, पाच–दहा उतारू जास्त घेतो आहे. एक बस इन्स्पेक्टर सांगत होता, "हल्ली आम्हांला चेकिंगचे काही फारसे कामच पडत नाही. पूर्वी प्रत्येक ट्रिपला एक-दोन चुकारपणाचे प्रकार तरी हमखास असायचे. आता सगळेच रिपोर्टस् कसे स्वच्छ असतात." 'बेस्ट' च्या कॅश-कलेक्शन मध्येही वाढ झाली आहे. एक कर्मचारी सांगत होता, "'बेस्ट'-मधला प्रत्येक कर्मचारी आज महिन्याला तीस-चाळीस रुपये जास्त कमवत आहे. काम तो पहिल्याइतक्याच वेळ करतो, होता–फक्त आता अधिक मन लावून काम एवढाच फरक."

एक कर्मचारी श्री. करजकरांनी सांगितले ( हे स्वतः 'बेस्ट' वर्कर्स संघटनेचे सदस्य आहेत ) की, 'बेस्ट'च्या ह्या योजनेला डाव्या गटांच्या युनियन्सचा विरोध होता. त्यांच्या मते इन्सेंटिव्ह पद्धती म्हणजे एक प्रकारे कमिशन पद्धतीच ! आणि कमिशन पद्धती म्हणजे भांडवलशाही ! आता गंमत ही की 'बेस्ट' ही संघटना नगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आहे. मग तिथे भांडवलशाहीचा प्रश्न येतोच कुठे ? अर्थात ह्या वादात शिरायचा इथे इरादा नाही. पण एवढे निश्चित की ह्या योजनेमुळे खुद्द 'बेस्ट', 'बेस्ट'ची कार्यक्षमता व कामगार–ह्या सर्वांचाच फायदा झाला आहे आणि सर्वांचाच फायदा होत असेल तर तो स्वागतार्हच आहे– मग तो होताना कम्युनिझमचा अवलंब केलेला असो अथवा समाजवादाचा किंवा भांडवलशाहीचा केलेला असो !

कामगारचळवळीला वेगळे वळण लावण्याच्या दृष्टीने असाच एक वेगळा प्रयोग संसोपा खासदार जॉर्ज फर्नांडिस ह्यांच्या नेतृत्वाखाली सध्या सुरू आहे. तो म्हणजे लेबर बँकेचा ! श्रमजीवी लोकांमध्ये काटकसरीची भावना जागृत करणे ह्या उद्देशाने श्री. जॉन डिसिल्व्हा ह्यांच्या नेतृत्वाखाली ही लेबर बँक २१ नोव्हेंबर १९६७ रोजी सुरू झाली. ह्या दिवशी ह्या बँकेचे ५५५ भागधारक होते.

आणि ' पेड अप कॅपिटल ' एक लक्ष सातशे वीस रुपये होते. अवघ्या आठ महिन्यात म्हणजे ३० जून १९६८ पर्यंत समासद संख्या २५३५ वर गेली असून मूळ भांडवल ३,४२,७२० रुपयांवर गेले. पुढील एका वर्षात ही वाढ आणखीनच झाली आहे व आता लौकरच गिरगाव सायन–कोळीवाडा आणि चेंबूर ह्या विभागात ह्या बँकेच्या शाखा उघडण्यात येत आहेत. टॅक्सी, छोटे उद्योगधंदे, नवीन उद्योग-धंदे, जुन्या कर्जांची फेड, जागा, वैद्यकीय मदत, घरदुरुस्ती आदींसाठी ही बँक आपल्या सभासदांना नाममात्र हमीवर कर्ज देते. जून १९६८ अखेर जवळजवळ ९ लाख रुपये कर्जाच्या रूपाने दिले गेले होते. कर्जवसुलीच्या बाबतीत आमचा अनुभव फार चांगला आहे असे श्री. डिसिल्व्हांनी सांगितले. अवघ्या दीड वर्षाच्या छोट्याशा कालखंडात ह्या बँकेने खरोखरच घवघवीत यश संपादले आहे. आज ह्या बँकेच्या साहाय्याने काही टॅक्सी ड्रायव्हर्सनी स्वतःच्या टॅक्सीज् खरीदल्या आहेत. थोड्याशा कामगारांनी स्वतःचे व्यवसाय उभारले आहेत. ह्या चळवळीबाबत ' फायनॅन्शियल एक्सप्रेस'ने काढलेले उद्गार खरोखरच अगदी सार्थ आहेत. ते पत्र म्हणते, " या बँकेने भारतीय कामगारचळवळीच्या इतिहासात एक नवीनच पर्व सुरू केले आहे. इंटक जेथे अपयशी ठरली तिथे श्री. जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी भरघोस यश मिळविले आहे."

ह्या छोट्याशा बँकेचे छोटेसे मॅनेजिंग डायरेक्टर (इति श्री. दिनकर साक्रीकर) श्री. डिसिल्व्हा म्हणाले, " ह्या चळवळीने कामगारांना पठाणापासून, २४ ते ४८ टक्के व्याज घेणाऱ्या सावकारांपासून मुक्त केले आहे. बँक त्यांना अवघ्या ८ ते १० टक्के व्याजाने कर्ज देते. ...शासनाकडून मात्र आम्हांला सापत्न भावाची वागणूक मिळते." मी तिथे बसलो असतानाच एक फोन आला. ' इंडियन ऑईल कंपनी 'ने ' लेबर बँके 'चा चेक नाकारल्याची तक्रार एक समासद करीत होता, " हा अनुभव आम्हांला नवीन नाही, श्री. सोमण, " श्री. डिसिल्व्हा सांगत होते. " आमच्या कार्यात नेहमीच अडचणी उभ्या राहतात. घरदुरुस्ती, चाळदुरुस्ती वगैरेसाठी तिथल्या संघटनांना कर्ज द्यायचा आमचा मानस होता; पण तशी परवानगीच आम्हांला नाकारण्यात आली... ह्या अडचणी आहेतच. पण त्यातूनही आम्ही तरून जाऊ. आमच्यापुढे असलेल्या अनेक योजना आम्ही यशस्वी करूच, असा आम्हांला भरंवसा आहे. ह्या योजनांचा आलेखही ' माणूस 'ला पुढेमागे सादर करायचा विचार आहे.

ह्याच धर्तीवरचा पण थोडासा वेगळा प्रयोग ' आझाद युवक मंडळा 'तर्फे चालू आहे. लालबागला चाळीतल्या एका खोलीत हे मंडळ तूर्त काम करते. श्री. बाबाजी पाटलांच्या नेतृत्वाखालील ह्या मंडळात अवघे अकरा कामगार सदस्य आहेत. मूलतः ही कोल्हापूरकडच्या एका खेड्यातल्या गावकऱ्यांची संघटना ! मुंबईत पैसा जमा करून गावाचा उत्कर्ष घडवून आणणाऱ्या योजना राबवायच्या

ही मूळ कल्पना. पण त्यात सुरुवातीच्या काही महिन्यांतच भांडणे झाली, फाटाफुटी झाल्या. त्यातल्याच अकरा जणांनी स्वतःची वेगळी संघटना स्थापन केली. 'आझाद युवक मंडळा'चा जन्म अशा प्रकारे १९६४ साली झाला. दरमहा ही मंडळी दरडोई १५ रु. जमा करतात. त्यातूनच सभासदाला व्याजाने कर्ज देतात. अन्य रक्कम बँकेत जमा होत आहे. त्यांनी स्वतःसाठी एक व शिवाय एक अशा दोन खोल्या आठ हजार रुपये खर्चून घेतल्या आहेत. एका खोलीत 'पेईंग गेस्ट' पद्धतीवर भाडेकरू घेतले जातात. शिवाय व्याजाचा पैसा उभा राहतो. आजमितीस ह्या मंडळाजवळ १८००० रु. जमा आहेत. त्याखेरीज वेळ पडेल तेव्हा केव्हाही सहा–सात हजार रुपये उभारायची त्यांची तयारी आहे. त्या सर्वांचे अंतिम उद्दिष्ट आहे नोकरीच्या पाशातून सुटून (११ जणांनी) कारखानदार बनायचे! व्यवसायदेखील शक्यतो स्वतःच्या गावीच सुरू करायची इच्छा आहे. ही एक वेगळी ईर्षा आज कामगारवर्गात निर्माण होत आहे. एका सुयोग्य बदलाचे हे सुचिन्ह आहे असेच मला वाटते! ह्या संबंधात बोलताना श्री. किशोर देशपांड्यांनी सांगितले की, कित्येक गिरणीकामगार ह्या तऱ्हेने पावले टाकीत आहेत. विशिष्ट कालमर्यादा ठरवून घेऊन ते बचत करीत आहेत. त्यातून त्यांचे उद्दिष्ट स्वतःचे यंत्रमाग चालू करायचे. आज भिवंडी, मालेगाव आदी ठिकाणी असे माग गिरणीकामगारांनी व्यक्तिशः, संघटितरीत्या सुरू केले असल्याचेही समजले.

## ते देशद्रोही आहेत........

"कुठलीही कामगारसंघटना राबवताना 'राष्ट्र' प्रथम डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. राष्ट्राची शान ती माझी शान हा दृष्टिकोण प्रत्येक कामगाराठायी निर्माण केला गेला पाहिजे. त्यानंतर कामगार ज्या ठिकाणी राबतो त्या उद्योगाविषयी, कारखान्याविषयी त्याच्या मनात निष्ठा असली पाहिजे. उत्पादन वाढल्याशिवाय मागण्या सादर करण्याचा अधिकार आपल्याला नाही, हे त्याच्या मनात प्रसंगी कटुता स्वीकारूनही बिंबवले पाहिजे. ह्या नंतरच कामगारांच्या वैयक्तिक प्रश्नांचे स्थान राहील.

'राष्ट्र' म्हणून प्राधान्य देऊन कार्य करण्याच्या कल्पनेलाच कम्युनिस्टांचा विरोध असतो. विधायक दृष्टिकोणच त्यांना नको असतो. स्पष्टच सांगायचे तर इथे जन्मले असले तरी त्यांच्या निष्ठा बाहेर आहेत. ते देशद्रोही आहेत! म्हणूनच इतर कुणाशीही मैत्रीचा प्रस्ताव मी स्वीकारेन, पण त्यांच्याशी नाही!"

**श्री. अबिद अली**

उपाध्यक्ष. आय्. एल्. ओ.

आजच्या कामगाराची उद्याचा मालक व्हायच्या दृष्टीने काही वाटचाल सुरू आहे का? तशी चळवळ निश्चित सुरू आहे की नाही हे जरी सांगता येत नसले तरी अशा तऱ्हेचा प्रयोग, बंद पडलेल्या 'एडवर्ड मिल'च्या रूपाने घडवून आणायचा प्रयत्न मात्र चालू आहे. आजची कापडधंद्यातली मंदी सर्वश्रुतच आहे. त्यामुळे गिरण्या बंद पडणे ह्याचीही आता सवय झाली आहे. अशा गिरण्या दिवाळे निघून बंद पडल्या की, 'बेकारी निवारणार्थ' योजनेखाली सरकार त्या चालवायला घेते. एक-दोन वर्षे सरकारी नियंत्रणाखाली चालल्यावर गिरणी विकत घ्यायला जुना किंवा एखादा नवीन मालक पुढे सरसावतो. सरकार त्याच्या ताब्यात गिरणी देते. तो मलई चाखून घेतो आणि पुन्हा वर्ष-दोन वर्षांनी गिरणीला टाळे ठोकतो. हा अनुभवही आता जुना झाला आहे. सक्सेरिया मिल अशी दोनदा बंद पडली, सरकारने चालू करून खाजगी मालकाकडे सोपवली. पण आता ती तिसऱ्यांदा बन्द पडली आहे.

मुंबईतली एडवर्ड मिलही अशीच बंद पडली आहे. सरकारने गिरणी सुरू करायला पैसे नाहीत असे सांगितले. मालक तर दिवाळेच काढून बसला होता. शेवटी कामगार व युनियन पुढे आली. कामगारांच्या फंडाच्या पैशातून पंचेचाळीस लक्ष रुपये सरकारला कर्जरूपाने दिले गेले. सरकारनेही आता ही गिरणी चालू करायचे ठरवले आहे. सुरुवातीच्या साफसफाईचे वगैरे काम संपले आहे नि बहुतेक आठवड्याभरात ही गिरणी सुरू व्हायची शक्यता आहे. ह्या गिरणीची साफसफाई व्हायला निदान दीड वर्षतरी लागेल असा जाणकारांचा कयास होता. पण आपल्याच पैशातून हे काम होत आहे ही आपुलकीची भावना निर्माण होताच कामगारांत उत्साहाचे वारे संचारले. सफाईचे काम अवघ्या सहा महिन्यात संपले. सध्या सुरुवातीला दोन वर्षे ही गिरणी सरकारने चालवावी; त्या वेळात कामगारांचे प्रतिनिधी शिकून तयार व्हावेत व नंतर गिरणीची मालकीच कामगारांकडे यावी असा हा प्रयोग आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर ही खाजगी मालकीची गिरणी तीन हजार कामगारांच्याच मालकीची बनेल व भारतीय कामगार चळवळीच्या इतिहासातले हे फार मोठे धाडस ठरेल!

"हा प्रयोग यशस्वी झाला तर खरोखरच फार चांगला आहे. पण मला त्याबाबत शंका वाटते." श्री. दिनकर साक्रीकर सांगत होते. "शंका अशासाठी की, कामगारमालकीची अशी ही एखादीच गिरणी असणार। खाजगी क्षेत्रातले उद्योगपती ती कितपत चालू देतील ह्या विषयी मी साशंक आहे." मजूरमंत्री श्री. नरेंद्र तिडकेजवळ ही शंका बोलून दाखवली असता ते म्हणाले, "ह्या बाबतीत सरकार कामगारांना सर्वतोपरी साहाय्य करील; व प्रयोग फसू नये म्हणून शक्य ते सर्वच उपाय योजील...एवढेच नव्हे तर राष्ट्रीयीकरणापेक्षा, ह्या प्रयोगाचे महत्त्व मला जास्त वाटते. प्रत्यक्ष सरकारही अशा तऱ्हेचा प्रयोग करू पाहत आहे.

नागपूरची मॉडेल मिल व अमळनेरची प्रताप मिल चालू करताना सरकारी भाग भांडवल ५१ टक्के असेल, तर उरलेल्यातले जास्तीत जास्त भांडवल प्रत्यक्ष श्रमिकांकडून उभे करायचा प्रयत्न केला जाईल. अर्थात गिरणीची मालकी, गिरणीचे व्यवस्थापन ह्यांत त्यांना महत्त्वाचा वाटा दिला जाईल." ह्या प्रयोगाची अधिक विस्तारपूर्वक माहिती 'माणूस' साठी द्यायचे, तिथल्या प्रयोगातल्या एका कार्यकर्त्याने कबूल केले आहे.

'सहकारी चळवळ' हाही कामगारचळवळीत अंतर्गतच विषय होऊ शकेल. पण काही मर्यादेपर्यंतच तो कामगारांना लागू होईल. विशिष्ट उद्योगासाठी वा कोणत्याही कार्यासाठी कामगारांचा आपसातला सहकार एवढाच त्याचा अर्थ घेतला पाहिजे. एरवी सहकारी कारखान्यातल्या कामगारांचेही प्रश्न आहेतच. पण खरे पाहिले तर 'सहकारी चळवळ' हा स्वतंत्र अभ्यासाचाच विषय म्हटला पाहिजे.

आज कामगारचळवळीची वाटचाल पाहता. नवीन चाहूल ऐकू येत आहे हे निश्चित! पण तरी कामगारांचे अनंत प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने ह्या चळवळीने जी गती घ्यायला पाहिजे, ती अजून तरी घेतलेली नाही. घर, निवारा, अन्न, वस्त्र आणि शिक्षण हे चारीही मूलभूत प्रश्न आजही त्याला भयानकरीत्या भेडसावत आहेत. हे प्रश्न सोडवत असताना कामगारचळवळ जितकी विधायक होईल तितकी ती अधिक संघटित होईल. अधिक मजबूत पायावर उभी राहील. पण त्याचबरोबर समाजाच्या एकंदर विचारसरणीलाही नवे वळण द्यायचा प्रयत्न नेतृत्वाने केला पाहिजे. सामाजिक नेतृत्व ह्या दृष्टीने थिटे पडत आहे. विषमता कमी करण्याच्या दृष्टीने सरकारी पावले पडतानाच दिसत नाहीत. 'उषा-किरण'-सारख्या गगनचुंबी आलिशान इमारती उभ्या राहतात. पण त्या घडवणारा कॉंट्रॅक्टमधला मजूर मात्र गलितगात्र अवस्थेत जगत असतो. कुठल्यातरी खुराड्यात किंवा एखाद्या पुलाखाली किंवा फुटपाथवर आला दिवस कंठीत असतो. ह्या प्रकाराची जोपर्यंत समाजाला लाज वाटत नाही, आपल्यातलाच एक मरणप्राय जिणे जगतो आहे ह्याची खंत त्याला वाटत नाही, तोपर्यंत ह्या समाजाचे आणि पर्यायाने देशाचे भवितव्य काळेकुट्टच राहणार आहे, हे निर्विवाद!

ह्या निराशेतदेखील आशेचा किरण दिसतो तो ह्या कामगारांना—श्रमिकांना त्यांच्या स्वत्वाची आठवण करून देणाऱ्या चळवळी दिसल्या म्हणजे! ह्या चळवळी हाच ह्या कामगार—दिनाच्या दिवशीचा दिलासा! हा धागा नीट सांभाळला पाहिजे. त्यातून व्यापक चळवळ उभी राहिली पाहिजे!!

○

**या पुरवणीतली छायाचित्रें- श्री. विलास फाटक-मुंबई**

 [पान १८ वरून]

तू या हरिजन तरुणाला विहिरीवर पाणी भरू दिले नसावेस म्हणून त्याने आत्महत्या केली !"

ब्राह्मण म्हणाला– "सरकार, गावात सरकारनेही दोन विहिरी बांधल्याची वदंता आहे. सरकारात खर्च पडला आहे. मी सर्व गाव नेहमी हिंडतो. विहिरी मला सापडल्या नाहीत ! ते असो. गावात माझ्या विहिरीला भरपूर पाणी आहे. फक्त माझ्याच विहिरीवर हा हरिजन बंधू पाणी भरू शकत असे. गावात इतरांच्या विहिरी आहेत. तिथे याला पाणी मिळत नसे !"

गृहमंत्री म्हणाले– " उद्दाम माणसा ! जातीय बोलू नकोस. फक्त मुद्दा सांग !"

रामप्रभू गृहमंत्र्यांना म्हणाले– "मुद्दा मला कळला आहे. तुम्हांला अजून कसा कळला नाही ? गावात बेपत्ता झालेल्या विहिरींचा तपास करा. खाते सांभाळा."

रामप्रभू म्हणाले– "या हरिजन तरुणाचे वय काय होते ?"

पोलिस पाटलाने सांगितले– "पंचवीस वर्षे."

"मग इतकी वर्षे हा करीत होता काय ?"

ब्राह्मण म्हणाला– "मी सांगू का ?"

रामप्रभूंनी इशारा करताच ब्राह्मण म्हणाला– "हा फार सच्छील गृहस्थ होता. एखादा व्यवसाय करता तर सुखाने जगला असता. परंतु गेली ८–९ वर्षे हा इंग्रजी घेऊन एस. एस. सी. पास होण्याच्या खटपटीत होता. मी त्याला सांगून पाहिले, की आता हा नाद सोड. तुझ्याबरोबरचे हरिजन तरुण उद्योगाला लागले. मी कुठे एस. एस. सी. आहे ? पण बिचारा निराश झाला आणि अखेर त्याने आत्महत्या केली...!

" अरेरे ! " मुख्यमंत्र्यांनी उसासा सोडला. त्यांच्या डोळ्यात पाणी तरळत हते.

इतक्यात कायदा मंत्री उभे राहिले. त्यांच्या डोळ्यातून अग्निफुले सांडत होती. ब्राह्मणाकडे क्रुद्ध मद्रेने पाहत ते म्हणाले– "हा जातीय ब्राह्मणच या सर्व अनर्थाला जबाबदार आहे. S. S. C. न होता ही हा तरुण मंत्री होऊ शकला असता, गृहरचना सोसायटीचा अध्यक्ष होऊ शकला असता, जिल्हा परिषदेत शिक्षण समितीचा अध्यक्ष होऊ शकला असता हा निराश झाला आहे हे आमच्या कानी येते तर आम्ही त्याची निराशा घालवली असती. परंतु या ब्राह्मणाने त्याला आणखी निराश केला. हरिजन शिकू लागले तर यांची मिरास जाईल अशी यांना भिती वाटते. याचा सर्व विचार जातीय आहे. ही आत्महत्या नाही. हा खून आहे. हा माणूस ढेकण चे विष पिऊन मेला असे कॉरोनर म्हणत असला, तरी जातीय वादाने घेतलेला हा बळी आहे. हा हुतात्मा आहे."

राम प्रभून आज्ञा दिली– "या ब्राह्मणाचे मुंडके उडवा... ब्राह्मणाचे मुंडके उडवण्यात आले परंतु गतप्राण झालेला हरिजन बांधव काही उठू शकला नाही. तूर्त राम पुन: चिंतेत आहेत.

– ग्यानबा

# तु म चे भ वि ष्य

# आ म चा अं दा ज

## ३ ते ९ मे राशिभविष्य

### श्री. गो. जोशी सायनाचार्य

**मेष :** सध्याचे आपले ग्रहमान फारसे चांगले नाही, पण परिस्थितीपुढे शरणांगती पत्करणे तुमच्या रक्तातच नाही. या आठवड्यातच आपण परिस्थितीवर विजय मिळवून दाखवाल.

शक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश मिळेल. सामाजिक, राजकीय क्षेत्रात तर सतत आघाडीवर राहाल. पण प्रकृतीकडे अगदीच दुर्लक्ष करून चालण्यासारखे नाही. प्रत्येक बाबतीत जुळते मिळते घेण्याची तयारी ठेवायला हवी. थोरांची कृपा कोणत्याही क्षणी लाभेल आणि त्यामुळेच वेळ निभावून जाईल.

दि. ५–६–७ अपेक्षेबाहेर यश पदरी पडेल.

**वृषभ :** एकट्या गुरूशिवाय अन्य ग्रहांची सहानुभूति आपणांस लाभेलशी दिसत नाही. मतभेद, संघर्ष, व्यावसायिक विरोध इ. सारे प्रकार मधून मधून अनुभवावे लागले तरी अपयशाची धास्ती मुळीच बाळगू नका.

सांपत्तिक ताण खूपच वाढेल. व्यावसायिक अडचणी वरचेवर जाणवायला लागतील. असे असूनही कोणत्याही बाबतीत माघार घेण्याचा प्रसंग चुकूनही येणार नाही. कला, नाट्य, साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना तर हा एक काल वाटेल.

दि. ७–८–९ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** मिथुन राशी व्यक्तींना सूर्य एकादशांत असेपर्यंत सहसा कोणत्याही गोष्टीबद्दल माघार घेण्याचा प्रसंग येणार नाही. या आठवड्यात आपल्या स्थगित कामाना गती मिळू लागेल. प्रगतीकडे वाटचाल सुरू होईल.

व्यापार, शेती, परराष्ट्रीय व्यवहार या बाबतीत आजवर सहसा न मिळू शकलेले यश या वेळी पदरी पडेल.

नोकरीतही एक पाऊल पुढे पडेल. स्थावराचा प्रश्न सुटेल. नव्या व्यवसायाच्या आशा अंकुरायला लागतील.

दि. ६–७–८ अपेक्षित लाभ पदरी पडावेत.

**कर्क** : सहसा कोणत्याही गोष्टीत नडावे असा काळच आता नाही. कोणतेही काम हाती घेतलेत तर ते।घवघवीत यश घेऊनच उठेल.

विज्ञान, राजकारण शिक्षण या क्षेत्रांत तर तुमचे महत्त्व अनन्यसाधारण ठरेल. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभही घडून येणे शक्य आहे.

कला, नाट्य क्षेत्रांतील व्यक्तींना दूरचा प्रवास घडेल, नवे आकर्षक करार-मदार केले जातील, थोरांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल. नव्या जबाबदाऱ्या वाढू लागतील.

दि. ४ ते ६ या कालांत सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.


**सिंह** : सूर्य-बुध भाग्यस्थानी एवढे सामर्थ्यही वक्री मंगळाला शह द्यायला पुरेसे आहे. आता परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही अशी खात्री वाटू लागेल.

सांपत्तिक पेचप्रसंग सोडवू शकाल. नोकरीधंद्यांतील विवंचना मिटवू शकाल, थोरांच्या मदतीने पुढे पाऊल टाकणे शक्य होईल.

मुख्यतः कला, साहित्य, विज्ञान क्षेत्रांत तुमचे महत्त्व या काली निर्विवादपणे सिद्ध होईल.

वरचेवर प्रवास घडू लागतील आणि त्या प्रवासामुळेच आपले प्रश्न सुटायला लागतील. मंगल कार्यांचे जवळ जवळ निश्चितच ठरेल.

दि. ५ ते ७ या कालाची नोंद घ्या.



**भारतीय संगीत वाद्यांचे**
**प्रमुख निर्यातदार**

नावीन्यपूर्ण इलेक्ट्रिक
गिटार, मेंडोलीन व बुलबुलतरंग
इत्यादींचे आद्य प्रवर्तक

**हरिभाऊ विश्वनाथ कं.**
संगीत वाद्यालय, दादर, मुंबई २८.

**कन्या :** एकटा पराक्रमस्थ मंगळ तुमच्या अंगीकृत कार्यात घवघवीत यश द्यायला पुरेसा आहे. या आठवड्यापासून अनेक योजना आकार घेऊ लागतील नोकरीधंद्यांत दोन पावले पुढे पडतील. साहित्याच्या प्रांतात अनेक नवे विचार पुढे मांडण्यात यशस्वी ठराल.

नव्या घरी राहण्याचे ठरेल, वाहनाचा प्रश्नही सोडवू शकाल. उद्योगधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरल्याचा प्रत्यय यायला लागेल.

रवि-शनी अष्टमात असल्यामुळे आरोग्य काहीसे नरम गरमच राहील.

दि. ७ ते ९ हा काल विशेष अनुकूल जाणवेल.

**तूळ :** सध्या तरी आपल्या राशीची आघाडी आणि पिछाडी दुर्बल झाल्या-सारखी दिसते. काही काल निकराने झुंजत राहिल्याशिवाय निभाव लागणार नाही.

सांपत्तिक ताण कमालीचा जाणवेल. थोरांचे, इष्टमित्रांचे सहकार्य अपेक्षेप्रमाणे लाभू शकणार नाही. तरीही माघार घेण्याचे विचार तुमच्या डोक्यात येऊ शकणार नाहीत.

व्यवसायधंद्यांत डोळ्यांत तेल घालून सर्व व्यवहार करायला हवेत. अपेक्षित कार्यांना चालना देण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

दि. ५ ते ७ या काली बऱ्याच गोष्टी यशस्वी व्हाव्यात.

**वृश्चिक :** प्रयत्नांची शिकस्त + दैविक कृपा असे समीकरण तुमच्या जीवनाचे आहे. असे आहे म्हणूनच व्यवसाय क्षेत्रातील सर्वच आघाड्यांवर तुम्ही चौफेर विजयी होत आहात. सध्याचा वक्री मंगळही तुम्हांस काहीसा उपकारच ठरेल.

यांत्रिक क्षेत्रात तर तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाहीत. अनेकांचे हार्दिक सहकार्य सतत राहिल्यामुळे, सांपत्तिक ताण सहसा वाटणार नाही. अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभ होणे शक्य आहे.

व्यवसायधंद्यात एक नवे दालन उघडले जाईल.

दि. ७, ८, ९ या काली आपले सारे प्रयत्न यशस्वी व्हावेत.

**धनू :** अजुनी काही महिने आपणास सावधपणे वागावे लागेल. व्ययस्थ वक्री मंगळावर कोणाचाच काही इलाज चालू शकणार नाही. अशा वेळी माघार घेण्या-वाचून गत्यंतर नाही.

सांपत्तिक स्थितीबरोबरच आरोग्याचा प्रश्नही त्रासदायक ठरण्याचा संभव दिसू लागलेला आहे.

नोकरीधंद्यांत सतत जमवून घ्यावे लागेल, जबाबदाऱ्या शक्यतो उचलूच नका, उचलल्याच तर प्राणपणाने पार पाडाव्या लागतील.

विरोधक कोणत्याही क्षणी उठाव घेऊ लागतील, इष्टमित्र सहकार्य करू शकतीलच असा भरंवसा धरणे शहाणपणाचे ठरणार नाही.

दि. ७, ८, ९ थोडाफार अनुकूल काल.

**मकर :** सूर्याची फारशी अनुकूलता लाभत नसली तरी गुरू–मंगळांचे सामर्थ्य तुमच्या पाठीशी उभे असल्यामुळे, तुमची प्रगतीची घोडदौड अव्याहतपणे चालूच राहील. या वेळी तरी असे म्हणायला मुळीच हरकत नाही की, इतका सर्वांगाने अनुकूल काल आपण क्वचितच अनुभवला असेल.

अनपेक्षित लाभ मोठ्या प्रमाणावर होतील, व्यावसायिक उत्क्रांतीला अनुकूल काल सुरू झालेला असल्यामुळे काही अलौकिक, अनन्यसाधारण असे कार्य याच वेळी आपण करू शकाल.

दि. ३ ते ५ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कुंभ :** या महिन्यापासून अनेक नवे कार्यक्रम हाती घ्यावे लागतील आणि ते सारे अपेक्षेबाहेर यशस्वीही ठरतील.

सांपत्तिक लाभ फार मोठ्या प्रमाणावर होतीलच असे नाही, पण सहसा कोणत्याही बाबतीत अपेक्षाभंग होईल असे काही घडू शकणार नाही.

विज्ञान–कला क्षेत्रांत चांगलेच यश मिळवाल, दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवाल. थोरांच्या कृपेने अनेक क्षेत्रांत नेत्रदीपक विजय संपादू शकाल.

दि. ५, ६, ७ विशेष अनुकूल काल.

**मीन :** गेल्या काही दिवसांपासून तुमची पावले प्रगतीकडे पडू लागलेली आहेत. या आठवड्यात त्याची गती वाढेल. मनात घर करून बसलेला निराशावाद झाडून झटकून टाकला जाईल. आणि त्यामुळे तुमचा प्रगतीचा मार्ग निर्वेध बनू लागेल.

कला–साहित्य क्षेत्रांत महत्त्वाचे कार्य करून दाखवाल, नवे करारमदार घडवून आणाल. सांपत्तिक लाभाचे नवे मार्ग आचरणात आणू लागाल.

सध्या तरी निदान आपणास साडेसाती बाधू शकणार नाही.

दि ७, ८, ९ विशेष यश देणारा काल. ○